३६२

जगाची ओळख : : : १

# चीन

दि. ह. लिमये

ज्ञानराज प्रकाशन
पुणे २.

REFBK-0015039
REFBK-0015039

पाच रुपये

ठाणें
प्रवास
3502

दि. ह. लिमये

# चीन



जगाची ओळख : : : १


क्र. ४००५३ वि: भूप्रवास
३८२ नों. दि. २८।११।५६


# चीन

दि. ह. लिमये


74038
REFBK-0015039



राज प्रकाशन
पुणे २


पाच रुपये

प्रकाशक
अशोक महादेव जोशी
ज्ञानराज प्रकाशन
४२१ शनिवार पेठ, पुणे २

●

सजावट
सुधाकर खासगीवाले

●

ठसे
ब. शं. दाते
कलाभुवन, पुणे २

●

सर्व हक्क लेखकाधीन

●

प्रकाशन
१ ऑगस्ट १९६५
लो. टिळक पुण्यतिथी

●

मुद्रक
वि. ग. माटे
विश्वकर्मा मुद्रणालय प्रा. लि.
४०५ नारायण पेठ, पुणे २

४००५३

४००५३

सौ. लीलास

ग्रंथालय स्थळप्रत
अनुक्रम ८००५३ वि:
क्रमांक ३५२ नों. दि: २८।१।५६

# प्र स्ता व ना

पुणे येथील ‘ज्ञानराज प्रकाशन’ ह्या संस्थेचे संचालक पंडित महादेवशास्त्री जोशी व त्यांचे चिरंजीव श्री. अशोक जोशी ह्यांनी ‘जगाची ओळख’ ह्या नावाची निरनिराळ्या देशांची संकलित माहिती देणारी एक माला प्रसिद्ध करण्याची कल्पना काढली व तीत माझे सहकार्य देण्याची मला विनंती केली. त्यासरशी मला हरभऱ्याचे झाडावर चढल्यागत होऊन मी तत्काळ होकार दिला. परंतु कार्यास प्रत्यक्ष सुरुवात झाल्यावर मात्र त्यातील कित्येक पर्वतप्राय अडचणींची हळूहळू कल्पना येऊ लागली. एखाद्या क्षेत्रात गेल्यावर त्या ठिकाणी आपणास क्षेत्रोपाध्ये एक एक संकल्प सोडण्यास सांगतात. आपण संकल्प तर

सोडून असतो, व मग मात्र पस्तावतो. तसाच काहीसा प्रकार येथे घडेल किंवा काय अशी मला प्रथम शंका येऊ लागली. परंतु इच्छा असली की मार्ग सापडतो म्हणतात, त्याचा अनुभव आला. मी हळूहळू काम करीत राहिलो तसतशा अडचणी दूर होऊ लागल्या आणि चीन हे वरील मालेतील पहिले पुष्प मला वाचकांच्या हाती देता आले.

प्रत्येक देशाच्या भूगोलाला या मालेत प्राधान्य दिले आहे; परंतु त्याचबरोबर त्या देशाच्या सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक समस्यांचीहि तोंडओळख व्हावी असा उद्देश आहे.

या मालेचे वाचक स्वागत करतील अशी आशा वाटते. वाचकांनी

अभिप्राय कळविल्यास त्याप्रमाणे जरूर ते फेरफार करण्यास मदत होईल.


माझे मित्र व मेसर्स सकाळ पेपर्स (प्रा.) लिमिटेडचे उत्साही व्यवस्थापक कर्नल वि. वा. जोशी ह्यांनी प्रस्तुत पुस्तक लेखनाच्या कामी त्यांच्या ग्रंथालयाचा वापर करण्यास उदारपणे परवानगी दिली, याबद्दल त्यांचे आभार मानणे उचित ठरेल.

पुणे
दि. १ ऑगस्ट १९६५

—दि. ह. लिमये

# अनुक्रम


- प्रास्ताविक १
- स्वाभाविक माहिती ७
- पूर्वेतिहास २२
- संस्कृति, समाज, भाषा इ. ४३
- शेती ४८
- उद्योगधंदे ५८
- दळणवळण ७७
- परदेशी व्यापार व आर्थिक माहिती ८५
- संरक्षण ९६
- राज्यव्यवस्था १०१
- प्रसिद्ध व्यक्ती १०४
- टैवान ११८



# प्रास्ताविक

पृथ्वीवरील सर्वांत मोठा म्हणजे आशिया खंडातील सर्वांत मोठा देश म्हणजे चीन होय. एखाद्या देशाचे मोठेपण हे ज्या काही गोष्टींवर असते त्यांपैकी क्षेत्रफळ व लोकसंख्या ह्या दोन महत्त्वाच्या गोष्टी आहेत. त्या दृष्टीने पाहता चीन हा एक खरोखरच मोठा देश आहे, हे कबूल करावे लागेल. चीनचे एकंदर क्षेत्रफळ ३७,६८,७२६ चौरस मैल म्हणजे आपल्या भारताच्या जवळजवळ तिप्पट आहे. चीनची लोकसंख्याही अशीच अवाढव्य, म्हणजे ५८,२६,०३,४१७ असून ती भारताच्या लोकसंख्येच्या जवळजवळ दीडपट आहे. असा हा ऐसपैस पसरलेला व माणसांनी गच्च भरलेला देश आज अनेक दृष्टींनी लोकांच्या कुतूहलाचा देश बनला आहे.

भारताला आपण जेव्हा खंडप्राय म्हणतो तेव्हा आपल्या मनात भारताची अफाट भूमी, त्यातील निरनिराळे राजकीय भाग अथवा राज्ये, विविध स्वरूपाचे हवामान, पीकपाणी, निरनिराळ्या भाषा, चालीरीती वगैरेंचे विचार येतात. त्या दृष्टीने पाहू जाता चीनमध्ये भारतापेक्षा पुष्कळच जास्त विविधता असल्याचे आपणांस आढळते. अशा या अगडबंब देशाची माहिती त्रोटकपणे देण्याचा आता प्रयत्न आहे.

आशिया खंड पृथ्वीवरील सर्वांत मोठा भूविभाग आहे, हे उघडच आहे. युरोपियन लोकांनी राजकारणाच्या सोयीकरता या आशिया खंडाचे दोन भाग पाडले. एक युरोप खंडाला जवळ व लागून असलेला, म्हणजेच आशिया खंडांचा पश्चिमेकडचा भाग ( यालाच इंग्रजीत Near East असे म्हणतात ) व दुसरा युरोप खंडापासून अगदी दूर असलेला, म्हणजेच आशिया खंडाचा पूर्वेकडील भाग ( ह्याला इंग्रजीत Far East असे म्हणतात ). साधारणपणे भारत हा आशिया खंडाचा मध्य कल्पून, ह्या भारताच्या पश्चिमेकडील, आशिया खंडातील सर्व देश म्हणजे Near Eastern देश व भारताच्या पूर्वेकडील सर्व देश म्हणजे Far Eastern देश असेही मानले जाते. वरीलप्रमाणे Far Eastern देशात चीन हा एक अग्रगण्य देश मानला जातो. गेल्या पंधरा–वीस वर्षांत चीनमध्ये जी राजकीय क्रांती झाली, त्यामुळे तर चीनबद्दलची लोकांची उत्कंठा वाढली असून, अलीकडील त्या देशातील घडामोडींमुळे तर चीनबद्दल एक प्रकारची संशयाची व भीतीची भावनाही थोड्या फार प्रमाणात आपल्याला पाश्चिमात्य राजकारणी पुढाऱ्यांत दिसून येऊ लागली आहे.

चीन हा जगातील सर्वांत जुना व मोठा देश समजण्यात येतो. त्या दृष्टीने चीन व भारत ह्या दोन्ही देशांत, बऱ्याच प्रमाणात आपणास साम्य दिसून येते. हे दोन्ही देश आशिया खंडातच आहेत. ह्या दोन्ही देशांचा विस्तार फार मोठा आहे. ह्या दोन्ही देशांची लोकसंख्या अवाढव्य आहे, इतकी की ह्या दोन्ही देशांची लोकसंख्या एकंदर जगाच्या लोकसंख्येच्या जवळजवळ निम्मी आहे. दोन्ही देश सांस्कृतिकदृष्ट्या फार महत्त्वाचे आहेत. दोन्ही देशांत शेती हा जवळजवळ ८० टक्के लोकांचा मुख्य व्यवसाय आहे. दोन्ही देशांवर अनेक परकीय आक्रमणे झाली, परंतु ह्या सर्व आक्रमकांस स्वतःमध्ये सामावून घेऊन, हे दोन्ही देश स्थितप्रज्ञासारखे शांतच राहिले दोन्ही देशात हवामान, पाऊस, शेतीपासूनचे उत्पादन, खनिज संपत्ती वगैरे बाबतीत आपल्यास पुष्कळ वैचित्र्य आढळून येते. या दोन्ही देशांत मोठमोठे पर्वत, मोठमोठ्या नद्या व या नद्यांच्या आजूबाजूला अत्यंत सुपीक प्रदेश असलेला आपणास दिसतो. हे दोन्ही देश अगदी अलीकडेच स्वतंत्र झालेले असून, आपापली सामाजिक, आर्थिक व औद्योगिक प्रगती करण्याकडे त्यांनी आपले

लक्ष केंद्रित केले आहे. राजकीयदृष्ट्या हे दोन्ही देश भविष्यकालात आंतरराष्ट्रीय अशा मोठ्या समस्या उभ्या करू शकणार, असे दिसते. गेल्या ३०० वर्षांत पाश्चिमात्य राष्ट्रांनी सर्व जगावर प्रभुत्व गाजविण्याचा पुष्कळ प्रयत्न केला व काही अंशी तो सफलही झाला. परंतु चालू विसाव्या शतकात पाश्चिमात्य राष्ट्रांचे बरोबरीने येऊ पाहणारे चीन व भारत हे दोन पौर्वात्य देश म्हणजे पूर्व-पश्चिम संघर्षाची उतरलेली बाजूच म्हणावयास हरकत नाही.

## पूर्वेतिहास

चीन देशात मानवाचे अस्तित्व गेल्या सुमारे ५ लाख वर्षांपासून असावे, असे शास्त्रज्ञांचे मत आहे. देशातील सर्वांत जुने लिखाण ख्रिस्तशकापूर्वी सुमारे १२०० वर्षांपासूनचे आहे. एवढ्या मोठ्या खंडप्राय देशात निरनिराळ्या पुष्कळ बोली असल्या तरीही चिनी ही एकच एक लिहिण्याची भाषा आहे, ही एक महत्त्वाची गोष्ट आहे. युरोप खंडाएवढा ह्या देशाचा विस्तार असूनही व निरनिराळ्या वेळी ह्या देशावर अनेक परकीय आक्रमणे होऊनही, आजतागायत अखिल चीनची एकच एक भाषा राहणे, ही एक अत्यंत आश्चर्याची गोष्ट म्हटली पाहिजे. पाश्चात्त्य लोकांसही याचे आश्चर्य वाटते. चीनमध्ये निरनिराळ्या भागांत कितीही निरनिराळ्या विचारप्रणाली असल्या तरीही सर्वसाधारणपणे कन्फ्यूशियसने घालून दिलेले नियम व तत्त्वे बव्हंशाने अखिल चीनमध्ये आचरणात आणली जातात, इतकेच नव्हे तर कन्फ्यूशियसच्या तत्त्वज्ञानाचा जबरदस्त पगडा प्रत्येक चिनी माणसावर पडलेला आपणास स्पष्ट दिसतो.

येथे प्रथम सध्या आपण ज्या ज्या वेळी चीनचा उल्लेख करू, त्या त्या वेळी सध्याचा चीन किंवा मध्यचीन ह्याच अर्थाने तो समजावयाचा आहे. भूतकाळात चिनी साम्राज्यामध्ये मुख्य किंवा मध्यचीन, कोरिया, मंचूरिया, मंगोलिया, सिनकिआंग, तिबेट, फोर्मोसा वगैरे भूभागांचा समावेश होत असे पण जसजशी मध्यवर्ती सत्ता कमकुवत झाली, तसतसे तिबेट, सिनकिआंग, मंगोलिया, मंचूरिया वगैरे दूरदूरचे प्रदेश चीनपासून स्वतंत्र झाले. साहजिकच ह्या दूरदूरच्या प्रांतांवरील चीनची अधिसत्ता ( Suzerainty ) ही केवळ नाममात्रच राहिली. राजकारणामध्ये मुत्सद्यांच्या शब्दां-

पाठीमागे लष्करी सत्ता असल्याशिवाय त्यांच्या शब्दास किंमत येत नाही. भारत स्वतंत्र झाल्यावर; पूर्वी भारतीय साम्राज्यामध्ये अफगाणिस्तान, इराण, ब्रह्मदेश, इंडोचीन, इंडोनेशिया वगैरे प्रदेश समाविष्ट केले होते, म्हणून आताही त्या भागांवर भारताचीच सत्ता असावी, अशी जर भारतीय पुढाऱ्यांनी जाहीर घोषणा केली, तर अशा घोषणेला काही अर्थ तर राहात नाहीच, उलट त्यामुळे आपल्याविरुद्ध निरानिराळे शत्रू मात्र उत्पन्न होण्याची दाट शक्यता आहे.

चीनमधील साम्यवादी सरकारने तिबेट व सिनकियांग ह्या दोन प्रदेशांवर आपला हक्क सांगून त्याप्रमाणे लष्कराच्या जोरावर तेथे आपला अंमलही बसविला. तेव्हा सध्या तरी तिबेट व सिनकियांग ह्या दोन देशांचा चीनमध्ये अंतर्भाव करण्यास हरकत नाही. ह्या पुढील निरनिराळ्या प्रकरणांत वेळोवेळी चीनच्या निरानिराळ्या भागांचा उल्लेख येईल, त्या वेळी हे भाग नक्की कोणते, त्यांची नावे काय आहेत, हे समजून घेणे प्रथम अगत्याचे असल्याने खालील कोष्टक तयार केले आहे. या कोष्टकात मूळ चीनचे प्रांत व बाह्यचीनचे प्रांत ह्यासंबंधीची माहिती अलग अलग देऊन, शेवटी सर्व चीनची लोकसंख्या व क्षेत्रफळ ह्यांचे आकडे दिले आहेत.

| | प्रांताचे नाव | राजधानी | क्षेत्रफळ (चौ. मै.) | लोकसंख्या (लक्ष) |
|---|---|---|---|---|
| १ | आन्हवाय | व्हायनिंग | ५४,३०५ | २,१८ |
| २ | चेकिआंग | नँगचाऊ | ३९,६२१ | १,९७ |
| ३ | फूकीएन | फूचौ | ४५,५३९ | १,११ |
| ४ | होनान | कायफेंग | ६३,७४४ | २,७० |
| ५ | हूपाय | वू चँग | ७१,९३६ | २,१३ |
| ६ | कान्सू | लँचौ | १,५१,१२१ | ६७ |
| ७ | कि आंग सी | नॅनचँग | ६६,७८३ | १,२८ |
| ८ | कि आंग सु | च्चिनकिआंग | ४२,४५५ | ४,१० |
| ९ | क्वँगसी | नॅनिंग | ८४,५०५ | १,४५ |
| १० | क्वँगटुंग | कंतान | ८४,४४३ | २,९१ |
| ११ | क्वायचौ | क्वाययांग | ६५,६९६ | १,०६ |
| १२ | शानसी | तायंयुआन | ६०,३७८ | १,४७ |

ग्रंथ स्थळप्रत
४७०४३
३६२




| | | | |
|---|---|---|---|
| १३ शांटुंग | त्सिनान | ५४,५४४ | ३,९२ |
| १४ शेनसी | सीआन | ७२,५३३ | ९६ |
| १५ त्सेश्वान | चेंगटू | १,१७,१९७ | ४,८१ |
| १६ युनान | कुनमिंग | १,६२,३०० | ९३ |
| १७ सिनकिआंग (चिनी तुर्कस्तान) | उरुमची | ६,६०,८०५ | ३९ |
| १८ लायाओटुंग | आनटुंग | ३९,७५५ | ८६ |
| १९ लायाओसी | चिनचौ | २१,६४३ | ७४ |
| २० किरिन | किरिन | ४६,१२७ | ६९ |
| २१ सुंगकीआंग | हारबिन | ७९,२४३ | ५२ |
| २२ हेलिउंग कीआंग | त्सित्सिहार | १,०९,००९ | ५५ |
| २३ मोंगोलिया | उलान बाटुर | ५,८०,००० | |
| २४ तिबेट | ल्हासा | ३,४३,४१९ | १,५० |
| २५ चाहार | कलगन | १,०९,४९९ | २० |
| २६ जेहोल | चेंगटाउ | ६९,४७३ | २२ |
| २७ निंगासिया | निंगशिया | ३,९०,०६२ | ७ |
| २८ सुईयूआन | क्वायवाइ | १,२७,१४७ | २१ |
| २९ चिंघाई | सिनिंग | २,५७,५५३ | ११ |
| ३० सिनकिआंग | यूआन | १,२४,२८७ | १७ |
| ३१ टैवान | तायपेह | १३,८८१ | ७० |
| | | ३८,८४,९०३ | ४०,४८ |

वर दिलेल्या एकंदर ३१ विभागांपैकी मुख्य चीनचे फक्त १८ च विभाग आहेत. साम्यवादी सरकार चीनमध्ये प्रस्थापित झाल्यापासून मुख्य चीनचे १८ व इतर १३ असे मिळून एकंदर ३१ प्रांत किंवा ज्याला आपण राज्ये किंवा जिल्हे म्हणू, ६ विभागांत विभागले गेले आहेत. ईशान्य चीन विभागात लायाओटुंग, लायाओत्सी, किरिन, सुनकियाग, हायलुंगकियांग व जेहाल असे ६ जिल्हे आहेत. उत्तर चीन विभागात होपाए, शान्सी, चाहार, सुईयुवान व पुईयुवान असे पाच जिल्हे समाविष्ट केले गेले आहेत. वायव्य चीन विभागांत सिनकिआंग, चिआंगवाई, कान्सू, शेन्सी व निंगसिया

अशा ५ जिल्ह्यांचा समावेश आहे. नैऋत्य चीन विभाग त्झेश्वन, सीकांग, युनान व कायचौ अशा चार जिल्ह्यांचा मिळून झाला असून, मध्यचीन विभागात क्वांगटुंग, क्वांगत्सी, किआंगसी, हूनान, हूपे व होनान हे जिल्हे असून, पूर्वचीन विभाग शांटुंग, किआंगसू, आन्हवाय, चेकिआंग व फूकिएन ह्या जिल्ह्यांचा मिळून झाला आहे. चीनचा अवाढव्य विस्तार लक्षात घेता वरील लहान लहान भागाची किंवा जिल्ह्यांची नावे माहीत असणे उपयुक्त ठरेल. चिनी भाषेत उत्तर दिशेला पाय असे नाव आहे आणि म्हणून होव्हँगहो नदीच्या उत्तरेकडील प्रदेशास होपाय असे म्हणण्यात येऊ लागले. त्याचप्रमाणे दक्षिण दिशेला नान असे म्हणतात व साहजिकच होव्हँगहो नदीच्या दक्षिणेकडील भागाला होनान असे संबोधण्यात येऊ लागले. पूर्व दिशेला सी असे म्हणतात व म्हणूनच यांगत्सेकिआंग नदीच्या पूर्वेकडील भागास किआंगत्सी असे नाव पडले.

आता ह्यापुढील प्रकरणात आपणास प्राकृतिक चीनचा थोडासा विचार करावयाचा आहे.





# स्वाभाविक माहिती

चीन देशाचा विस्तार २० अंश उत्तर अक्षांश ते सुमारे ५३ अंश उत्तर अक्षांशापर्यंत म्हणजे जास्तीतजास्त दक्षिणोत्तर २३०० मैल लांब व पूर्व रेखांश ९५ अंश ते १३५ अंश म्हणजेच जास्तीतजास्त २९०० मैल रुंद पूर्व-पश्चिम असा आहे. चीनच्या पूर्वेस चिनी समुद्र व पश्चिमेस तिबेट व सिनकिआंगची पठारे व उंच उंच डोंगर आहेत. चीनच्या दक्षिणेला समुद्र असून उत्तरेस मोंगोलिया हा वाळवंटी प्रदेश व ईशान्येस मांचूरिया आहेत. पूर्व व दक्षिण दिशेस समुद्र असल्याने साधारणपणे चीनमध्ये पश्चिमेकडून पूर्वेकडे जमीन उतरती लागत जाते. दक्षिण दिशेला दक्षिण चिनी समुद्र असूनही ह्या दक्षिण चिनी समुद्र किनाऱ्यालाच जवळजवळ समांतर अशी एक टेकड्यांची रांग असल्याने दक्षिणेकडे विशेष महत्त्वाचे असे उताराचे पाणथर भाग नाहीत. भारताच्या पश्चिम किनाऱ्याशी समांतर अशा सह्याद्री पर्वत-रांगांमुळे ज्याप्रमाणे कोकण हा एक चिंचोळा खडकाळ किनारपट्टीचा प्रदेश भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर आहे, त्याचप्रमाणे चीनच्या दक्षिणेसही एक चिंचोळा डोंगराळ भाग दक्षिण किनारपट्टी म्हणून बनलेला आहे.

चीनचा एकंदर विस्तार सुमारे ३८ लक्ष चौरस मैल असूनही प्रत्यक्षात जेमतेम वीस टक्के क्षेत्रफळच मानवी जीवनास उपयुक्त असे आहे. बाकीचे ८० टक्के क्षेत्रफळ, म्हणजे जवळजवळ ३० लक्ष चौरस मैलांचा प्रदेश हा डोंगराळ असल्याने त्या ठिकाणी मानवाला वनस्पती व पशुजीवनाशिवाय अन्य काहीही करण्याची शक्यता नाही. वनस्पती जीवनातही जंगले व अरण्ये ह्यांचाच भरणा मोठ्या प्रमाणावर असल्याने चीनसारख्या अवाढव्य क्षेत्रफळ असलेल्या व त्या क्षेत्रफळाशी जणू काय चुरस करणाऱ्या तितक्या बेसुमार लोकसंख्येला आधारभूत असणारा शेती उद्योगधंदा ह्या ठिकाणी शक्यतेच्या कोटीपलीकडील आहे. ३८ लक्ष चौरस मैल क्षेत्रफळ असलेल्या चीनमध्ये सुमारे ५८ कोटी लोकसंख्या आहे, म्हणजे वरवर पाहता दर चौरस मैलास लोकसंख्येचे प्रमाण साधारणतः १५० पर्यंत पडते. परंतु आताच सांगितल्याप्रमाणे एकंदर क्षेत्रफळापैकी फक्त २० टक्के क्षेत्रफळच चिनी लोकांस उपयुक्त असे असल्याने, वस्तुतः चीनमधील लोकसंख्येचे प्रमाण दर चौरस मैलास सहाशेहूनही अधिक समजण्यास हरकत नाही. चीनच्या वायव्येला मोंगोलिया व गोबीचे वाळवंट असून हा प्रदेशही समुद्रसपाटीपासून बराच उंच आहे; पण ह्या प्रदेशाच्या पश्चिमेला व नैर्ऋत्येला जो डोंगराळ प्रदेश आहे तो तर आशिया खंडातील जवळजवळ अती उंच प्रदेशापैकीच एक होय असे म्हणावयास हरकत नाही. आशिया खंडाच्या मध्यभागी, म्हणजे ३० अंश ते ४० अंश उत्तर अक्षांशावर पश्चिमेकडून पूर्वेकडे असा एक अफाट डोंगराळ भाग पसरला आहे, की ज्याची काही शिखरे पृथ्वीवरील सर्वांत उच्च शिखरे म्हणून समजली जातात. भारताच्या उत्तरेला असलेला हिमालय व काराकोरम हे पर्वत ह्यांपैकीच होत. हिमालयाच्या उत्तरेस असलेले तिबेट व सिनकिआंग हे चीनचे दोन प्रांत तर इतके डोंगराळ व निर्मनुष्य आहेत की येथे मनुष्यवस्ती अत्यंत कमी असलेली आढळते. तिबेट म्हणजे तर एक पठाराचा प्रदेश आहे. त्याची सरासरी उंची समुद्रसपाटीपासून १०-१२ हजार फूट आहे. पृथ्वीच्या पृष्ठभागावर ३० अंश उत्तर अक्षांशाचे उत्तरेस हिमरेखा फारच कमी असते. साहजिकच तिबेट हा भाग असा आहे, की ह्या भागात बाराही महिने जिकडे तिकडे बर्फच बर्फ असते म्हटले तरी चालेल. सिनकिआंग हा प्रांत जरी तिबेटइतका उंच नसला तरी त्याचे अक्षांश तिबेट-

पेक्षा जास्त असल्यामुळे बर्फवर्षावाचे बाबतीत तिबेट व सिनकिआंग ह्या दोन प्रांतात फारसा फरक न केला तरी चालण्यासारखे आहे.

## चीन
### प्राकृतिक व नद्या




मध्य आशियातील ह्या पश्चिमेकडून पूर्वेकडे पसरलेल्या अती उंच डोंगरांच्या रांगा चीनमध्ये पश्चिमेकडून हळूहळू पूर्वेकडे उतरत येतात. यांपैकी सर्वांत उंच पर्वत म्हणजे टीएन शान हा होय. हा चीनच्या पश्चिमेकडील डोंगराळ भागाचा मध्य गाभाच होय. चिनी भाषेत ' शान ' म्हणजे पर्वत असा अर्थ होतो. मध्य आशियातून पश्चिमेकडून पूर्वेकडे पसरलेल्या ह्या उंच डोंगरांचे निरनिराळे भाग आढळून येतात व त्या प्रत्येकास निरनिराळी नावे आहेत. उदाहरणार्थ तिबेट व सिनकिआंग ह्या दोन चिनी प्रांतांच्या सीमेवर जो एक मोठा पर्वत पसरलेला आहे, तो म्हणजे कुएनलून पर्वत. ह्या कुएन-

लूनचीच एक शाखा थोडीशी उत्तरेकडे सरकून चीनच्या वायव्य कोपऱ्यातून चीनच्या पूर्वेकडे शिरते, तिला 'अस्टिन ताग' असे म्हणतात. ह्याच अस्टिन तागच्या पूर्वेकडील, चीनच्या वायव्येकडील भागास चिनी लोकांनी 'मिनशान' असे नाव ठेविले आहे. ह्याच मिनशानची आणखी पूर्वेकडील जी शाखा आहे, तिला 'चिनलिंग शान' असे म्हणतात.

पश्चिमेकडील हे पर्वत हळूहळू पूर्वेकडे उतरत येतात व त्यामुळे साहजिकच चीनचे दोन स्वाभाविक विभाग पडतात व ते म्हणजे पश्चिमेकडील डोंगराळ भाग व पूर्वेकडील किनाऱ्यालगतचा मैदानाचा प्रदेश हे होत. ज्याप्रमाणे पूर्व-पश्चिम असे चीनचे दोन स्वाभाविक विभाग पडतात, तद्वतच दाक्षिणोत्तरही चीनची स्वाभाविक विभागणी करण्यासारखी आहे. दक्षिणेकडचा भाग जास्त उंचवट्याचा व डोंगराळ असून त्याच्याशी तुलना करता उत्तरेकडचा भाग हा पुष्कळच सपाट म्हणजे मैदानी म्हणावयास हरकत नाही. दक्षिणेकडील पर्वत हे मुख्यतः 'नानलिंग शान' ह्या पर्वताचेच निरनिराळे भाग आहेत. किंबहुना हे निरनिराळे भाग कित्येक ठिकाणी पुंजक्यासारखे असल्याने कोणत्याही दोन डोंगरांच्या पुंजक्यात एक खचदाडांचा किंवा खोलगट भाग आपल्यास दिसून येतो.

पूर्व–पश्चिम व दक्षिण–उत्तर ही जी चीनमधील डोंगराळ भागांची कल्पना आपल्या डोळ्यांसमोर आणली, त्यावरून आपणास असे दिसून येईल, कीं सर्वसाधारणपणे चीनच्या पूर्व किनाऱ्याचा भाग हा एक मैदानांचा भाग आहे. मैदानांच्या भागांपैकी सर्वांत महत्त्वाचे मैदान म्हणजे ईशान्येकडील मैदान होय. जरी हे मैदान थोडेसे चीनच्या ईशान्येकडील कोपऱ्यात वळले असले तरी सर्वसाधारणपणे ह्या मैदानाला चीनचे उत्तरेकडील मैदान हीच संज्ञा दिली जाते. हे मैदान पूर्व–पश्चिम सुमारे ५०० मैल असून दक्षिणोत्तरसुद्धा तितकेच म्हणजे साधारणतः ५०० मैल पसरले आहे. चीनचा विस्तार फारच मोठा असल्याने पुष्कळवेळा नुसत्या दिशांनी ह्या चीनच्या निरनिराळ्या स्वाभाविक विभागांची पूर्ण कल्पना येणार नाही. पहिल्या प्रकरणात चीनच्या ज्या निरनिराळ्या प्रांतांची नावे व त्या प्रत्येकाचे क्षेत्रफळ व लोकसंख्या दिली आहे, त्याच्या अनुसंधानाने आपणास आता ह्यापुढे पुष्कळच जास्त माहिती मिळवावयाची आहे.

४८०९३ ३६२ २८।५।६५

चीनच्या पश्चिमेकडील उंचच उंच पर्वत व दक्षिणेकडील [illegible], तसेच अधूनमधून पूर्व भागातही तुरळक कोठे कोठे काही उंचवटे-डोंगर म्हणू या हवे तर-विखुरलेले आहेत; हे आपण आताच पाहिले. पश्चिमेचा डोंगराळ भाग व पूर्वेकडील मैदानांचा भाग हे चीनचे अशा प्रकारे दोन ठोकळेबाज भाग आपणास करता येतील; पण त्याहीपेक्षा जास्त वास्तववादी भाग म्हणजे चीनमध्ये वाहणाऱ्या तीन प्रमुख नद्यांमुळे स्वाभाविकपणेच पडणारे असे निरनिराळे भाग होत. ह्या तीन नद्या म्हणजे अगदी उत्तरेकडील हो‌‌ऽहँगहो, मध्यभागातील यांगत्सेकिआंग व दक्षिणेकडील सीकिआंग ह्या होत. ह्या तीन नद्यांपैकी पहिल्या दोन म्हणजे होऽहँगहो व यांगत्सेकिआंग ह्या दोन नद्या पश्चिमेकडील डोंगराळ भागातून निघून, सर्व चीनला पूर्व-पश्चिम छेदून, पूर्वेकडील समुद्राला मिळतात, तर शेवटची तिसरी म्हणजे दक्षिणेकडील सीकिआंग नदी ही प्रथम नैर्ऋत्येकडील डोंगराळ भागात उगम पावून काही अंतरापर्यंत थेट पूर्वेकडे वाहात जाऊन, मग हूनान प्रांतातून पूर्वेकडे न जाता एकदम दक्षिणेकडे वळून, बऱ्याच अंतरावर दक्षिण चिनी समुद्राला जाऊन मिळते. अशारीतीने चीनमधील तीन मुख्य नद्यांपैकी होऽहँगहो व यांगत्सेकिआंग ह्या दोन नद्या पूर्ववाहिनी असून, तिसरी सिकिआंग ही नदी मात्र दक्षिणवाहिनी झाली आहे.

वरील तीन नद्यांमुळे चीनचे स्वाभाविकच चार किंवा पाच विभाग पडतात. पहिला म्हणजे होऽहँगहो नदीच्या उत्तर तीरावरील प्रदेश होय. दुसरा विभाग म्हणजे होऽहँगहो व यांगत्सेकिआंग ह्या दोन नद्यांमधील प्रदेश होय. तिसरा म्हणजे यांगत्सेकिआंग व सीकिआंग ह्या नद्यांमधील प्रदेश हा होय. ह्या तिसऱ्या प्रदेशाखेरीज सीकिआंग ही दक्षिणवाहिनी नदी असल्याने चौथा प्रदेश म्हणजे सीकिआंग नदीच्या पूर्वेकडील प्रदेश व पाचवा प्रदेश म्हणजे सीकिआंग नदीच्या पश्चिमेकडील प्रदेश होय. उत्तरेकडील होऽहँगहो – हिलाच पीतनदी असेही दुसरे नाव आहे – ही चीनच्या वायव्येकडील भागात पश्चिमेकडील आंतरमोंगोलियाच्या ओसाड वाळवंटा-कडून वाहात येते. ह्या नदीतून प्रत्यही फार मोठ्या प्रमाणावर गाळ येतो. पश्चिमेकडील डोंगरातून ही नदी वाहात येत असल्याने ह्या नदीत पाण्याचे व गाळाचे दोहोंचे प्रमाण भरपूर असते. ह्या नदीला वारंवार पूर येतात.

पुराबरोबर गाळाचाही भरपूर भाग असल्याने ह्या पुरामुळे ह्या नदीचे पात्र रुंदावते व कित्येकवेळा नदी आपले पात्रही बदलते. ह्या बदलत्या पात्रामुळेच उत्तरेकडील भागात ह्या नदीला 'चीनचे संकट' अशा शब्दांची संभावना केली जाते. ह्या नदीचे पात्र अतिशय उथळ असल्याने ह्या नदीचा जलवाहतुकीचे दृष्टीनेही काही उपयोग होत नाही. पूर्वेकडील शांटुंग द्वीपकल्पाच्या, काही वर्षे, उत्तरेकडे ही नदी वाहते, तर काही वर्षे दक्षिणेकडे मुसंडी मारून पूर्वीच्या शांटुंग द्वीपकल्पाच्या उत्तरेकडील मुखापासून जवळजवळ ४००–५०० मैल खाली दक्षिणेला ह्या नदीला तोंड फुटते अशा ह्या नदीच्या सपाट प्रदेशातील वाहतुकीचा उपयोग करून जपानी लोकांनी ज्यावेळी पूर्वेकडून ३० वर्षांपूर्वी चीनवर स्वारी आरंभिली, त्या वेळी राष्ट्रवादी चिनी सेनेने ह्या जपानी चढाईला पायबंद घालण्याचा एक अभिनव मार्ग स्वीकारला व तो म्हणजे होऽहँगहो नदीचे दक्षिणेकडील बांध फोडून ह्या नदीला त्यांनी दक्षिणेकडे वळवून, शांटुंग द्वीपकल्पाचा दक्षिणेकडील भाग त्यांनी जलमय करून टाकला.

होऽहँगहो ही नदी पश्चिमेकडील कुएन लून पर्वताच्या पूर्व बाजूस उगम पावून चीनच्या-वायव्येकडील कान्सू प्रांतात पश्चिमेकडून शिरून, ह्या प्रांताची राजधानी लॅनचौ शहरावरून निघून उत्तरेकडे आंतरमोंगोलियातील निंगसिया व सुईयुवान ह्या प्रांतांना पूर्व-पश्चिम छेदून, चीनच्या उत्तरेकडून दक्षिणेकडे वळते. जवळजवळ ३५० मैलपर्यंत ही नदी चीनच्या शेनसी व शानसी ह्या दोन प्रांतांची दक्षिणोत्तर सीमा म्हणून वाहात जाते. शानसी व दक्षिणेकडील होनान ह्या प्रांतांच्या सरहद्दीवर ही नदी काही अंतरापर्यंत वाहात राहून होनान प्रांताची राजधानी कायफेंग शहराच्या पश्चिमेस ही नदी पुन्हा उत्तरेकडे वळते. नंतर शांटुंग प्रांतात शिरून तेथून ती उत्तरेकडील पोहाई किंवा पेहचिलीच्या आखातास मिळते. कायफेंगपासून १०० वर्षांपूर्वी ह्या नदीचा प्रवाह उत्तरेकडे न जाता दक्षिणेकडे वळून किआंग सू प्रांताच्या उत्तर भागातून ही नदी सरळ पूर्वेकडे पीतसमुद्राला जाऊन मिळत असे. ह्याप्रमाणे निरनिराळी नागमोडी वळणे घेत, सुमारे ३००० मैल लांबीची ही नदी जवळजवळ ९–१० प्रांतांना फेरी देऊन, आपल्याबरोबर भरपूर पाणी व गाळ आणून असंख्य चिनी नागरिकांचे धन्यवादही घेते व आपल्या

प्रवाह बदलण्याच्या विचित्र सवयीमुळे तितक्याच असंख्य चिनी नागरिकांचे शिव्याशापही घेते. ह्या नदीच्या काठचा मुलूख हा चीनमधील एक अत्यंत सुपीक असा भाग समजण्यात येतो.

होँव्हँगहो नदीच्या उत्तरेकडील जो भाग चीनचा एक नैसर्गिक विभाग समजण्यात येतो, त्यात चीनचे कान्सूचा थोडासा भाग, निंगसियाचा, सुई-युन्नान, शेनसी, शानसी, चाहार, होपेह, शांटुंग व होनान अशा नऊ प्रांतांच्या थोडथोड्या भागांचा समावेश होतो. ह्या नैसर्गिक विभागातच चीनमधील सुप्रसिद्ध उत्तरेकडील मैदानाचा पुष्कळसा भाग समाविष्ट होतो. होँव्हँगहो नदीच्या काठी हा प्रदेश असल्यामुळे ह्या प्रदेशाची सुपीकता फारच आहे. त्यात भर म्हणून किंवा काय, ह्या प्रदेशात पश्चिमेकडून जे गार वारे बारमाही वाहात येतात, ते वारे पश्चिमेकडील वाळवंटी पठारावरून वाहात असल्याने हे वारे आपल्याबरोबर लहान लहान असे खंडोगणती वाळूचे कण आणून ते ह्या सपाट व गवताळ प्रदेशात पसरतात. ह्याप्रमाणे हे वाळूचे कण व ह्या मैदानात नेहमी उगवणारे गवत ह्यांच्या मिश्रणाने एक विशिष्ट प्रकारची जमीन तयार होते व त्यास ‘ लोएस ’ असे म्हणतात. मोठमोठ्या नद्यांच्या दोहो काठांवर गाळाचे थरावर थर रचले जाऊन, जशी एक अत्यंत सुपीक अशा प्रकारची जमीन तयार होते, त्याप्रमाणेच ह्या होँव्हँगहो नदीच्या गाळाबरोबर आणखी हे ‘ लोएस ’चे थर जमल्याने अधिकस्याधिकम् फलम् ह्या न्यायाने येथील जमिनीचा सुपीकपणा आणखीच वाढतो. इतकी सुपीक जमीन उत्तर चीनमध्ये असूनही येथील शेती म्हणावी तितकी भरभराटीची नाही; कारण ह्या भागात पावसाचे दुर्भिक्ष फार जाणवते. अगदी पूर्वेकडील होपेह व शांटुंग ह्या समुद्रकाठच्या प्रांताशिवाय बाकीच्या इतर भागांत पाऊस फारच क्वचित व तोही अनिश्चित पडतो. त्यामुळे ह्या भागातील शेतीचे उत्पादन पूर्णपणे पावसाच्या लहरीवर अवलंबून असते.

होँव्हँगहो नदीच्या दक्षिणेला असलेली दुसरी नदी म्हणजे यांगत्से-किआंग ही होय. ‘ चीनच्या शरीरातील धमनी ’ म्हणून ह्या नदीचे वर्णन करण्यात येते. ही नदी चीनच्या बरोबर मध्यभागातून जात असल्यामुळे चीनचे उत्तर व दक्षिण असे दोन स्वाभाविक विभाग पडतात. यांगत्से-किआंग सुमारे ३६०० मैल लांब आहे. ह्या नदीचे खरे चिनी नाव चँग कि

आंग किंवा त्सां चि आंग असे आहे. ह्याचा अर्थ मोठी किंवा खूपच लांब नदी असा होतो. ह्या नदीची चीनच्या निरनिराळ्या भागांत निरनिराळी नावे आहेत. कोकनूर पर्वतराजीतून म्हणजे तिबेट व सिनकिआंग प्रांतांच्या-मधील डोंगरातून ही नदी उगम पावून सुरवातीस दक्षिणवाहिनी होऊन, ह्वॅङ्गहो नदीच्या उगमापर्यंत येऊन, तेथून चीनच्या नैर्ऋत्य भागापर्यंत थेट दक्षिणेकडे वाहात येते. चीनचा नैर्ऋत्येचा भाग म्हणजे त्सेश्वान प्रांत होय. त्सेश्वान प्रांताच्या पश्चिमेला बरांग ह्या डोंगराळ मुलखातील एका सिनकियांगमधील महत्त्वाच्या शहराजवळून ही नदी वाहात असतानाही समुद्रसपाटीपासून सुमारे ८५०० फूट उंच आहे. बरांगहून ही नदी डोंगराळ मुलखातून पूर्वेकडे हळूहळू वाहात येऊन त्सेश्वान प्रांतात बाचू ह्या शहरात शिरल्यावर ह्या नदीची समुद्रसपाटीपासूनची उंची सुमारे २००० फूट इतकी असते. चिनी भाषेत त्सेश्वान ह्याचा अर्थ चार नद्यांचा प्रदेश असा होतो. त्सेश्वान प्रांतातील ह्या चार नद्या म्हणजे यांगत्सेकिआंग व ही नदी ज्या चार – मिन, टो, फू व किआगलिंग – नद्या मिळून होते, त्या होत. त्सेश्वान प्रांत हा चीनमधील उत्तरेकडील लोएस ह्या सुपीक प्रदेशाच्या बरोबरीने सुपीक असलेला 'रेड बेसिन' ह्या नावाचा दुसरा प्रदेश होय. त्या ठिकाणी यांगत्से नदी त्सेश्वान प्रांतातील सपाट मैदानाचे भागात उतरते, ते म्हणजे काही काळ राष्ट्रवादी चिनी सरकारचे राजधानीचे शहर चुंग किंग होय. ह्या ठिकाणी ही नदी फक्त समुद्रसपाटीपासून ६३० फूट उंचावर आहे. चुंग किंगहून निघाल्यावर ही नदी मोठमोठी वळणे घेत इशांग ह्या समुद्र-सपाटीपासून केवळ १३० फूट उंच असलेल्या शहरापाशी येते. इशांगपासून ह्या नदीचे पात्र रुंद होत जाते. इशांग हे ठिकाण शांघाय ह्या यांगत्से-किआंगच्या मुखाशी असलेल्या बंदरापासून पश्चिमेकडे सुमारे १००० मैल लांब आहे. शांघाय ते इशांग ह्या अंतरापर्यंत यांगत्से नदीतून मोठमोठ्या आगबोटीही जा–ये करू शकतात. ह्यामुळे वाहनव्यवहाराचे दृष्टीनेही यांगत्से-किआंग ही नदी चीनला किती महत्त्वाची वाटत असेल, ह्याची कल्पना येईल.

यांगत्सेकिआंग नदीच्या सुमारे ३६०० मैल लांबीच्या प्रवाहात तिला असंख्य उपनद्या मिळत असाव्यात, ह्यात काहीच शंका नाही. त्या सर्वांची

नोंद येथे करणे शक्य नाही. त्यातल्या त्यात दक्षिणेकडून वाहात येऊन किऊकिआंग ह्या ठिकाणी यांगत्सेकिआंगला मिळणारी 'कान' नदी; उत्तरेकडून वाहात येऊन टँको येथे यांगत्सेला मिळणारी 'हान' नदी; दक्षिणेकडून वाहात येऊन टुंगटिंग सरोवरातच यांगत्सेला मिळणारी 'सिआंग' नदी व उत्तरेकडून वाहात येणारी चुंगकिंग येथे यांगत्सेला मिळणारी 'किअलिंग' नदी, ह्या नद्या विशेष उल्लेखनीय समजल्या जातात. यांगत्से व तिच्या वर दिलेल्या उपनद्या ह्या चीन देशास अत्यंत महत्त्वाच्या आहेत. यांगत्से नदीच्या खोऱ्यात, एकंदर चीनमधील लोकसंख्येपैकी ५० टक्के लोकसंख्या राहाते. ह्या नदीमुळेच चीनमधील एकंदर वाहतुकीपैकी बराच मोठा भाग चिनी जीवनास मदतरूप होतो. ही नदी व हिच्या अनेक उपनद्या ह्यांमुळे चीनमध्ये दक्षिणोत्तर जलवाहतुकीचा प्रश्न सुटण्यासही मदत झाली आहे. उत्तरेकडील होव्हँगहो, मध्य भागातील यांगत्सेकिआंग व दक्षिणेकडील सीकिआंग ह्या नद्या, ह्या प्रत्येक नदीच्या उपनद्या, ह्या सर्वांस जोडणारे निरनिराळे कालवे ह्यामुळे ईशान्य टोकाकडील चीनची राजधानी पायपिंग ह्या शहरापासून ते थेट दक्षिणेकडील कंतान शहरापर्यंत जलवाहतुकीची सोय हल्ली उपलब्ध झाली आहे. कोणत्याही देशाच्या आर्थिक ऊर्जितावस्थेसाठी वाहन व दळणवळणाची जितकी मुबलक उपलब्धता असेल तितकी त्या देशाची प्रगती अधिक होते. एकंदर दळणवळणाच्या साधनात जलवाहतूक ही अत्यंत स्वस्त असते, हेही तितकेच खरे आहे आणि म्हणूनच चीनच्या आर्थिक पुनर्वटनेत पूर्व–पश्चिम नद्यांवरील जलवाहतूक व दक्षिणोत्तर तशाच प्रकारच्या वाहतुकीची सोय म्हणजे निसर्गाची चीनला एक मोठीच अमोल देणगी होय.

चीनमधील तिसरी व शेवटची महत्त्वाची नदी म्हणजे दक्षिणेकडील 'सीकिआंग' ही होय. ही नदी नैर्ऋत्येकडील युनान प्रांतातील डोंगराळ पठाराचे भागात उगम पावते. ह्या नदीचे उगमस्थान समुद्रसपाटीपासून सुमारे ६००० फूट उंचावर आहे. प्रथम काही अंतरापर्यंत ही नदी दक्षिणेकडे वाहात जाते. युनान प्रांतातून क्वायचौ प्रांतात ही नदी शिरल्यावर ही दक्षिणेकडे वाहात जाण्याऐवजी उत्तरेकडे वळते. ह्या युनान व क्वायचौ भागात ही नदी 'पा–ता–हो' ह्या नावाने ओळखली जाते. क्वायचौ प्रांतातून

तीनदी बाहेर पडल्यावर काही वेळ ती क्वायचौ व क्वांगसी ह्या प्रांतांच्या सीमेवरून वाहाते. ह्या भागात ह्या नदीला हुंग शुई असे नाव दिले जाते. त्यानंतर ह्या नदीचा दक्षिणेकडील प्रवाह सुरू होऊन ती शेवटी दक्षिणचीन समुद्रास कंतान येथे मिळते. ह्या ठिकाणी तिची अनेक मुखे आहेत. सीकिआंग नदीच्या काही उपनद्या पुढील प्रमाणे आहेत. पाहिली उपनदी लुंग कि आंग ही उपनदी सीकिआंग नदीच्या एका बाजूने येऊन मिळते. ह्यानंतर उजव्या बाजूकडून स्यूंनचौ जवळ सीकिआंग नदीला मिळणारी दुसरी उपनदी म्हणजे 'यू किआंग' ही होय. स्यूंनचौच्या दक्षिणेला असलेल्या वू चौ ह्या शहराजवळ सीकिआंगला डाव्या बाजूकडून काय किआंग ही एक उपनदी येऊन मिळते. वू चौ शहराच्या दक्षिणेला असलेल्या सीकिआंग नदीच्या तीरावर वसलेल्या चे ओ किंग ह्या शहरापासून सीकिआंगपर्यंत निरनिराळे फाटे फुटतात. सीकिआंग नदीला अगदी मुखाशी आणखी एक नदी मिळते व ती म्हणजे 'पाय किआंग' ही होय. सीकिआंग नदी दक्षिण चिनी समुद्राला अनेक मुखांतून मिळते. त्यापैकी एका मुखावर कंतान हे शहर व बंदर वसले आहे. ह्या कंतानजवळील सीकिआंग नदीच्या भागाला कंतान नदी किंवा 'चू किआंग' नदी असे नाव आहे. 'चू किआंग' प्रमाणेच आणखी एका सी किआंग नदीच्या भागाचे नाव 'टुंग किआंग' असे आहे. सीकिआंग नदी ही एकंदर सुमारे १२५० मैल लांब आहे. कंतानपासून उत्तरेकडे वू चौपर्यंत ह्या नदीतून मोठमोठ्या आगबोटींची ये-जा चालू असल्याने दक्षिण चीन भागात ह्या नदीमुळे दक्षिणोत्तर जलवाहतूक फारच सोईची झाली आहे.

चीनमध्ये पूर्ववाहिनी नद्यांचेमुळे पूर्व-पश्चिम जलवाहतूक फारच सोयीची, सोपी व स्वस्त झाली आहे. त्या मानाने दक्षिणोत्तर वाहतूक मात्र विशेष दिसून येत नाही व त्याचे एक मुख्य कारण म्हणजे चीनमध्ये उत्तर किंवा दक्षिण वाहिनी अशी सीकिआंगशिवाय एकही नदी नाही. साहजिकच दक्षिण-उत्तर जलवाहतुकीचा प्रश्न फारच अडचणीचा असा होऊन बसला आहे. फार पूर्वी चीनमध्ये पीकिंग ह्या राजधानीपासून, उत्तरेकडील होव्हँगहो व मध्यचीनमधील यांगत्सेकिआंग ह्या नद्यांस जोडणारा एक



डफवाली
पंखेवाली नर्तिका
दुतोंडी ढोलक
नर्तिका

दक्षिणोत्तर कालवा खोदण्यात आला होता. पण त्या कालव्याचा उपयोग हल्लीच्या आगबोटींच्या काळात फारसा उपयोगाचा ठरत नाही.

इ. स. १९३५ ते १९४४ मधील चीनवरील जपानी स्वारीचे वेळी शांटुंग द्वीपकल्पाचे पश्चिमेकडील सपाट मुलखात होऍंगहो नदीचे पाणी सोडून तो सर्व प्रदेश राष्ट्रवादी चिनी लोकांनी जलमय करून टाकून एक प्रकारे जपानी चढाईला थोपवून धरले, हे आपण ह्यापूर्वी पाहिलेच आहे. इ. स. १९४९ मध्ये चीनमध्ये समाजवादी सत्ता प्रस्थापित झाल्यानंतर पूर्वीच्या जुन्या कालव्याचे पुनरुज्जीवन करण्याचे योजण्यात येऊन, उत्तरेकडील – वस्तुतः ईशान्येकडील – टीएंटसिन बंदरापासून तो थेट दक्षिणेकडील कॅंटान बंदरांना जोडणारा व आगबोटींची वाहतूक करू शकणारा असा कालवा तयार करण्याचे कामास प्राधान्य देण्यात आले आहे.

चीनच्या पूर्वेकडे समुद्र असल्याने चीनला नैसर्गिकरीत्याच सुमारे २५०० ते ३००० मैलांचा समुद्रकिनारा लाभला आहे. चीनच्या नकाशाकडे दृष्टी टाकल्यास आपणास असे दिसून येते, की ह्या सुमारे ३००० मैलांच्या किनाऱ्यापैकी जवळजवळ ५० टक्के किनाराच फक्त दंतुर असल्याने नौकानयनाचे दृष्टीने महत्त्वाचा आहे. हा बहुतेक सर्व दंतुर किनारा दक्षिणेकडे – पूर्व किनाऱ्याच्या दक्षिण भागात – विशेष प्रामुख्याने असल्याने चीनमधील बहुतेक सर्व महत्त्वाची बंदरेही चीनच्या दक्षिण व आग्नेय किनाऱ्यावरच आढळून येतात. शांटुंग द्वीपकल्पाचा भाग सोडल्यास चीनच्या पूर्वकिनाऱ्याचा उत्तरेकडील भाग हा कोणत्याही महत्त्वाच्या बंदराच्या उभारणीला उपयोगी पडणारा नाही. ह्याखेरीज पोटाई किंवा पेहचीलीचे आखातापासून दक्षिणेकडे थेट शांघायपर्यंतचा किनाऱ्याजवळील समुद्राचा भाग गाळामुळे इतका उथळ बनला आहे, की ह्या ठिकाणी मोठमोठ्या आगबोटी येणे अशक्य होते. होऍंगहो व तिच्या उपनद्या, तसेच यांगत्सेकिआंग व तिच्या असंख्य उपनद्या ह्यांमधून एकसारखा येणारा गाळ हा चिनी समुद्रात रिचविला जात असल्यामुळे, ह्या ठिकाणी नदीची मुखे व समुद्र हे सर्व भाग अतिशयच उथळ झालेले आहेत. मोठमोठ्या आगबोटींची येजा होण्याकरिता हा गाळ काढून आगबोटींना मार्ग करून देणे, हे अतिशय

खर्चाचे काम आहे. शिवाय त्या सर्व भागात किनारा दंतुर नसल्यामुळे संरक्षित बंदरांची काहीच सोय नाही. सारांश, चीनच्या पूर्वकिनाऱ्यावरील उत्तरेकडील भागात टांगटाय किंवा हैचौ, त्सिंग टौ, चे फू व टीएंटासिन ह्या हाताच्या बोटांवर मोजता येणाऱ्या बंदरांखेरीज दुसरी कोणतीच महत्त्वाची बंदरे नाहीत. ह्याचे उलट चीनच्या पूर्व किनाऱ्याच्या दाक्षिण भागात शांघायखेरीज एका पाठोपाठ डझनावारी उत्तम बंदरे असल्याचे आपणास दिसून येते.

## चीनचे सर्वसाधारण हवामान

चीनच्या अवाढव्य पूर्व–पश्चिम व दाक्षिणोत्तर विस्तारामुळे चीनमध्ये निरनिराळ्या प्रकारचे हवामान आपणास आढळून येते. पूर्वेकडे समुद्र व पश्चिमेकडे उंच उंच डोंगर असल्यामुळे साधारणपणे जसजसे आपण पूर्वेकडून पश्चिमेकडे जावे तसतसे हवामान जास्त जास्त विषम होत जाते. चीनमधील होऽहँगहो नदीच्या उत्तरेला जो मोठा मैदानाचा प्रदेश आहे, तो सर्व ३५ अंश उत्तर अक्षांशाच्या उत्तरेकडे असल्यामुळे ह्या भागात सर्वसाधारणपणे हवामान शीत – समशीतोष्ण प्रकारचे आहे. ह्या भागातील किआंगसू, शांटुंग, होपेइ वगैरे प्रांत समुद्रकिनारी असून ह्या किनाऱ्याजवळून कुरोसीवो ह्या उष्ण पाण्याच्या प्रवाहाची एक शाखा दक्षिणेकडून उत्तरेकडे बारमाही वाहात असल्यामुळे ह्या प्रदेशातील हवामान उष्णसमशीतोष्ण प्रकारचे असते. हिवाळा फारसा कडक नसतो व उन्हाळ्यातही तपमान १०० अंशांपेक्षा ( फॅरनहाईट ) जास्त वाढत नाही. परंतु जसजसे पश्चिमेकडे जावे, तसतसे हवामान विषम होत जाते. वायव्येकडील शान्सी, शेन्सी, कान्सू ह्या प्रांतात तर अतिशय कडक हिवाळा असतो. उन्हाळ्यातही तपमान ६५ अंश फॅरनहाईटपेक्षा फारसे जास्त असत नाही. जवळजवळ अशीच विषम हवामानाची परिस्थिती आपणास पश्चिमेकडील त्सेश्वान व नैर्ऋत्येकडील युनान प्रांतांबद्दल आढळून येईल.

चीनच्या दक्षिणेकडील भाग हा मात्र पूर्णपणे उष्णकटिबंधात मोडत असल्यामुळे येथील हवामान मान्सून हवामानासारखे आहे. हिवाळा फारसा थंड नसतो व उन्हाळ्यातही उष्णता मर्यादितच असते. ह्याच भागात, विशेषतः आग्नेय किनाऱ्याजवळील भागात मान्सून वाऱ्यापासून जून ते ऑक्टोबर

ह्या महिन्यांत पाऊस पडत असल्यामुळे येथील हवामान वर्षभरही साधारण आपल्या भारतातील पश्चिम किनारपट्टीतील हवामानाप्रमाणेच आढळते.

होन्हॅंगहो, यांगत्सेकिआंग व सीकिआंगसारख्या मोठमोठ्या नद्या एक-सारखा खंडोगणती गाळ वाहात आणून तो आपापल्या दोन्ही तीरांवर पसरत असूनही चीनपुढील सर्वांत महत्त्वाची समस्या म्हणजे, अशा ह्या सुपीक जमिनीला भरपूर पाण्याचा पुरवठा करणे ही होय. दक्षिणेकडील थोडासा भाग सोडल्यास बहुतेक सर्व चीनमध्ये पाऊस अगदीच अनिश्चित व थोडा पडतो. साहजिकच शेतीव्यवसाय हा पूर्णपणे पाण्यावर अवलंबून असल्याकारणाने शेतीपासून जास्त उत्पादन हवे असल्यास, शक्य तितकी पाटबंधाऱ्यांची सोय करून देणे अत्यंत आवश्यक आहे, पण असे पाटबंधारे बांधणे ही काही सोपी गोष्ट नाही. पाटबंधाऱ्याच्या अभावी कष्टाळू चिनी शेतकरी हा नद्यांच्या काठांवरील भागात आपल्या जिवाचे रान करून, वर्षभर एकसारखे राबून जेवढे पीक काढता येईल, तितके काढण्याचा प्रयत्न करीत असतो. यांगत्सेकिआंग नदीच्या दक्षिणेला पुरेसा पाऊस व उष्ण हवामान ह्यांमुळे ह्या भागातील सर्वांत महत्त्वाचे शेतीपासूनचे उत्पादन म्हणजे तांदूळ हे होय. ह्याचे उलट यांगत्सेकिआंग नदीचे उत्तरेकडील भागात शीतसमशीतोष्ण हवामान व अपुरा पाऊस ह्यांमुळे तांदळाचे उत्पादन अशक्य होते; म्हणून ह्या भागात गहू व जोंधळा ह्यांचे उत्पादना-वरच जास्त भर दिला जातो.

थोडक्यात सांगावयाचे झाल्यास हवामानाचे दृष्टीने चीनचे एकंदर ६ विभाग पडलेले दिसून येतील :—( १ ) होपेह, शांटुंग, किआंगसू व होनान ह्या प्रांतांचा मिळून उत्तर चीनच्या मैदानाचा भाग. हा भाग सपाट असून, येथील जमीन अतिशय कसदार आहे. पाऊस अपुरा असला तरी ह्या भागात शेतीची मशागत मोठ्या प्रमाणावर होत असल्याने हा चीनमधील एक दाट लोकसंख्येचा भाग आहे. दाट लोकसंख्या, उत्तम शेती व दोहोंच्या अनु-षंगाने येथे सुरू झालेले उद्योगधंदे व व्यापार ह्यामुळे चीनचा हा भाग राजकीय, औद्योगिकदृष्ट्या एक महत्त्वाचा भाग बनला आहे. ह्या भागांत दळणवळणाची साधनेही विपुल आहेत.

( २ ) शान्सी, शेन्सी, कान्सू व होनान प्रांताचा काही भाग मिळून झालेला नैऋत्येकडील भाग. हा भाग अगदी डोंगराळ असून, ह्या भागांतील हवामानही फार विषम आहे. येथील जमीन 'लोएस' जातीची, अतिशय सुपीक असूनही पावसाचे अभावी ह्या भागांत शेतीव्यवसाय फारसा महत्त्वाचा नाही. ह्यामुळे हा भाग तुरळक मनुष्यवस्तीचा आहे. उद्योगधंदे किंवा कारखानेही फारसे नाहीत. दळणवळणाच्या साधनांचाही बराच अभाव आहे. म्हणण्यासारखी शहरेही नाहीत. ह्या भागाकडूनच पश्चिमेकडून चीनमध्ये येण्याचा एकमेव मार्ग आहे. थोडक्यात म्हणजे हा भाग बराचसा मागासलेला आहे.

( ३ ) चार नद्यांचा मिळून झालेला–लाल मातीचा प्रदेश ( त्सेश्वान ). हा भाग चीनच्या पश्चिमेकडील भाग होय. ह्या भागात उंच उंच डोंगर नसल्यामुळे, हा पठाराचा भाग समजण्यास हरकत नाही. ह्या भागातून चार नद्या वाहात असल्यामुळे, एकंदर जमीन सुपीक बनली आहे. हवामान समशीतोष्ण असून पावसाचे मानही बेताचेच आहे. तिन्ही बाजूंनी–पश्चिम, उत्तर व दक्षिण–डोंगरांनी वेढलेला असा हा भाग असून, फक्त पूर्वेकडे यांगत्सेकिआंग नदीच्या खोऱ्यातून पूर्वेकडील सपाट मैदानात दळणवळण चालू असते. सुपीक प्रदेश असल्याने शेती हा सर्वांत महत्त्वाचा लोकांचा व्यवसाय आहे. उद्योगधंदे किंवा कारखाने जवळजवळ नाहीतच म्हटले तरी चालेल. मोठमोठी शहरेही नाहीत. पश्चिमेकडून नद्यांच्या खोऱ्यातून तिबेट, सिनकिआंग वगैरेंशी दळणवळण–ब्रह्मदेशी पायवाटेने–चालू असल्याने ह्या भागात लहानलहान व्यापारी केंद्रे बरीच आहेत.

( ४ ) हूपे, हूनान, आन्हवाय, चेकिआंग, किआंगसी व किआंगसू ह्या प्रांतांचा मिळून झालेला यांगत्से नदीच्या खोऱ्याचा पूर्वेकडील भाग हा होय. सुपीक व सपाट जमीन, बेताचा पाऊस, समशीतोष्ण हवामान ह्यांमुळे हा भाग म्हणजे चीनमधील सर्वांत महत्त्वाचा तांदळाचे उत्पादनाचा भाग समजण्यात येतो. भाताचे पीक वर्षातून किमान दोनदा काढण्यात येत असल्यामुळे तसूभर जमीनही नांगरटीशिवाय दिसत नाही. लोकसंख्या अतिशय दाट आहे. ह्या भागांत विपुल खनिजे सापडतात. दळणवळणाची साधनेही विपुल आहेत. मोठमोठे उद्योगधंदे व कारखाने उभारण्यात आले

असल्यामुळे उत्तरोत्तर ह्या भागाचे महत्त्व वाढू लागले आहे. मोठमोठी शहरे उदयाला येत आहेत. शांघाय हे चीनमधील सर्वांत मोठे बंदर व शहर ह्याच भागात अगदी पूर्वेकडे आहे.

( ५ ) क्वांगटुंग, क्वांगसी, फूकिएन, चेकिआंग व किआंगसी ह्या प्रांतांचा मिळून झालेला आग्नेयीकडील हा चीनचा पाचवा नैसर्गिक विभाग होय. हा भाग उष्ण कटिबंधात मोडतो. उन्हाळ्यात हवामान पुष्कळच गरम असते. हिवाळ्यात तपमान ७० अंश फॅरनहाईटपेक्षा फारसे कमी असत नाही. सुमारे ४०–५० इंच पाऊस, मुख्यतः मान्सून वाऱ्यापासून मिळत असूनही, बहुतेक प्रदेश डोंगराळ व उंचसखल भागांचा बनला आहे. सीकिआंग नदीच्या मुखाजवळ उत्तम भातशेती होत असल्यामुळे मैदानी भागात लोकसंख्या दाट आहे. डोंगराळ व उंचवट्याचे भागात लोकसंख्या बरीच विरळ असते. दक्षिण किनारपट्टीवर काही महत्त्वाची बंदरे असून पश्चिमेकडून येणाऱ्या आगबोटी प्रथम येथे येतात. कँतान हे सीकिआंग नदीचे मुखाशी असलेले सर्वांत महत्त्वाचे बंदर व शहर होय.

( ६ ) युनान, क्वायचौ, त्सेश्वान ह्या प्रांताचा मिळून झालेला हा नैर्ऋत्येकडील, चीनचा सहावा व शेवटचा नैसर्गिक विभाग होय. ह्या भागातील हवामान एकंदरीत समशीतोष्ण असून पाऊसही अगदी बेताचाच पडतो. लोकसंख्या बरीच तुरळक असून, उद्योगधंदे, कारखाने व शेतीव्यवसाय ह्या सर्वच बाबतीत मागासलेला असा हा भाग आहे. दळणवळणाच्या साधनांचाही तुटवडाच आहे. हा भाग नैर्ऋत्येकडील इंडोचीन, ब्रह्मदेश, तिबेट वगैरेंशी पायवाटेने दळणवळण असल्याने लहानलहान व्यापारी केंद्रे, पण फारशी महत्त्वाची नसलेली, आढळून येतात. तिबेटवरून भारताच्या ईशान्य भागावर स्वारी करणे सुलभ होण्याकरिता ह्या डोंगराळ भागातून हल्ली चीनचे साम्यवादी सरकार मोठमोठ्या मोटारी सुलभ रीतीने जा–ये करू शकतील असे पक्के रस्ते बांधण्याचे काम जारीने अमलात आणीत आहे.

आतापर्यंत चीनबद्दलची भौगोलिक माहिती आपण समजावून घेतली. ह्यानंतर पुढील प्रकरणात आपणास चीनचा पूर्वेतिहास समजून घ्यावयाचा आहे.

● ● ●



# पूर्वेतिहास

चीनच्या इतिहासाकडे थोडासा जरी दृष्टिक्षेप टाकला तरी त्या इतिहासाची घडण ही बहुताशाने चीनच्या भौगोलिक परिस्थितीमुळेच झाली असल्याची आपणास हरघडी प्रचीती येते. भारत, इजिप्त व युफ्राटीस तैग्रीस नद्यांच्या काठावरील पूर्वीचे सुप्रसिद्ध देशांप्रमाणेच चीनचे महत्त्व सुपीक प्रदेश, मोठमोठ्या नद्यांनी विभागलेला भाग, निरनिराळ्या प्रकारची व समृद्ध खनिजे, लोकवस्तीला मानवणारे हवामान व सुलभ दळणवळणाची साधने ह्या सर्व गोष्टी एखाद्या देशाला महत्त्व प्राप्त करून देतात. अशा देशांतच मानवी जीवन समृद्ध होते, संस्कृतीची वाढ होते व याचा परिणाम म्हणजे सामाजिक, राजकीय, धार्मिक वगैरे बाबतीत ह्या भागातील रहिवासी आपले एक वैशिष्ट्य तयार करतात. लोकसंख्येची जसजशी वाढ होते, तसतसा त्या जनसमुदायाला राजकीय स्थैर्यपणा येतो. राजसत्तेची स्थापना होते. राज्याचा विस्तार होऊ लागतो व कालचक्राप्रमाणे देशाचा उदय, विकास व शेवटी अवकळा येऊन पुन्हा कालचक्र फिरू लागते.

सुपीक व सपाट प्रदेश व भरीला उत्तर व पूर्व बाजूंनी उंचउंच पर्वत व पूर्व व दक्षिण बाजूला समुद्र असल्याने ह्या अवाढव्य देशात राहणाऱ्या लोकांचे

विचार पुष्कळसे संकुचित असले व त्यांच्यामध्ये काही विचित्र चाली अथवा रूढी कायम वास्तव्य करून बसल्या तर त्यात आश्चर्य करण्यासारखे विशेष असे काही नाही. थोडक्यात चिनी लोकांमध्ये काही शतके बोकाळलेली कूपमंडूक वृत्ती ही ह्या वरील कारणांमुळेच असावी, असे म्हणावे लागते. आपण, आपले सगेसोयरे, आपला गाव, ह्याव्यतिरिक्त चिनी लोकांची दृष्टी फारशी लांब पोचली नाही. आपण स्वतः कष्ट करावे व जमिनीची मशागत करून पोटभर खावे-प्यावे, अशा वृत्तीची जर एकंदर जनता बनली, तर तेही साहजिकच आहे. भौगोलिक परिस्थितीचाच हा एक परिपाक आहे. अशा-रीतीने एक ठरीव साच्याचे आयुष्य कंठण्याची सवय झाल्यामुळे जीवनार्थ कलहाची, आजूबाजूच्या प्रदेशावर वर्चस्व गाजविण्याची किंवा आपला देश सोडून परदेशांत जाऊन निरनिराळे अनुभव घेण्याची मनात ईर्षा होणे हेही जवळजवळ अशक्यच होते. आपल्या भारतातही काही शतकांपूर्वी उत्तर भारता-तील लोकांचे दैनंदिन जीवन अशाच प्रकारचे होते. परिणामी आजूबाजूला असलेल्या प्रदेशांतून ज्याप्रमाणे भारताच्या वैभवाने दिपून जाऊन निर-निराळ्या परकीयांच्या स्वाऱ्या सुरू झाल्या, त्याप्रमाणेच उत्तर चीनमधील समृद्ध जीवनाने मोंगोलिया, मांचूरिया, वगैरेंकडील सरहद्दीवर दर वर्षी हजारो लोकांची टोळधाड उत्तर चीनवर येऊन लुटालूट करी व चिनी जीवनावर आघात होऊन जिकडे तिकडे हाहाकार उडे. या प्रतिवर्षी वाढत्या प्रमाणावर होणाऱ्या परकीयांच्या स्वाऱ्यांवर बंधन घालणाऱ्या तत्कालीन चिनी राज्यकर्त्यांचे सर्व प्रयत्न निष्फळ ठरल्यानंतर, त्या वेळच्या चिनी राज्यकर्त्यांनी या सबंध उत्तर सरहद्दीवर एक एवढी लांब व प्रचंड भिंत उभारली, की जिला जगातील सात आश्चर्यांमध्ये एक स्थान आहे. आपल्या प्रजेचे जीवित व वित्त ह्यांच्या संरक्षणाकरिता त्यावेळच्या चिनी राज्यकर्त्यांनी जे निरनिराळे उपाय योजले त्यांमध्ये एक महत्त्वाचा म्हणजे सरहद्दीवरील मोंगोल, मांचू वगैरे भटक्या जमातींचे लोक ज्या प्रदेशातून येतात, ते प्रदेश स्वारी करून आपल्या सत्तेखाली आणणे. ह्याप्रमाणे हळूहळू चिनी साम्राज्याचा विस्तार होऊ लागून पूर्वेकडे कोरिया, मांचूरिया, उत्तरेकडे आंतर व बहिर्मोंगोलिया, पश्चिमेकडे तिबेट, सिनकिआंग वगैरे निरनिराळे प्रदेश चिनी साम्राज्यात समाविष्ट करण्यात आले. साम्राज्य वाढविणे सोपे असून ते टिकविणे मात्र

कठीण व त्रासाचे काम आहे, हा इतिहासातील एक सर्वमान्य सिद्धांतच आहे. उत्पत्ती, विकास व क्षय ह्या तीन अवस्था ज्याप्रमाणे एखाद्या देशाला, समाजाला लागू पडतात त्याचप्रमाणे ह्या तीन अवस्था आपणास साधारणतः प्रत्येक राजघराण्याचे बाबतीतही दिसून येतात. आपल्या भारतात व इतरत्रही ह्याची अनेक उदाहरणे देता येतील.

खिस्तजन्मापूर्वी सुमारे २,००० ते २,५०० वर्षे चीनमध्ये शांग घराण्याची सत्ता चालू असल्याचे दिसते. ह्या राजघराण्याचे अमदानीतच उत्तमोत्तम व सर्वोत्कृष्ट कलाकुसरीचे काम होऊ लागले. ब्रांझची भांडीही तयार होऊ लागली, रथ, घोडे ही वाहने उपयोगात आणली जाऊ लागली, निरनिराळ्या जातींच्या जनावरांचे कळप लोक पोसू लागले, घरबांधणीलाही सुरवात झाली; वगैरे गोष्टी निरनिराळ्या प्रकारच्या उत्खननांतून व पुराव्यांवरून सिद्ध झाल्या. शांग राजघराण्यातील शेवटचा पुरुष चाऊ हीसिन ह्याच्या अनन्वित दुष्कृत्यांमुळे शांग वंश नेस्तनाबूत झाला व पश्चिमी प्रदेशातील चौ नावाच्या भागातील लोकांनी शांग घराण्याचे राज्य बळकावले. चाऊ वंशाचा एक राजा, वेन वँग, त्याचा पुत्र वू वँग व त्याच घराण्यातील त्याच्या वंशजांनी चीनवरील आपली सत्ता सुमारे ९०० वर्षे अबाधित राखली. चाऊ राजवंशाच्या कारकीर्दीत चिनी राज्याचा विस्तार पुष्कळच झाला. परंतु शेवटी शेवटी मध्यवर्ती चाऊ राजघराण्याची शक्ती जसजशी कमकुवत होऊ लागली, तसतसे चीनमधील निरनिराळे भाग स्वतंत्र होऊ लागले व अखंड चिनी साम्राज्याऐवजी चीनमध्ये निरनिराळी लहान-मोठी राज्ये उदयाला आली.

चौ-राज्यकर्त्यांच्या काळात चीनची पुष्कळच सर्वांगीण सुधारणा झाल्याचे आपणास दिसून येते. पाटबंधाऱ्यांची सोय केल्यामुळे शेतीउत्पादनाला एक विशेष महत्त्व प्राप्त झाले. जसजशी सामाजिक व आर्थिक जीवनात प्रगती होऊ लागली, तसतशी कला, वाङ्मय वगैरे जीवनाच्या निरनिराळ्या भागांतही हळूहळू उत्क्रांती होऊ लागली. व्यापार व उद्योगधंदे सुरू झाले. जसजशी देशात सुबत्ता वाढू लागली, तसतशी सर्वसाधारण जनतेची धार्मिक व आध्यात्मिक दृष्टीही प्रगल्भ होऊ लागली. निसर्गाच्या अनुकूलतेमुळे, डोंगर, नद्या व पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश ही पंचतत्त्वे ह्यांची पूजा-अर्चा,

होम-हवन वगैरे गोष्टी सुरू झाल्या. ह्यांचबरोबर पूर्वजांचे स्मरण व चिंतन याची जरुर भासू लागली. धर्माला महत्त्व प्राप्त होऊ लागले. देवदेवतांची पूजा करण्याची प्रवृत्ती वाढू लागली. ह्याच चौ राजघराण्याच्या अमदानीत सुप्रसिद्ध चिनी तत्त्ववेत्ता कन्फ्यूशियस ह्याचा उदय होऊन त्याने आपली तत्त्वे लोकांस शिकविण्यास सुरवात केली.

चौ कारकीर्दीचा शेवटचा २५० वर्षांचा काल हा आपसातील यादवीने संपूर्णपणे ग्रासला गेला. समाजापेक्षा व्यक्तीचे महत्त्व जास्त, प्रत्येक व्यक्तीने आपल्या कुवतीप्रमाणे व शक्तीच्या जोरावर इतरांवर प्रभुत्व गाजवावे, अशा तऱ्हेची प्रवृत्ती मोकाट सुटली. ह्याच प्रवृत्तीमुळे चौ राजवट संपुष्टात आली व तिची जागा चिनवंशाच्या वायव्येकडील भागात राहणाऱ्या लोकांनी घेतली. ह्या चिनलोकांपैकी एक शीह हू आंग ही ह्याने, सुमारे ख्रिस्तजन्मापूर्वी २४६ व्या वर्षी आपल्यास सर्व चीनचा पहिला बादशहा म्हणून स्वतःला जाहीर केले. पूर्वीची चौ–अमदानीतील राज्यव्यवस्था ह्या शीह हू आंग हीने पार बदलून टाकली. त्याने आपली राजधानीही शेन्सी प्रांतातील सीआन येथे स्थापन केली. सर्व चीनभर एकच कायदा व एकाच प्रकारची वजने-मापे जारी करून शीह हू आंग हीने उद्योगधंदे व व्यापाराला चालना दिली. शीहने आपले राज्यही पुष्कळच वाढविले. ह्याच्याच अमदानीत जगातील सात आश्चर्यांपैकी एक म्हणजे चीनमधील 'मोठी भिंत' ही बांधण्यात आली.

शीहच्या मृत्यूनंतर त्याच्याएवढी कर्तृत्वशक्ती त्याच्यामागून आलेल्या राजांमध्ये नसल्याने चीनमध्ये पुन्हा यादवीस प्रारंभ झाला. कायद्याचा अमल नाहीसा होऊन 'बळी तो कान पिळी' हे तत्त्व प्रचारात येऊ लागले. साहजिकच अशा परिस्थितीत निरनिराळे पुंड आपआपली सत्ता मजबूत करण्याच्या प्रयत्नास लागले. ह्याच अनिश्चित राजकीय परिस्थितीत हान राजवंश उदयाला आला. चीनमधील अंतर्गत बंडाळी मोडून काढून हान राज्यकर्त्यांनी परदेशांवर आक्रमण करण्यास सुरवात केली. चँग चीएन ह्या सरदारास ह्या परदेशांवरील स्वाऱ्यांवर पाठविण्यात आले व पश्चिमेकडे थेट बॅक्ट्रिया देशापर्यंत आपल्या सैन्यानिशी तो पोचला. ह्या पश्चिमेकडील आक्रमणामुळेच पश्चिमेकडील डोंगर–दऱ्यांतून पूर्व-पश्चिम वाहतूक सुरू झाली व

मिंग सरदार एकमेकात भांडू लागले. इ. स. १६४४ चे सुमारास त्यांचेपैकी एक ली त्सु चेंग ह्याने पीकिंग व त्याच्या आजूबाजूच्या प्रदेशावर आपले प्रभुत्व सांगावयास सुरवात केली. ह्या ली त्सु चेंगच्या विरुद्ध दुसरा एक मिंग सरदार वू सॅन कुई ह्याने मँचू लोकांची मदत मिळविली. मँचू लोक जे एकदा केवळ मदतीकरता चीनमध्ये घुसले ते कायमचेच. ह्या मँचू घराण्यास चिंग घराणे असेही म्हणतात.

चिंग घराण्याची सत्ता चीनवर इ. स. १६६२ पासून तो थेट १९११ पर्यंत अव्याहत चालू होती. ह्या राजवटीत पोर्तुगीजांपाठोपाठ, फ्रेंच, डच, ब्रिटिश व शेवटी अमेरिकन परकीयांनी चीनशी व्यापार सांधण्याचा प्रयत्न सुरू केला. चीनमधून चहा, कापूस व रेशीम ह्यांची निर्यात करून त्याचे-ऐवजी चिनी जीवनात अत्यंत आवश्यक ठरलेली अफू भारतातून आणून वारेमाप किंमतीला चिनी लोकांस विकावी, ह्या हेतूने इंग्लिश लोकांनी ईस्ट इंडिया कंपनीला ह्या अतिपूर्वेकडील व्यापाराची जणू काही मक्तेदारीच सोपविली. पीतवर्णीय लोकांखेरीज इतरेजनांस शक्यतो चीनच्या भूमीला पाय लावू द्यावयाचा नाही, अशी सर्वसाधारण चिनी जनतेची तीव्र भावना असल्यामुळे परदेशांशी होणारा हा व्यापार फारच अडचणींचा होई. चिनी व्यापारी व श्वेतवर्णीय व्यापारी चीनच्या किनाऱ्यापासून दूर अंतरावर एक-मेकांस भेटत व तेथे देवाण–घेवाणीची बोलणी होत.

एकोणिसाव्या शतकाच्या सुरवातीपासून युरोपखंडात इंग्रज लोकांस कोणीही शत्रू उरला नाही. अतिपूर्वेकडील देश व युरोपियन राष्ट्रे ह्यांमधील व्यापार करण्याकरता उभारल्या गेलेल्या निरनिराळ्या राष्ट्रांच्या मंडळयाही मोडकळीला आल्या. इंग्रजांनी एकामागोमाग, स्पॅनिश, पोर्तुगीज, डच व फ्रेंच लोकांचा पराभव करून जगातील वर्चस्व स्वतःकडे खेचून आणल्यावर इंग्रजांची इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनी हीच एकमेव कंपनी अतिपूर्वेकडील व्यापाराची मक्तेदारी बळकावून बसली. चीनच्या भूमीवर परकीयांस शिरकाव मिळत नसल्याने व चीनसारख्या एका अती मोठ्या देशाशी व्यापार अमर्याद वाढण्याची शक्यता पटल्याने, इंग्रज लोकांनी साळसूदपणाने प्रथम मँचू राजवटीशी, चीनच्या काही बंदरांतून, इंग्रज व्यापाऱ्यांस व्यापार करण्याची व आपआपल्या वखारी उघडण्याची परवानगी मागावयास

सुरवात केली. इ. स. १८३४ च्या सुमारास चीनशी होणाऱ्या व्यापाराची इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीची मक्तेदारी संपुष्टात येऊन कोणाही इंग्रजाला चीनशी व्यापार करण्याची मुभा देण्यात आली. त्याच सुमारास लॉर्ड नेपीयर ह्यास इंग्रजांचा चीनच्या व्यापाराचा नियंत्रक-व्यवस्थापक म्हणून नेमण्यात आले. सरळमार्गाने चिनी लोक आपल्यास अनिर्बंध व्यापार चीनमध्ये करू देत नाहीत, असे दिसून येताच इंग्रज व्यापाऱ्यांनी इतर मार्गांची कास धरण्यास सुरवात केली. चिनी लोकांस अत्यंत आवश्यक अशी वस्तू म्हणजे अफू. ह्या अफूचे दुष्परिणाम लक्षात घेऊन चिनी राज्यकर्ते ह्या अफूच्या व्यापारावर नियंत्रण बसवू इच्छित होते; परंतु ह्या अफूच्या व्यापारावरच अनेक इंग्रज व्यापारी गडगंज नफा मिळवीत असत. चिनी लोकांस अफूच्या व्यसनापासून मुक्त जरी करता आले नाही, तरी चिनी लोकांचे ह्या व्यसनावर मर्यादा असावी, अशी चिनी राज्यकर्त्यांची सार्थ इच्छा होती व तीही वावगी नव्हती. परंतु व्यापार म्हणजे नीती-अनीती, चांगले-वाईट, कायदेशीर-गैरकायदेशीर, वगैरे गोष्टी लक्षात घेण्याचे कारणच काय? असे म्हणून शक्य त्या मार्गांनी व प्रसंगविशेषी जबरदस्तीनेही ह्या अफूची अनिर्बंध खरेदी-विक्री करण्याची मुभा इंग्रज व्यापाऱ्यांस हवी होती. चिनी राज्यकर्त्यांनी ह्याच सुमारास अफूच्या एकंदर व्यापारावरच बंदी घातली व ही बंदी बरोबर होते आहे किंवा नाही हे पाहण्याकरिता लिन त्सेह्सू ह्या नावाच्या आपल्या एका अधिकाऱ्यास कँटन येथे नेमण्यात आले. अफूचा व्यापार करणाऱ्या व्यापाऱ्यास आपल्याजवळील असलेली अफू व त्याचा साठा चिनी अधिकाऱ्यांस कळविणे भाग पडले. ह्या विरुद्ध ब्रिटिशांनी बंड उभारून यांगत्से नदी व पीकिंग-नॅनकिंग ह्यास जोडणारा ग्रँड कॅनाल येथपर्यंत आपल्या सैन्यानिशी चढाई केली. इंग्रज व्यापाऱ्यांच्या पाठीशी वाटेल ती मदत देण्यास इंग्रज सरकार सदैव तयार असे, हेच ह्यावरून सिद्ध झाले. यांगत्से नदीचा दक्षिण किनारा इंग्रज फौजांनी अडविल्यामुळे चिनी लोकांची अगदी नाकेबंदी झाली. इंग्रजांनी चिनी सरकारकडे एक निर्वाणीचा खलिता पाठविला. इंग्रज व्यापाऱ्यांचे पाठीमागे उभी असलेली लष्करी व नाविक सत्ता ध्यानात येताच चिनी सरकार गडबडले व ह्याचाच परिणाम म्हणजे इ. स. १८४२ साली नॅनकिंग येथे झालेला चीन व इंग्लंड यांमधील

तह होय. नॅनकिंग येथे जो तह झाला, त्यातील मुख्य मुद्दे खालीलप्रमाणे होते :—

( १ ) हाँगकाँग हे चीनच्या दक्षिणेकडील बेट इंग्रजांच्या हवाली करावे.

( २ ) इंग्रज व्यापाऱ्यांचा चीनमधील व्यापार वाढून तो जास्त सुलभ व्हावा म्हणून चिनी सरकारने कंतान, अमॉय, फू चौ, निंगपो व शांघाय अशी पाच बंदरे इंग्रज व्यापाऱ्यांस खुली करावीत. ह्या पाच बंदरांत इंग्रज व्यापाऱ्यांचे प्रतिनिधीस वास्तव्य करण्याची मुभा असावी. ह्या बंदरातून होणाऱ्या आयात निर्यात मालांवर जकात इंग्रज व चिनी प्रतिनिधी ह्यांच्या विचाराने ठरविण्यात यावी.

( ३ ) ह्या बंदरात इंग्रज नागरिकांकडून घडलेले गुन्हे इंग्रज न्यायाधीशासमोर चालावे व ह्या इंग्रज गुन्हेगारांस विशेष सवलती मिळाव्यात.

( ४ ) चीनमधील व्यापाराचे बाबतीत इंग्रज व्यापाऱ्यांना इतर परकीय व्यापाऱ्यांपेक्षा विशेष जास्त सवलती मिळाव्यात.

इंग्रजाचा चीनमधील हा झालेला चंचुप्रवेश इतर युरोपियन राष्ट्रांचे डोळयांत सलू लागला. इंग्रजामागोमाग, फ्रेंच, डच व अमेरिकन राष्ट्रांनीही चीनबरोबर वरीलसारखेच करार करण्यास सुरवात केली. चीनसारख्या एका मातबर देशात, मध्यवर्ती सत्तेचा कमकुवतपणा पाहून हे परकीय उचले भाऊगर्दी करू लागले. व्यापाऱ्यांना चीनमध्ये चंचुप्रवेश मिळाल्याबरोबर ख्रिश्चन पाद्री, धर्मोपदेशक व मागासलेल्या मानवांची उन्नती घडवून आणण्याच्या उदात्त हेतूने प्रेरित झालेले शिक्षणतज्ज्ञ व भिषग्वर ह्यांनीही आपआपली सोवळी मांडी चीनमध्ये निरनिराळ्या जागी ठेवण्यास सुरवात केली. इंग्रज, फ्रेंच, जर्मन, पोर्तुगीज, इटालियन ह्यांचे मागोमाग थोड्याच वर्षात बेल्जियन व स्वीडिश लोकांनीही चिनी सरकारकडून व्यापारी सवलती मिळविल्या.

इ. स. १८४२–४४ चे दरम्यान चिनी सत्ता व परकीय गौरवर्णीय ह्यांमध्ये झालेले तह दोघांनाही मनापासून पसत नव्हते. चिनी सत्तेवर करण्यात आलेली परकीयांची जबरदस्ती म्हणा किंवा मुस्कटदाबी म्हणा, चिनी राज्यकर्त्यांच्या मनात डाचत होती, तर निरनिराळ्या युरोपीय व्यापाऱ्यांस मिळालेल्या सवलती त्यांना अपुऱ्या वाटू लागल्या. बोकयाला ज्याप्रमाणे

लोण्याचा भलामोठा गोळा समोर दिसला म्हणजे त्याचे एका लहानशा भागाने समाधान होत नाही, त्याप्रमाणे चीनशी चालणारा व्यापार अनिर्बंध आपल्या हाती सर्वस्वी असावा व अमर्याद नफा मिळविण्यास आपणास मुभा असावी, अशी ह्या युरोपीय व्यापाऱ्यांची इच्छा होती. थोडक्यात ज्या दोन बाजूंमध्ये हे तह झाले, त्या दोन्हीही बाजू हा तह कसा मोडता येईल, ह्याची जणू वाटच पाहात होत्या. अशा अटीतटीच्यावेळी एखादे क्षुल्लक कारणही भडका उडवून देण्यास पुरेसे होते. इ. स. १८५६ मध्ये इंग्रजांच्या युनियन जॅकचा अपमान झाल्याचे निमित्त करून इंग्रज व अमेरिकन सैन्यांनी चीनमध्ये चढाई आरंभिली. ह्याच वेळी युरोपातील क्रिमियन युद्धात फ्रेंचांचे इंग्रजांशी सहकार्य झाल्यामुळे व चीनमधील उचलेगिरीमध्ये आपलाही थोडासा भाग असावा, असा दूरवर विचार करून फ्रेंचांनी इंग्रजांबरोबर चिनी लोकांशी सुरू झालेल्या संघर्षात हातमिळवणी केली.

इ. स. १८५७ मध्ये क्रिमियामधील लढाई संपवून व भारतातील शिपायांच्या बंडाचा मोड करून इंग्रज लोक मोकळे होताच त्यांनी अमेरिकन व फ्रेंच सहकार्याने प्रथम कंतानवर स्वारी करून त्या बंदराचा संपूर्ण ताबा घेतला व टीएन्टसीन बंदरावर आरमार पाठवून त्यांनी चीनची राजधानी पीकिंग ह्याला शह दिला. ह्याही वेळी चिनी राज्यकर्त्यांचा नाइलाज होऊन त्यांनी इ. स. १८५८ मध्ये टीएन्टसीनचा तह केला. ह्या तहातील मुख्य कलमे खालीलप्रमाणे होती :—

( १ ) अफूवरील जकातीमध्ये फेरफार करून अफूची आयात कायदेशीर ठरविण्यात आली.

( २ ) पीकिंग या राजधानीत युरोपियन राष्ट्रांच्या ( परराष्ट्रांच्या ) प्रतिनिधींच्या निवासास सोयी करण्याचे कबूल करण्यात आले.

( ३ ) पीतवर्णीयांशिवाय इतर परकीयांस चीनमध्ये कोठेही प्रवास करण्याची मोकळीक देण्यात आली.

( ४ ) खिश्चन धर्मोपदेशकास, मग ते चिनी असोत किंवा इतर परकीय असोत; आपल्या धर्मपंथाचा प्रसार करण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य देण्यात आले.

( ५ ) यांगत्से नदीवर परकीय बोटींना संचाराची पूर्ण मुभा मिळाली.

( ६ ) कंतानच्या तहात नमूद केल्या गेलेल्या बंदरांखेरीज आणखीही काही बंदरांत परकीय व्यापाऱ्यांस आपआपला व्यवसाय करण्यास परवानगी देण्यात आली.

( ७ ) परकीय नागरिकांस चीनमध्ये मिळालेल्या विशिष्ट हक्कामध्ये ( Extra Territoriality ) वाढ करण्यात आली.

( ८ ) व्यापारावरील नियमन व जकातवसुली यात जास्त सुधारणा करण्याचे ठरले.

( ९ ) ह्या चिनी व परकीयांच्या संघर्षात परकीयांस झालेल्या नुकसानीची नुकसानभरपाई करून देण्याचे चिनी सरकारने कबूल केले.

टीएन्टसीनच्या तहाप्रमाणे ब्रिटिश व इतर परकीय सरकारांनी आपआपल्या वकिलाती पीकिंगमध्ये उघडण्याची तयारी करताच चिनी सरकारने, केवळ पोरकटपणा करून ह्या वकिलातीत अडथळे आणण्याचा प्रयत्न सुरू करताच, परकीय सैन्यांनी टीएन्टसीनचा ताबा घेऊन ते पीकिंगवर चाल करून गेले. परकीय सैन्ये पीकिंगमध्ये शिरणार, असे पाहताच चिनी बादशहा पीकिंग सोडून उत्तरेकडे पळून गेला. विजयोन्मादाने धुंद झालेल्या इंग्रज सैन्याने पीकिंगमध्ये लुटालूट व जाळपोळ सुरू करून त्यांनी चिनी बादशहाचा पीकिंगमधील ' समर पॅलेस ' हा राजवाडाही जाळून बेचिराख केला. इतके झाल्यावर चिनी सरकारने संपूर्ण शरणागती पत्करून पुन्हा नवीन तह केला. टीएन्टसीन तहात कबूल केलेल्या गोष्टींखेरीज चिनी राज्यकर्त्यांनी खाली दर्शविलेल्या आणखीही काही सवलती कबूल केल्या.

( १ ) नुकसानभरपाईची रक्कम बरीच वाढविण्यात आली.

( २ ) टीएन्टसीन बंदरही परकीयांस व्यापाराकरिता खुले करण्यात आले.

( ३ ) परकीय वकिलातीत पुष्कळच वाढ करण्यात आली.

( ४ ) हाँगकाँगच्या समोरील कौलून भाग ब्रिटिशास द्यावा लागला.

( ५ ) फ्रेंच धर्मोपदेशकांस चीनमध्ये कोठेही स्थावर मिळकत विकत घेण्याची परवानगी मिळाली.

( ६ ) उस्सूरी नदीच्या पूर्वेकडील टापू रशियाला देण्यात आला. ह्या पूर्व किनाऱ्यावरच नंतर रशियाने आपले पूर्वेकडील आरमारी नाके-व्हलॅडिव्होस्टोक तयार केले.


होडीतील घर
प्रदीर्घ
वृद्धेची न्याहारी
फळविक्रेती
रेड्यावर
बसलेला
शेतकरी

एकंदरीने चिनी राज्यकर्त्यांच्या कमकुवतपणामुळे परकीयांचे चांगलेच फावले. चिनी राज्यकर्त्यांचे चीनवरील सार्वभौमत्व संपुष्टात आले. ह्याचा परिणाम म्हणजे सर्वसाधारण चिनी जनतेत परकीयांविषयी व चिनी राज्यकर्त्यांविषयी चीड उत्पन्न होऊन, देशात अंतस्थ अस्वस्थता व प्रचलित राजसत्तेविरुद्ध बंडाचे विचार सुरू झाले.

निरनिराळ्या युरोपियन राष्ट्रांनी चीनमध्ये आक्रमण करून चिनी व्यापार व चीनमधील सत्ता बळकवण्याचे प्रयत्न सुरू केल्याबरोबर, चीनच्या पूर्वेल असलेल्या जपानी लोकांस स्वस्थ बसणे शक्य नव्हते. युरोपियन राष्ट्रांच्या बरोबरीने चीनमधील व्यापारात आपलाही हिस्सा असावा, असे वाटून जपानी लोकांनी आपली दृष्टी प्रथम चीनच्या पूर्व–ईशान्येकडील कोरियाचे द्वीपकल्पावर वळविली. थोडीशी कुरापत काढून इ. स. १८९४ मध्ये जपानने चीनशी लढाई पुकारली. चिनी सैन्याचा पार धुव्वा उडाला. जपानी सैन्याने कोरिया ताब्यात घेतला, इतकेच नव्हे तर शांटुंग द्वीपकल्प व मांचूरियावरही चढाई केली. वाय हाय वाय, पोर्ट आर्थर वगैरे बंदरांचा ताबा घेऊन जपानी सैन्याने पीकिंगच्या रोखाने कूच करण्यास सुरवात करताच चिनी सरकारने शरणागती पत्करून जपानबरोबर तह केला. ह्या तहामुळे जपानला पुढील फायदे मिळाले :—

( १ ) चीनने कोरियावरील आपले प्रभुत्व नष्ट केले.

( २ ) फोर्मोसा जपानला मिळाला.

( ३ ) मांचूरियाचा समुद्र किनारपट्टीचा भाग – लायाओटुंगचे द्वीपकल्प-जपानला खंडाने देण्यात आला.

( ४ ) २० कोटी टाएल्सएवढी खंडणी जपानला मिळाली.

( ५ ) जपानी व्यापाऱ्यांस युरोपियनांचे बरोबरीने व्यापारी सवलती मिळाल्या.

वरीलपैकी मांचूरियाचा भाग – लायाओटुंगचे द्वीपकल्प – जपानी लोकांस नंतर रशिया, फ्रान्स व जर्मनी ह्या राष्ट्रांच्या दडपणामुळे चीनला परत द्यावे लागले. अतिपूर्वेकडील जपानसारखे एक चिमुकले श्वेतेतर राष्ट्र पुढे मागे युरोपियनांसही भारी होईल या भीतीचे पोटी, जागतिक राजकारणात होणारा

जपानचा संभाव्य प्रवेश शक्य तितका मर्यादित करावा, ह्या उद्देशानेच रशिया, जर्मनी, फ्रान्स वगैरे राष्ट्रांनी जपानला मिळणारा मँचूरियाचा घास जपानचे तोंडातून काढून घेण्याचा यशस्वी प्रयत्न केला. परंतु ह्यामुळे जपान दबले न जाता थोड्याच वर्षांत जपानने रशियासारख्या एका बलाढ्य युरोपियन राष्ट्राबरोबर युद्ध करून त्याचा पूर्ण पराभव करून आपल्या अंगचे पाणी युरोपियन राष्ट्रांस तर दाखविलेच, पण जागतिक राजकारणात जपानला भागीदार करून घेण्याशिवाय गत्यंतर नाही, अशी परिस्थिती निर्माण केली.

जपानच्या चीनविरुद्धच्या कारवाईने चीनमध्ये हक्कसंबंध गुंतलेल्या श्वेत-वर्णीय राष्ट्रांत चीनमधील जास्तीतजास्त फायदा आपणास मिळावा याबद्दल रस्सीखेच सुरू झाली. चारी बाजूंनी चीनच्या आर्थिक मुसक्या दाबण्याचे प्रयत्न सुरू झाले. जपानला देण्यात यावयाची खंडणी देण्यासाठी चिनी सरकारने जे कर्ज उभारले, त्यातील जास्तीत जास्त भाग आपला असावा, असे प्रत्येक युरोपियन राष्ट्रांस वाटू लागले. रशियाने आपली ट्रान्स सायबेरीयन रेल्वे मँचूरियातून व्हलॅडिव्होस्टोकपर्यंत नेण्याची घोषणा करून मँचूरियातून अशी रेल्वे बांधण्याकरिता चिनी सरकारची परवानगी मिळविली. फ्रान्सने काही चिनी खनिजांबद्दलचे हक्क मिळविले. इंग्लंडला चीन व ब्रह्मदेश ह्यांच्या सरहद्दीवरील भागात खनिजांचे काही अधिकार मिळाले. जर्मनीनें त्सिंगहौ बंदरावर हल्ला करून ते हस्तगत केले. कियाचौ व त्सिंगहौ ही ही दोन्ही बंदरे जर्मनीला ९९ वर्षांच्या कराराने देण्यात आली. रशियाने पोर्ट आर्थर व डायरेन ह्या दोन बंदरांचा ताबा २५ वर्षांच्या कराराने मिळविला. ह्याच वाहत्या गंगेत फ्रान्सनेही, शांगटुंग प्रांतातील क्वांगचौवन हा भाग ९९ वर्षांच्या पट्ट्याने मिळवून आपला हात धुऊन घेतला.

निरनिराळ्या युरोपियन राष्ट्रांच्या चीनमधील चाललेल्या कारवाया ह्या त्या वेळच्या जागतिक आंतरराष्ट्रीय राजकारणाचाच एक भाग होता चीनमध्ये आपल्या राष्ट्राचे जास्तीतजास्त भांडवल गुंतविले जावे अशी प्रत्येक युरोपियन देशाची इच्छा होती. चीनच्या आगतिकपणाचा फायदा घेऊन, चिनी राज्यकर्त्यांकडून जबरदस्तीने वाटेल तशा फायदेशीर गोष्टी कबूल करवून घ्यावा, असा हा युरोपियन राष्ट्रांचा खाक्याच होऊन बसला. रशियाने मांचूरियात लोहमार्ग बांधण्याचा मक्ताच मिळविला. पीकिंग ते हँको हा राजमार्ग

बांधण्याकरिता बेल्जियममधील धनिकांनी भांडवल पुरविण्याचे कबूल केले. शांटुंग द्वीपकल्पातील निरनिराळे रेल्वेमार्ग व टीएंटसीन ते पुकावपर्यंतचा लोहमार्ग बांधण्याकरिता जर्मन धनिकांनी भांडवल पुरविण्याचा मक्ता मिळविला. क्वांगटुंग, क्वांगसी व युनान त्या प्रांतांतील लोहमार्ग बांधून देण्याचा मक्ता फ्रान्सला मिळाला. एका अमेरिकन कंपनीला कंतान ते हँको हा राजमार्ग बांधण्याचे काम मिळाले, परंतु नंतर ह्या कंपनीचा सबंध ताबाच बेल्जियन लोकांचे हाती गेला.

वरीलप्रमाणे चीनची लांडगेतोड चालू असता, सर्वसाधारण चिनी प्रजा मात्र असंतोषाने आतल्याआत धुमसत होती. युरोपियन राष्ट्रांच्या चीनमधील अधाशीपणाला थोडासा लगाम घालण्याचे हेतूने अमेरिकेचे त्यावेळचे चीन-मधील वकील जॉन हे ह्यांनी इंग्लंड, फ्रान्स, रशिया, जर्मनी, इटली वगैरे राष्ट्रांस त्यांनी चीनमधील आपआपल्या भागात (Spheres of interest) इतर राष्ट्रांच्या व्यापारावर अनिष्ट असे निर्बंध घालू नयेत-सर्वांस समान संधी द्यावी - अशा आशयाची सूचना केली. तत्त्वतः वरील सर्व राष्ट्रांनी अमेरिकेची ही सूचना मान्यही केली.

जपानबरोबर झालेल्या युद्धात चीनचा जो सपशेल पराभव झाला, त्याचे कारण म्हणजे पाश्चात्त्यांचे अनुकरण करून जपानने केलेली आपली प्रगती होय, असे समजून चीनमध्ये निरनिराळ्या शहरांत लहान लहान संघ स्थापन करण्यात आले. ह्या संघांचे उद्दिष्ट म्हणजे चिनी जनतेमध्ये जपानचे उदाहरण देऊन, जपानी लोकांनी केवळ पाश्चात्त्यांचे अनुकरण केल्यामुळेच त्यांची सर्वांगीण सुधारणा झाली व म्हणून चिनी जनतेनेही आपल्या जुनाट व बुरसट कल्पना टाकून देऊन पाश्चात्त्यांचे अनुकरण करण्यास सुरवात केली, तर चीनला चांगले दिवस येण्यास फारसा अवधी लागणार नाही, अशा तऱ्हेचा प्रचार करणे, हा होता. चँग चीह टुंग ह्या चिनी सम्राटाच्या एका प्रतिनिधीनेही अशा तऱ्हेच्या फेरविचाराची व सुधारणावादी विचारसरणी प्रसुत करण्यास बरीच मदत केली. कांग यू वाय ह्या नावाच्या दुसऱ्या एका चिनी विद्वानाने त्या वेळच्या चिनी सम्राटास ह्या नवीन सुधारणावादी चळवळीचे महत्त्व पटवून देऊन, चिनी प्रजेस उद्देशून अधूनमधून बादशाही फरमानेही काढविली. ह्या वेळी चीनची राजसत्ता एका तरुण व अनभिज्ञ अशा

सम्राटाकडे होती. चीनच्या बादशहाकडे वशिला लावून चीनच्या प्रजेस पाश्चात्त्यांचे अनुकरण करण्यास प्रोत्साहन देण्याकरिता काढलेली फरमाने म्हणजे भविष्यकाळात चिनी राजसत्तेला धुळीस मिळविण्याच्या प्रयत्नांचा श्रीगणेशा आहे, असे समजून राजमातेने ह्या तरुण बादशहाला पदच्युत करून सर्व सत्ता आपल्या हाती घेण्याचे कारस्थान रचून ते अमलातही आणले. चीन-मधील वाढत्या असंतोषास ह्या राज्यक्रांतीमुळे आणखी मदतच झाली. राज-मातेविरुद्ध चिनी लोकमत अत्यंत प्रक्षुब्ध होऊन, परकीयांस घालवून द्या, आपला देश स्वतंत्र करा, अशा घोषणा देत चहूबाजूंनी चिनी लोकांनी बंडे उभारली. ह्या बंडासच 'बॉक्सर' बंड असे म्हणतात. परंतु ह्या बंडाचाही परकीय राष्ट्रांचे मदतीने बीमोड करण्यात आला. परकीयांना त्यांच्या झालेल्या नुकसान-भरपाईबद्दल एक खूप मोठी खंडणी देण्यात आली व शिवाय काही किरकोळ फायदेही उकळण्यात आले.

बॉक्सर बंडानंतर मात्र चिनी प्रजेत मांचू राजघराण्याबद्दल तीव्र नापसंतीची लाट उसळली. मांचूरियातही रशियाने निरनिराळ्या प्रकाराने चीनचे लचके तोडण्यास सुरवात केली होती. तिला जपानकडून विरोध सुरू झाला व ह्याचा शेवट रूसो-जपानी युद्धात होऊन जपानने रशियाचा पूर्ण पराभव केला. एका पौर्वात्य राष्ट्राने एका बलाढ्य युरोपियन राष्ट्राचा पराभव केला, ही गोष्ट युरोपियन राष्ट्रांत जशी खटकली, त्याप्रमाणे पौर्वात्य राष्ट्रांतही जपान-बद्दल अभिमान वाटू लागून, आपणही आपल्यावरील युरोपियन वर्चस्व संपुष्टात आणणे अवघड नाही, अशी भावना निरनिराळ्या पौर्वात्य राष्ट्रांत मूळ धरू लागली.

बॉक्सर बंडानंतर चीनमध्ये नवीन युगाला सुरवात झाली. प्रथम शिक्षणा-मध्ये आमूलाग्र सुधारणा करण्यात येऊन नवीन नवीन प्राथमिक, माध्यमिक विद्यालये सुरू करण्यात आली. राज्यशासन यंत्रामध्येही निरनिराळ्या सुधारणा चालू करण्यात आल्या. तिसरी गोष्ट म्हणजे चीनमध्ये लोकशाही राज्यव्यवस्था असावी, अशी मागणी सुरू करण्यात आली. इ. स. १९११ चे सुमारास एका क्षुल्लक कारणावरून चीनमधील मांचू सत्तेविरुद्ध पुन्हा बंडाचे निशाण रोवले गेले. मांचू राजसत्तेने आपल्या एका विश्वासू लष्करी सरदारास–युआनशिकाई यास सर्वाधिकार देऊन ह्या बंडाचा बीमोड करण्यास पाचारण केले. युआन-

शिकाईने लवकरच अधिकारसूत्रे हाती घेऊन प्रथम चिनी राष्ट्रवाद्यांशी समझोता केला. चीनमधील मांचू राजसत्तेचा शेवट हे ह्या समझोत्यातील सर्वांत महत्त्वाचे कलम होते. चीनमधील राजवंश निवृत्त केला गेला, तरी सर्व सत्ता युआनशिकाईचे हातीच राहिली. युआनशिकाई पण चीनमधील राजसत्ता संपूर्णपणे चिनी लोकांच्या हाती जाऊ नये, अशाच मताचा होता. ह्यामुळे युआनशिकाईचे हाती सर्व सत्ता आल्यानंतर चीनमध्ये पुन्हा अंतर्गत यादवीची चिन्हे दिसू लागली. युआनशिकाईबरोबर समझोता करणाऱ्या राष्ट्रवाद्यांनी – त्यांनी आपल्या स्वतःच्या पक्षास क्युओमिंटांग असे नवीन नाव घेतले होते – आपली तयारी जोरात सुरू ठेवून, आपले स्वतंत्र सैन्य उभे केले. ह्या सैन्यास सर्व तऱ्हेची मदत मिळविण्याकरिता, क्युओमिंटांगचे त्या वेळचे अध्यक्ष डॉ. सन यत सेन यांनी रशियाशी बोलणी सुरू केली. लवकरच यूआनशिकाईस आपले स्थान सोडावे लागले व राष्ट्रवाद्यांस त्यांचा मार्ग मोकळा झाला.

ली यूवान हुंग हा क्युओमिंटांग पक्षाचा सभासद चिनी प्रजासत्ताकाचा अध्यक्ष झाला, तरी एकंदर राजकीय परिस्थिती फारशी बदलली नाही. इ. स. १९१४ मध्ये युरोपात महायुद्ध सुरू झाले. इंग्लंड व जपान यांच्यामधील मैत्रीचा तह लक्षात घेऊन व इंग्रज-युरोपियन महायुद्धात गुंतले आहेत, असे पाहून जपानने इ. स. १९१५ मध्ये पीकिंग सरकारकडे २१ मागण्यांचा एक खालता पाठविला. त्यातील मुख्य मागण्या अशा :—

( १ ) शांटुंग द्वीपकल्पातील जर्मनीच्या ताब्यातील सर्व प्रदेश जपानला द्यावा. शांटुंग द्वीपकल्पामध्ये जपानखेरीज कोणत्याही दुसऱ्या परकीय राष्ट्रांस शिरकाव देऊ नये.

( २ ) पोर्ट आर्थर, डायरेन व दक्षिण मांचूरिया आणि पूर्व आंतर-मंगोलियातील जपानी लोकांस देण्यात आलेले हक्क ९९ वर्षांच्या मुदतीचे करावेत. ह्याच भागातील खनिजांचे हक्कही जपानी लोकांसच द्यावेत.

( ३ ) हान येह पिंग ह्या सर्वांत मोठ्या चिनी लोखंड व पोलाद कारखान्यात जपानला भागीदारी मिळावी व जपानखेरीज इतर कोणत्याही अन्य राष्ट्राला ह्या कंपनीच्या भांडवलाची विक्री करू नये.

( ४ ) जपानच्या संमतीशिवाय चीनने कोणत्याही परकीय राष्ट्रांस चीनचा कोणताही भाग खंडाने किंवा इतर काही आमिषाने वापरावयास देऊ नये.

( ५ ) चीनच्या मध्यवर्ती शासनव्यवस्थेत जपानी अधिकारी नेमावेत. चीनच्या पोलीसदलात जपानी अधिकारी नेमावेत. चिनी सैन्याला लागणाऱ्या दारूगोळ्यांपैकी किमान ५० टक्के दारूसामान जपानकडूनच घ्यावे.

( ६ ) शाळा, देवळे, दवाखाने वगैरेंसाठी जपानी संस्थांस जरूर लागली तर चीनमध्ये कोठेही त्यांना स्थावरमिळकत करण्याची संपूर्ण मुभा असावी,

जपानी मागण्यांमुळे चीनच्या स्वातंत्र्यावरच एक प्रकारे गदा आणली गेली. त्याबरोबर परकीय राष्ट्रांनाही आपल्या कर्तृत्वास जपानकडून शह बसल्याची जाणीव झाली. पहिल्या महायुद्धानंतर इंग्लंड व अमेरिकेत चिनी राष्ट्रवाद्यांस भरपूर पाठिंबा मिळू लागला. इकडे चीनमध्ये राष्ट्रवाद्यांमध्ये दोन तट पडल्याची स्पष्ट लक्षणे दिसून येऊ लागली. विशेषतः युरोपातील महायुद्ध संपल्यानंतर चीनच्या सर्वांगीण उन्नतीकरता परकीय मदत घेण्याच्या प्रश्नावरच क्यूओमिंटांग पक्षात मतभेद दिसून आले निर्भेळ राष्ट्रवादी गटाचे पुढारी जनरल चिआंग कै शेक हे असून, त्यांना दक्षिणेतील चिनी प्रदेशात भरपूर पाठिंबा होता. ह्याचे उलट रशियाची मिळेल ती मदत कोणत्याही अटी न घालता घ्यावी, असे म्हणणारे, यांनाच नंतर साम्यवादी पुरोगामी गट संबोधण्यात येऊ लागले. ते राष्ट्रवादी – साम्यवादी होते, त्यांचे माओत्सेतुंग हे पुढारी बनले व त्यांना चीनच्या उत्तरेकडील भागातून पाठिंबा मिळू लागला. चीनमधील ह्या दुफळीचा फायदा जपानने घेण्याचे ठरवून, जपानी सैन्याने प्रथम मांचूरियावर स्वारी केली. चँग ह्यूअे लिआंग ह्या चिनी सर्वाधिकाऱ्यास बाजूस सारून जपानने मांचूरियात आपल्या हाताखालील एक तात्पुरते सरकार स्थापन केले. लवकरच मांचू राजघराण्या-तील एका लहान राजपुत्रास मांचूरियाचे गादीवर बसवून मांचूरियाचे एक स्वतंत्र राष्ट्र स्थापन करून त्याला ‘ मांचूकुओ ’ असे नाव दिले. ह्या मांचूकुओ राष्ट्राबरोबर जपानने असा एक तह केला, की ज्यामुळे सबंध मांचूरियात जपान सर्व सत्ताधारी बनले.

चिनी राष्ट्रवाद्यांनी राष्ट्रसंघात व इतर युरोपियन देशांत आपले गाऱ्हाणे व जपानी लोकांनी केलेली चीनवरील बळजबरी ह्याविषयी अनेक प्रयत्न केले, परंतु त्यांचा काहीही उपयोग झाला नाही. राष्ट्रसंघाने जपानला दोषी ठरविल्याबरोबर जपानने राष्ट्रसंघातील आपल्या सभासदत्वाचा राजीनामा दिला. ह्यानंतर लौकरच जपानी लोकांनी आपली दृष्टी मुख्य चीनकडे वळविली. आपल्या सर्व सैन्य व आरमारानिशी त्यांनी चीनच्या सर्व पूर्व किनाऱ्यावर इ. स. १९३७ मध्ये चढाई केली. थोड्याच अवधीत जपानी फौजांनी चीनचा समंध पूर्व किनारा तर ताब्यात घेतलाच, पण त्यांनी पश्चिमेच्या रोखाने चढाई सुरू केली. ह्या जपानी आक्रमणास तोंड देण्याचा क्यूओ-मिंटांग पक्षाच्या सैन्यानेही प्रयत्न सुरू केला. काही काळपर्यंत राष्ट्रवादी व साम्यवादी चिनी गट एकत्रपणे जपानी आक्रमणाला तोंड देत असताच दुसरे महायुद्ध सुरू झाले. जपान शत्रू राष्ट्र झाले व याचा परिणाम म्हणजे जपानी लोकांविरुद्ध लढण्याकरिता चिनी राष्ट्रवाद्यांस अमेरिका व इंग्लंड वगैरे परकीय राष्ट्रांची भरपूर मदत मिळू लागली. चिनी राष्ट्रवाद्यांचे पुढारी जनरल चिआंग कै शेक यास इंग्लंड, रशिया व अमेरिका यांच्या बरोबरीने आंतरराष्ट्रीय राजकारणात स्थान मिळू लागले.

जनरल चिआंग कै शेक ह्यांच्या राष्ट्रवादी पक्षाला, म्हणजेच क्यूओमिंटांग पक्षाला, चिआंग कै शेक ह्यांच्या व्यक्तिमत्त्वामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात महत्त्व येऊ लागले, परंतु चीनमध्ये तरी त्यांचे व साम्यवादी पक्षाचे उघड-उघड झगडे होऊ लागले. विशेषतः दुसऱ्या महायुद्धात जपानचा पराभव झाल्यावर चीनवरील जपानी आक्रमणाची काळजी दूर झाली, तरी अंतःस्थ यादवीला मात्र जास्तीत जास्त जोर चढला. नॅनकिंग येथील राष्ट्रवादी सरकार व पीकिंग येथील साम्यवादी सरकार यांमधील खेचताव पराकोटीला पोचला. दोन्ही पक्षांतील विचारवंतांस ह्या यादवीबद्दल काळजी वाटू लागून त्यांनी ह्या दोन्ही सरकारांत एकी घडवून आणण्याचे अनेक प्रयत्न केले. साम्यवादी सरकारने आपले सैन्य ईशान्येकडील मांचूरियाचे बाजूकडील चीनचा मुलूख काबीज करण्याकरिता रवाना केले. जपानची शरणागती झाल्यावर मांचूरिया-मध्ये स्थिर सरकार असे नव्हतेच. चिआंग कै शेक ह्यांच्या क्यूओमिंटांग पक्षास अमेरिकेकडून मदत मिळण्यास सुरवात झाली व अमेरिकन सरकारने

जनरल जॉर्ज मार्शल ह्यांची चीनमधील अमेरिकन सरकारचे प्रतिनिधी म्हणून नेमणूक केली. जनरल मार्शल यांनी क्यूओमिटांग व साम्यवादी चिनी पक्षात अनंत परिश्रम करून एकोपा आणण्याचा कसून प्रयत्न केला. परंतु दोन्ही पक्ष अटीतटीला पडल्यामुळे जनरल मार्शल ह्यांचा नाइलाज झाला. इ. स. १९४६ ते १९५० पर्यंत नॅनकिंग व पीकिंग सरकारांच्या सैन्यात घनघोर लढाया झाल्या. क्यूओमिटांग पक्षातही अंतर्गत भांडणे सुरू झाली व ह्या सर्वांचा शेवट क्यूओमिटांग सैन्याचा पूर्ण पराभव होण्यात झाला. एक ऑक्टोबर १९४९ रोजी पीकिंग येथे साम्यवादीप्रणीत चिनी प्रजासत्ताकाची स्थापना झाली. जनरल चिआंग कै शेक व त्यांचे क्यूओमिटांगमधील सहकारी यांनी अमेरिकेच्या मदतीने, जपानकडून चीनला मिळालेल्या टैवान बेटाचा ताबा घेऊन तेथे आपले स्वतंत्र राष्ट्रवादी चिनी सरकार स्थापन केले.

पीकिंग येथे 'साम्यवादी सरकार'ची प्राणप्रतिष्ठा स्थापन झाल्यावर त्या सरकारने प्रथम साम्यवादी रशियाशी एक दीर्घ मुदतीचा तह केला. ह्या तहातील कलमाप्रमाणे रशिया व चीन हे दोन्ही देश एकमेकांचे मित्र बनले. रशियनांनी मांचूरियातील आपले सर्व लोहमार्ग चीनचे हवाली केले. पोर्ट आर्थर व डायरेन ही दोन्ही बंदरे चीनचे हवाली करण्यात आली. रशियाने चिनी सरकारला ५ वर्षे मुदतीचे १५० कोटी रुपयांचे कर्ज दिले. चीन व रशिया यांचेमधील व्यापार वाढला.

चीनमधील पीकिंग राजवटीला रशिया व साम्यवादी विचारसरणीच्या इतर राष्ट्रांकडून तावडतोब मान्यता मिळाली. राष्ट्रसंघात मात्र चीनचा प्रतिनिधी म्हणून टैवानी सरकारलाच कायमचे स्थान होते. पीकिंग राजवटीला इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स वगैरे राष्ट्रांकडून मात्र मान्यता मिळण्याबद्दल बरीच भवती न भवती झाली. त्यातल्यात्यांत अमेरिकेने टैवानी सरकारशी दीर्घ मुदतीचा तह करून पीकिंग राजवटीविरुद्ध दंडच थोपटले. इंग्लंडने मात्र राष्ट्रसंघात चीनचा प्रतिनिधी कोण असावा, ह्या प्रश्नाबाबत मुग्धता धरून पीकिंग सरकारला मान्यता दिली व एकमेकांचे वकील एकमेकांच्या देशात ठेवण्याबद्दल करार केले.

चीनमधील साम्यवादी सरकारने रशियाशी मैत्रीचा तह केल्यानंतर चीनच्या सर्वांगीण सुधारणेला सुरवात केली. इ. स. १९५० मध्ये तिबेटवर

स्वारी करून, तिबेटला चिनी प्रजासत्ताकाच्या कक्षेतील एक स्वतंत्र प्रांत म्हणून नियंत्रित स्वराज्य देण्याचे कबूल करून, तो प्रदेश चीनमध्ये समाविष्ट करून टाकला. १९५४ मध्ये चीन-भारत यांमध्ये करार होऊन भारत सरकारनेही तिबेटवरील चिनी सार्वभौमत्वास मान्यता दिली. चीनमध्ये तिबेटचा अंतर्भाव झाल्याबरोबर तिबेटचे संरक्षण, दळणवळण व परदेशी संबंध यावर साम्यवादी सरकारने आपली हुकमत बसविली. तिबेटप्रमाणे कोरियामधील यादवी युद्धातही साम्यवादी चिनी सरकारने उत्तर कोरियन सरकारला सर्वतोपरी मदत दिली.

हळूहळू साम्यवादी सरकारने चीनमधील अंतर्गत कारभारात सुधारणा घडवून आणून चिनी लोकांची आर्थिक व औद्योगिक प्रगती घडवून आणण्यास सुरवात केली.





# संस्कृति, समाज, भाषा इ.

चिनी दंतकथा, वाक्प्रचार व चिनी लोकांच्या काही समजुती व कल्पना यावरून चिनी लोकांचे पूर्वज सिनकिआंग किंवा चिनी तुर्कस्तानकडून पूर्वेकडे हल्लीच्या चिनी मुलखात आले असावेत, असा अंदाज बांधता येतो. परंतु काही शास्त्रज्ञांचे मते मूळ चिनी लोक उत्तरेकडील मंगोलियाचे भागातूनही आले असण्याची शक्यता आहे. अलीकडील टैवान, कोरिया, जपान व इंडोचीन ह्यांमधील लोकही पूर्वीच्या चिनी लोकांचेच वंशज असावे, असे म्हणण्यास पुरेसे पुरावेही उपलब्ध असल्याचे सांगण्यात येते. चीनमध्ये स्थायिक झालेल्या ह्या चिनी लोकांत बाहेरून चीनवर स्वारी करून आलेल्या मांचू, मंगोल वगैरे परकीयही मिसळले गेले व त्यामुळे हल्लीच्या चिनी लोकांचे वर्णन संमिश्र चिनी असेही करता येण्यासारखे आहे.

चीनमध्ये स्थायिक झालेल्या चिनी लोकांनी आजूबाजूच्या कित्येक देशांत आपली संस्कृती व आचार विचारांचा स्वैर फैलाव केल्याचे मात्र आपणास स्पष्ट दिसते. जपानमध्ये सुप्रसिद्ध चिनी तत्त्वज्ञ कनफ्यूशियस याच्या आचार-विचारांचा प्रभाव आपणास स्पष्टपणे दिसून येतो. त्याचप्रमाणे बौद्ध धर्माची चिनी आवृत्तीही आपणास आजूबाजूच्या कित्येक प्रदेशांत प्रत्यक्ष

आचरणात असलेली दिसते. कोरियन लोकांची एकंदर राहणी व आचार-विचार तंतोतंत चिनी राहणी व आचार-विचार यांचीच हुबेहूब नक्कल असल्याचे आपणास दिसते. त्याचप्रमाणे जपान व कोरिया ह्या दोन्ही देशांत कित्येक शतके चिनी भाषा व लिपी ही प्रमाण म्हणून समजण्यात येत असे. अजूनही ह्या दोन्ही देशांत चिनी अक्षरांचा भरपूर भरणा असलेला दिसून येतो.

सर्वसाधारणतः चिनी लोकांचा धर्म, भाषा, संस्कृती व आचार-विचार जरी एकच असले, तरी भौगोलिक परिस्थितीच्या अनुषंगाने त्यांच्यामध्ये काही उपभेद असल्याचे आपणास स्पष्ट दिसून येते हवामानदृष्ट्या चीनमधील यांगत्सेकिआग नदीच्या दक्षिणेकडील सर्व भाग हा उष्ण कटिबंधात मोडतो. ह्या ठिकाणी पर्जन्यमानही सुमारे वार्षिक ६० इंचांचे आसपास असते. यांगत्सेकिआंग व होॅंगहो ह्या नद्यामधील मध्य चीनचा प्रदेश हा समशीतोष्ण हवामानाचा प्रदेश असून, दक्षिण चीनमधील पर्जन्यमानापेक्षा येथील पर्जन्यमान कमी, म्हणजे सुमारे २५-३० इंच आहे. राहता राहिलेला उत्तर चीनचा भाग, म्हणजेच होॅंगहो नदीच्या उत्तरेकडील भाग, हा शीत कटिबंधातील हवामानासारख्या हवामानाचा प्रदेश असून, येथील सरासरी वार्षिक पर्जन्यमान फक्त १५ इंचांइतकेच आहे. शिवाय हिवाळ्यात तपमान अतिशय कमी असल्यामुळे उष्णतामानात अतिशय तफावत दिसून येते. दक्षिणेकडील उष्ण हवामान व भरपूर पाऊस यांमुळे दक्षिण चीनमध्ये लोकसंख्या दाट आहे. जमिनीची मशागत करून तांदळाचे मुख्य पीक काढणारे शेतकरी बहुसंख्य असल्याने दक्षिणेत सरासरीने दर माणसी शेत-जमिनीचे प्रमाण जेमतेम ३ एकर इतके पडते. मध्य चीनमध्ये समशीतोष्ण हवामान व मध्यम पाऊस असल्याने तांदळाचे पिकाऐवजी गहू व इतर पिकांचाच जास्त प्रसार दिसून येतो. येथील शेतजमिनीचे दरमाणसी प्रमाण पाच एकरांपर्यंत असते. उत्तर चीनमध्ये विषम हवामान व अपुरा पाऊस यामुळे जमिनीची मशागत करून पोट भरण्यासारखी स्थिती नसल्याने येथील जमीनधारणेचे प्रमाण सरासरीने माणसी १५ एकरांपर्यंत जाते.

चीनमधील हवामानातील तफावतीमुळे साधारणतः दक्षिण चीन व उत्तर चीन असे दोन मुख्य भाग आपणास दिसून येतात. भौगोलिक परिस्थितीचा

मानवी जीवनावर फार मोठा परिणाम होत असल्याने, स्वभाव, आवडी-निवडी, खाणे-पिणे, कपडालत्ता, विचारसरणी, वगैरे सर्वच बाबतीत आपल्यास हे चीनचे दक्षिणोत्तर भाग यांमधील फरक तात्काळ जाणवतो. चीनच्या स्वातंत्र्यसंग्रामात दक्षिण भागातील चिनी जितक्या उत्कटतेने, आत्मीयतेने व हिरीरीने भाग घेत होते, तितकी तडफ उत्तरेतील चिनी लोकांत दिसून आली नाही. साहजिकच चीनमधील दाक्षिणात्य हे उत्तरेकडील लोकांपेक्षा पुष्कळच प्रगतिशील व पुरोगामी विचाराचे आहेत. असे जरी असले, तरी सर्वसाधारणपणे दक्षिणेकडील काय किंवा उत्तरेकडील चिनी लोकांत संस्कृती, धर्म, आचार-विचार, कुटुंबव्यवस्था, सामाजिक चालीरीती, रूढी वगैरे बाबतींत सारखेपणा आढळून येतो.

चीनमध्ये कनफ्यूशियन, ताओन व बौद्ध अशा तीन धर्मांचे प्राबल्य असल्याचे आपण ऐकतो, पण खरे पाहू जाता सर्वसाधारण चिनी माणूस वरीलपैकी एकाच पंथाला चिकटून राहिलेला क्वचितच दिसतो. तिन्ही पंथांबद्दल सर्वसाधारण चिनी माणसास नितांत आदर आहे. पूर्वजांची पूजा व स्मरण ही सर्वसाधारण चिनी लोकांत आढळून येणारी एक महत्त्वाची धार्मिकतेची बाब होय. चिनी भाषेतील दंतकथा व इतर गोष्टी ह्यांमधून अशा तऱ्हेच्या पूर्वजांचे नामस्मरण व पूजाअर्चा करण्याच्या प्रथेच्या महत्त्वाबद्दल आपणास पुष्कळच कल्पना येते.

चीनमध्ये धर्मप्रसाराकरता प्रयत्न करणारांमध्ये मुसलमान व ख्रिश्चन लोक हे प्रामुख्याने होत. परंतु एकंदर चिनी लोकांची विचार परंपरा, आचार–विचार, वगैरेंमुळे आपल्या धर्मातून परधर्मात जाणारे फारच थोडे चिनी लोक आढळून आले, असे म्हणावे लागते.

चीनमध्ये मागासलेले व चिनी लोकांहून इतर अशा ज्या काही जाती आहेत, त्या फक्त नैर्ऋत्य चीनमधील डोंगराळ भागांतच आढळून येतात. अशासारखे आणखी काही मागास जमातींचे लोक वायव्य चीनमध्येही कोठे कोठे आढळतात. त्यांपैकी काही जागी म्हणजे चुंगचिआ, मायाओत्से, काचिन, केहलाओ, लॉय, लोलो, याओ, मिन, चिआ वगैरे होत. चीनच्या पश्चिम, नैर्ऋत्य व वायव्य सरहद्दीवरील तिबेट, ब्रह्मदेश व इंडोचीन आणि

मोंगोलिया ह्या देशांतील लोकांशी ह्या चीनमधील वर सांगितलेल्या मागास जातींचे विशेष साधर्म्य दिसून येते.

चीनच्या आजपर्यंतच्या इतिहासात भौगोलिक परिस्थितीचा चिनी लोकांवर किती जबरदस्त पगडा आहे, ते स्पष्टच दिसते. दोन बाजूंनी समुद्र व उरलेल्या दोन बाजूंस उंच उंच पर्वत असल्याने व चीनमधील प्रदेशाच्या सुपीकतेमुळे चीनमधील एकंदर जनता शांततावादी; स्वतःचा धर्म व संस्कृती यांची महती गाणारी व परमेश्वराने आपणास जसे ठेविले आहे, त्यातच सुख मानणारी असल्यास त्यात विशेष आश्चर्य करण्याचे फारसे कारण नाही. अशा तऱ्हेचे दुसरे उदाहरण म्हणजे आपल्या भारताचे आहे. उत्तर व पश्चिमेकडील डोंगराळ भागात राहणारे लोक सर्वसाधारण चिनी लोकांपेक्षा सर्वच बाबतीत मागासलेले असल्यामुळे, चिनी लोकांत आपल्या स्वतःबद्दलचा एक विशेष स्वाभिमान अथवा वरचढपणाची वृत्ती आढळून येते. ह्या कूपमंडूक वृत्तीमुळेच परकीयांशी आपले काही संबंध असू नयेत व चिनी लोकांनीही आपला देश सोडून परदेशांत जाऊ नये, अशा बद्दलचे विचार दृढ होत गेले. अठराव्या शतकापासून परकीयांनी चीनमध्ये प्रवेश करण्यास व चीनबरोबर व्यापारी दळणवळण चालू करण्याकरता जे जे प्रयत्न केले, त्या सर्वांस चिनी जनतेकडून तीव्र विरोधच झाला. परकीयांनी चिनी लोकांवर जबरदस्तीने ज्या गोष्टी लादल्या त्यामुळे चिनी लोकांस नाइलाजाने का होईना, पण आपली संकुचित वृत्ती सोडावी लागली. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात जपानी लोकांनी पाश्चिमात्य राष्ट्रांपैकी रशियाचा पराभव करून आपले सामर्थ्य सिद्ध केल्यावर मात्र चिनी लोकांची पाश्चिमात्यांकडे पाहण्याची दृष्टी पुष्कळच निवळली. आपला देश सोडून परदेशांत वसती करण्याची जरूरी लोकसंख्येच्या भरमसाट वाढीमुळे चिनी लोकांस, १९ व्या शतकाच्या उत्तरार्धापासून विशेष भासू लागली. ह्यामुळेच मलाया, फिलिपीन बेटे, इंडोनेशिया, इंडोचीन व काही अंशी अमेरिकेमध्येही चिनी लोक पोटाच्या उद्योगाकरिता जाऊन वसाहती करू लागले. चिनी लोकांची कष्टाळू प्रवृत्ती व अल्पसंतुष्टता ह्या दोन गोष्टींमुळे, चिनी लोक जेथे जेथे गेले, तेथे तेथे त्यांनी तेथील एकंदर आर्थिक जीवनावर आपला अंमल बसविण्यास सुरवात केली. ह्यामुळे हे उपरे चिनी व त्या त्या देशांतील मूळचे स्थायिक लोक यांच्यामध्ये संघर्ष सुरू झाले.

ह्या संघर्षांमधूनच नवीन नवीन गुंतागुंतीचे आर्थिक, सामाजिक व राजकीय प्रश्न उत्पन्न होऊन, आंतरराष्ट्रीय राजकारणावरही हळूहळू त्याचा प्रभाव पडू लागला.

चिनी लोकांच्या आयुष्यात सर्वांत महत्त्वाचा पगडा कुटुंबसंस्थेचा आहे. ह्या कुटुंबसंस्थेमुळेच चिनी लोकांमधील एकता हा वेळपावेतो टिकली असे म्हणावे लागते. प्रत्येक कुटुंबातील व्यक्ती ही स्वतःपेक्षा कुटुंबाचे रक्षण व अभिवृद्धी यांवर जास्त भर देते. प्रत्येक कुटुंबात पूर्वजाची पूजा, स्मृती व उत्सव हे नेहमी पाळण्यात येतात व अशाच प्रसंगी कुटुंबातील सर्व व्यक्ती निरनिराळ्या ठिकाणांहून एकत्र येतात. विवाह हा विधी दोन व्यक्तींपुरता मर्यादित न राहता तो दोन भिन्न भिन्न कुटुंबांची एकी व्हावी एवढ्याकरिता मुख्यतः असतो असे मानले जाते. अशा प्रकारच्या कुटुंबसंस्थेमुळे समाज-जीवनात कुटुंब-प्रमुखाचे महत्त्व वाढले. अशा कुटुंब-प्रमुखाचे देखरेखी-खाली बाकी सर्व कुटुंबियांनी गुण्यागोविंदाने कष्ट करून कालक्रमणा करावी, अशासारखे आचार-विचार दृढ झाले. कुटुंब-प्रमुखाच्या इच्छेविरुद्ध कोणी काहीही करावयाचे नाही, असा अलिखित नियमच घातला गेला. साहजिकच एकत्र कुटुंबपद्धती अस्तित्वात आली व ह्या कुटुंबातील लहान किंवा भावी पिढीला शिक्षण व वळण लागावे, या हेतूने प्रत्येक कुटुंबाने आपआपल्या शाळा सुरू केल्या. ह्या शाळांतून त्या त्या कुटुंबाची थोरवी, त्यांच्या कुटुंबात पूर्वी होऊन गेलेल्या महत्त्वाच्या व्यक्ती व त्यांचे कार्य, याचे महत्त्व भावी पिढीचे मनावर ठसविण्याचा प्रयत्न सुरू झाला. थोडक्यात म्हणजे चीन-मध्ये एकंदर समाजरचना मध्ययुगीन समाजपद्धतीशी जुळणारी होती.

पाश्चिमात्य देशांशी चिनी लोकांचा संबंध आल्याबरोबर चिनी शिक्षण-पद्धतीची पुनर्रचना करण्याचे प्रयत्न सुरू झाले. ही पुनर्रचना मुख्यतः खालील मुद्यांवर आधारित होती :—

( १ ) शिक्षण हे समाजातील पुरुषांकरिताच मर्यादित न राहता, ते स्त्रियांसही देण्यात यावे. सुरवातीस प्राथमिक शिक्षण हे सहशिक्षणाचे तत्त्वावर-मुले व मुली यांस एकत्र शिक्षण देणे-अधिष्ठित असावे.

( २ ) शास्त्रांचे शिक्षण भक्कम पायावर शाळांतून सुरू करणे; जुन्या चिनी पद्धतीमध्ये, शिक्षणामध्ये शास्त्रीय शिक्षणाला फारसा वाव नव्हता.

( २ ) शिक्षण हे उच्चनीच भेदातीत असावे. पूर्वीच्या चिनी शिक्षण-पद्धतीत शिक्षण फक्त कुटुंबातील मुलांकरिताच मर्यादित होते. साहजिकच ज्या ज्या कुटुंबास अशा शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून देणे शक्य असेल, अशा कुटुंबातील मुलांस, मर्यादित का होईना, शिक्षण मिळू शकत असे. परंतु नवीन विचाराप्रमाणे शिक्षण हे सर्वांस सारखेच मिळावे, ह्या विचाराचा पगडा जास्त बसला.

शिक्षण सुधारणेबरोबरच आणखी एक सुधारणा चीनमध्ये अमलात आणली गेली व ती म्हणजे लिपी व भाषासुधारणा. परदेशांत जाऊन पाश्चिमात्य शिक्षण घेतलेले तरुण चिनी चीनमध्ये परत आल्यावर त्यांनी पीकिंग येथील राष्ट्रीय विद्यापीठामार्फत ही भाषाशुद्धीची चळवळ सुरू केली. भाषाशुद्धीच्या ह्या चळवळीचा जनक म्हणून हू शीह याचे नाव प्रामुख्याने सांगितले जाते. चीनमध्ये असंख्य बोलींचे राष्ट्रीयीकरण करणे म्हणजे एकच एक राष्ट्रभाषा तयार करणे होय. ह्या हेतूने प्रथम एक राष्ट्रभाषा तयार करण्यात आली. ह्या चिनी राष्ट्रभाषेलाच 'पाय–हुआ' असे नाव आहे. ह्या राष्ट्रभाषेपाठोपाठ चिनी अक्षरांची संख्या घटवून ती सुटसुटीत करण्यात आली. इ. स. १९५६ मध्ये चिनी भाषाशुद्धीचा एक भाग म्हणून चिनी अक्षरांची संख्या मर्यादित करण्यात आली. त्यापूर्वी चिनी भाषेत एकंदर ३०,००० अक्षरे होती. रोमन लिपीच्या आधारावर ह्या ३०,००० अक्षरात मोठ्या प्रमाणावर काटछाट करण्यात येऊन एकंदर ३० अक्षरांत सर्व चिनी भाषा बसविण्यात आली. भारतातही नागरी लिपीची स्वर व व्यंजने मिळून एकंदर ५२ अक्षरे आहेत. अलीकडे ह्या ५२ अक्षरां-ऐवजी नागरी लिपी सुमारे ३० अक्षरांत बसविण्याचे प्रयत्न सुरू आहेत. अशाच तऱ्हेचा पण फार मोठ्या प्रमाणावर प्रयत्न चीनमध्ये करण्यात येऊन बोजड चिनी भाषेला एक सुटसुटीत वळण देण्यात आले.

● ● ●



# शेती

चीनच्या एकंदर सुमारे ३५ लक्ष चौरस मैलांच्या क्षेत्रफळापैकी शेतीला उपयुक्त–मुख्यतः मैदानाची जमीन अशी फारच थोडी, म्हणजे जेमतेम १० टक्केच आहे. चीनच्या जवळजवळ ६० कोटी लोकसंख्येचा विचार करता व इतक्या अवाढव्य लोकसंख्येच्या अन्नधान्याचा पुरवठा होण्याचे दृष्टीने चीनमधील शेतीला उपयुक्त असलेली शेतजमीन बरीच कमी असल्याचे दिसून येते. परंतु तरीही चीनमधील शेतीचा व्यवसाय हा अजूनही पुष्कळसा मागासलेला असला तरीही चिनी लोकांच्या अंगच्या चिकाटी, कष्टाळूपणा, परंपरेचा अभिमान, जुने ते सोने मानण्याची एकंदर प्रवृत्ती, वगैरे गुणांचा विचार करता आजतागायत चीनमधील लोकसंख्येला भारताप्रमाणे, वर्षानुवर्षे परकीयांच्या दाराशी अन्नाकरिता भीक मागण्याची मात्र अजूनपर्यंत पाळी आली नाही, ह्याचे कौतुकमिश्रित आश्चर्य वाटते. शेतीला उपयुक्त अशी जमीन जरी मर्यादित असली, तरी आहे ती जमीन तरी खरोखरच फार सुपीक आहे. उत्तर चीनची लोएस मैदानाची जमीन काय, किंवा त्सेश्वान प्रांतातील चीनच्या पश्चिमेकडील डोंगराळ उतरणीवरील — तांबड मातीची जमीन काय, एकंदरीत चीनमधील बहुतेक शेतजमीन अतिशय सुपीक असून

ह्या जमिनीचा सुपीकपणा, निसर्गामुळे व चिनी शेतकऱ्यांच्या कष्टामुळे आजतागायत कायम राहिला आहे.

चीनमधील शेतजमिनीचा कस अव्याहत कायम राखण्याचे काम चीनमधील तिन्ही नद्या – उत्तरेकडील होँहँगहो, मध्य चीनमधील यांगत्सेकिआंग व दक्षिणेकडील सीकिआंग – एकसारख्या करीत आहेत. प्रत्येक क्षणाला डोंगरमाथ्यावरून खाली वाहात असताना ह्या नद्या आपल्याबरोबर जो विपुल गाळ आणतात, तो नद्यांच्या तीरांवर व आजूबाजूला पसरण्याचे काम ह्या नद्यांच्या पुराचे पाण्यामुळे अनायासेच होते. निसर्गाची ही मदत किती बहुमोल आहे, त्याची साक्ष म्हणजे चिनी लोकांच्या दैनंदिन जीवनात आढळून येणारी निसर्गाबद्दलची करुणा, निसर्गाचे आवाहन व निरनिराळ्या देवदेवतांचे – म्हणजेच अप्रत्यक्ष, पण निसर्गाचेच – भजन, पूजन-नामस्मरण वगैरे देतात. निसर्गाच्या ह्या बहुमोल मदतीबरोबरच सर्वसाधारण चिनी शेतकरीही आपल्या जमिनीचा कस वाढविण्याकरता, पाला-पाचोळा, जनावरांचे शेण व मूत्र व मानवांचे मलमूत्र ह्यांचा जास्तीतजास्त वापर करीत असतो. ह्याचबरोबर डोंगरउतारावरील जमिनीवर चांदबंदिस्ती करून, अशा उताराच्या जमिनीवरील गाळ वाहू न देणे, वगैरे बाबी प्रत्यक्ष प्रचारात आणूनही, जमिनीची धूप थांबवून, जमिनीचा कस वाढविता न आला तरी, आहे तोच कायम ठेवण्याचा अहर्निश प्रयत्न चिनी शेतकरी करीत असतो. चीनमधील एकंदर शेतकरी–जीवन अत्यंत कष्टाचे असते. अहोरात्र व कधीही खंड न पडता वर्षानुवर्षे शेतीची जोपासना करून, एकापाठोपाठ एक अशी पिके काढल्याशिवाय सर्वसाधारण चिनी शेतकऱ्याला गत्यंतरच नसते. अगोदरच प्रत्येक शेतकऱ्याच्या वाट्याला येणारी जमीन अगदी थोडी. अशा ह्या लहानशा जमिनीच्या तुकड्यावर स्वतःची व स्वतःच्या कुटुंबाची गुजराण करावयाची म्हणजे अपार कष्ट व सततोद्योग हे आलेच. कित्येकवेळा जी जमीन कसावयाची व त्या जमिनीचा एखादा अल्पसाही भाग स्वतःच्या खोपट्याकरिता किंवा गुरांच्या गोठ्याकरिता म्हणून वाया जाऊ नये, ह्या हेतूने हजारो शेतकरी कुटुंबे आपली वस्ती जवळपासच्या नदीवर, लहान लहान होड्यांतून करतात. पिढ्यान्‌पिढ्या अशा-

रीतीने लहान लहान होड्यांतून जीवन जगणारे असंख्य चिनी आपणास दिसून येतात.

पूर्वापार चालीरीती, सनातनी कल्पना, पिढ्यान्‌पिढ्या एका विशिष्ट प्रकारे करण्यात येणारी शेती, अशी परिस्थिती असूनही आजपावेतो चिनी लोकांपुढे अन्नसमस्या अशी काही उभी ठाकली नाही. सध्याच्या साम्यवादी सरकारच्या अविरत प्रयत्नांनी, सर्वसाधारण चिनी शेतकऱ्यास आधुनिक व पाश्चात्त्य शेतीशिक्षण जर दिले गेले व चिनी शेतीउत्पादन शास्त्रीय तत्त्वावर व शास्त्रीय शोधांचे मदतीने चालू राहिले, तर चीनमधील आर्थिक परिस्थिती सुधारण्यास त्यामुळे खचितच वाव मिळेल. भारताशी तुलना करता सर्व-साधारणतः चीनमधील दर एकरी शेतजमिनीचे उत्पन्न पुष्कळच जास्त आहे.

शेती हा व्यवसाय हवामानावर पुष्कळच अवलंबून असल्याने चीनमधील शेतीव्यवसायाचा विचार करताना चीनमधील निरनिराळ्या भागांतील हवामानाचा विचार करणे आवश्यक आहे. हवामानाचे दृष्टीने चीनचे तीन भाग पडतात, हे आपण ह्यापूर्वीच पाहिले. हे विभाग म्हणजे ( १ ) उत्तरे-कडील शीतसमशीतोष्ण विभाग, ( २ ) मध्यचीन किंवा यांगत्सेकिआंग नदीच्या खोऱ्याचा उष्णसमशीतोष्ण विभाग व ( ३ ) दक्षिण चीन म्हणजे उष्ण कटिबंधातील हवामानाचा म्हणजेच मान्सून विभाग हे होत. शेती-उत्पादनाचे दृष्टीने आता आपण यांपैकी प्रत्येक विभागाची थोडी तपशील-वार माहिती पाहू.

उत्तरेकडील चीनचे मैदानाचा विभाग म्हणजे होऽहँगहो नदीच्या उत्तरेकडील मोंगोलियाचे सरहद्दीपर्यंत पसरलेला उत्तर चीन होय. पूर्वेकडे चिनी समुद्र, पश्चिमेला मोठमोठे डोंगर, उत्तरेला मोंगोलिया व दक्षिणेला होऽहँगहो नदीचे पात्र अशा ह्या उत्तरेकडील चीनच्या प्रदेशाच्या चतुस्सीमा म्हणता येतील. या उत्तर विभागाचे हवामानाप्रमाणे पुन्हा तीन उपविभाग पाडता येण्यासारखे आहेत. पहिला पूर्वेकडील समुद्रकिनाऱ्यालगतचा प्रदेश. समुद्रसान्निध्य, कुरोसीवो हा वर्षभर समुद्रकिनाऱ्याजवळून अखंड वाहाणारा गरम पाण्याचा प्रवाह व सुमारे वार्षिक २० इंचपर्यंत पडणारा पाऊस, यांमुळे या भागातील हवामान पुष्कळच सौम्य आहे. हिवाळा फार तापदायक किंवा कडक नसतो. उन्हाळ्यातही तपमान ९०–१०० अंश फॅरनहाईटपेक्षा

15038

जास्त असत नाही. ह्या भागात होऽहँगहो व तिच्या उपनद्या ह्या वाहात असल्यामुळे व ह्या नद्यांना येणारे पूर महापूर असल्याने येथील शेती पुष्कळच अनिश्चित स्वरूपाची आहे. गहू, जव, जोंधळा, मका ही मुख्य धान्ये शेतीपासून काढली जातात. याशिवाय निरनिराळ्या प्रकारचे वाटाणेही पिकविले जातात. अतिपूर्वेकडील व विशेषतः आग्नेय भागात तांदूळही पिकविला जातो. त्यातल्यात्यांत शांटुंग द्वीपकल्प व किआंगसू प्रांत हा तांदळाचे उत्पादनाकरिता प्रसिद्ध आहे. याच भागांत कापूस व अंबाडी यांचेही पीक काढले जाते. सोयाबीन ( भुईमुगाचा एक प्रकार ), बटाटे व बाजरी ही पिकेही अधूनमधून बदली म्हणून काढली जातात. शेतीच्या दृष्टीने उत्तर चीनच्या मैदानाचा हा पूर्वेकडील भाग विशेष महत्त्वाचा आहे. येथील लोकसंख्याही उत्तरेकडील मैदानाच्या इतर भागांपेक्षा पुष्कळच दाट आहे.

उत्तरेकडील मैदानाचा दुसरा पोटविभाग म्हणजे वायव्येकडील 'लोएस' मैदानाचा भाग होय. समुद्रापासून दूर, पश्चिमेकडील डोंगरांच्या पूर्व उतारावर असलेला, साधारणतः ३५–४० उत्तर अक्षांशाच्या उत्तरेकडे वसलेला हा प्रदेश म्हणजे विषम हवामानाचा प्रदेश होय. येथील हिवाळा अतिशय कडक असतो. हिवाळ्यातील सरासरी तपमान जेमतेम ३२-३५ अंश फॅरेनहाईट इतके असते. हिवाळा साधारणतः ५ ते ६ महिनेपर्यंत असतो. उन्हाळा थोडा लहान – जवळजवळ ४ महिने – असतो, पण उन्हाळ्यातील तपमानही साधारणतः ७०–८० अंश फॅरेनहाईट सरासरीने असते. पाऊस अत्यंत अपुरा, अदमासे १०–१५ इंच वार्षिक पडतो. हिवाळ्यात पश्चिमेकडील वाळवंटी पठाराकडून येणारे थंडगार वारे हिवाळ्यातील थंडीचा कडकपणा जास्तच वाढवितात. अशा एकंदर परिस्थितीमुळे ह्या भागात शेतीचा व्यवसाय वर्षातील सहा महिने तरी स्थगितच असतो – हिवाळ्यात घराबाहेर पडून मोकळ्यावर शेतीची मशागत करणे जवळजवळ अशक्य होते. ह्या भागांत घोडे, उंट, शेळ्या, मेंढ्या वगैरेंचे कळप ठेवून त्यावर आपली उपजीविका करणारी असंख्य कुटुंबे आहेत. प्रतिकूल हवामान व अपुरा पाऊस ह्यांमुळे ह्या भागात तांदळाचे उत्पादन होऊ शकत नाही. गहू, ज्वारी, बाजरी वगैरे पिके फक्त उन्हाळ्यातच होऊ शकतात. गुरांची जोपासना हा महत्त्वाचा जोडधंदा असल्याने साधारणतः लोकांच्या अन्नात मांसाहाराला

विशेष महत्त्व आले आहे. सोयाबीन, जव व मका ही इतर पिके काढली जातात. ह्या भागांतील जमीन जगातील अत्यंत कसदार अशा लोएस जातीची असूनही, अपुरा पाऊस व अत्यंत प्रतिकूल हवामान ह्यांमुळे ह्या भागांतील लोकांचे जीवन अत्यंत कष्टाचे असते. साहजिकच येथे लोकसंख्याही बरीच तुरळक आहे.

चीनच्या उत्तरेकडील मैदानाचा ईशान्य भाग व वायव्य भाग यामध्ये असलेला जो मध्य भाग तो एकप्रकारे ह्या दोन विरुद्ध हवामानांचे प्रदेशांमधील संक्रमणाचा विभाग होय. पूर्वेकडून जसजसे पश्चिमेकडे जावे, तसतसे हवामान जास्तजास्त विषम होते, पाऊस कमी कमी होऊ लागतो, शेतीव्यवसायही तोकडा भासू लागतो व ह्या सर्वांचा परिणाम म्हणजे लोकसंख्याही तुरळक होऊ लागते.

शेतीव्यवसायाच्या दृष्टीने चीनचा दुसरा मुख्य विभाग म्हणजे मध्यचीन किंवा यांगत्सेकिआंग नदीच्या खोऱ्याचा भाग होय. ह्याचे हवामानाचे दृष्टीने तीन उपविभाग पडू शकतील. पहिला म्हणजे यांगत्से नदीच्या मुखाजवळील भाग; दुसरा म्हणजे यांगत्से नदीच्या खोऱ्यापैकी मध्य विभाग व तिसरा म्हणजे यांगत्से नदीच्या उगमाकडील बाजूचा म्हणजे पश्चिमेकडील भाग. या तिन्ही उपविभागांत साधारणतः समशीतोष्ण हवामान आढळते. जिकडे तिकडे सुपीक जमीन, पुरेसा पाऊस, उन्हाळ्यात उन्हाळा फार कडक नाही व हिवाळ्यात थंडीही बेताचीच, असा हा सर्व दृष्टीने अनुकूलता लाभलेला प्रदेश असल्याने सर्व चीनमध्ये ह्या भागास विशेष महत्त्व प्राप्त होणे क्रमप्राप्तच आहे. किंबहुना हा भाग म्हणजे चीनचे धान्याचे कोठार म्हणूनच समजला जातो. ह्या भागात तांदळाचे उत्पादन फार मोठ्या प्रमाणात होते. तांदळाचे उत्पादन विशेषतः पूर्वेकडील समुद्रकिनारपट्टीचे भागात विशेषच दिसून येते. पश्चिमेकडील डोंगराळ भागांत डोंगरउतरणीवर चहाची लागवड केली जाते. मध्य भागात कापूस, सोयाबीन, जव, गहू, तीळ, पावटे किंवा मटार, वगैरे पिके मुबलक प्रमाणात काढली जातात. पूर्वेकडील भागांत तर एका पाठोपाठ एक अशी वर्षातून तांदळाची तीन तीन पिके काढली जातात. शेतीचा व्यवसाय हा एक किफायतशीर व्यवसाय ह्या भागात समजला गेला असल्याने, ह्या भागांतील जेवढी शक्य असेल तेवढी सर्व

जमीन लागवडीखाली आणली गेली आहे. निरनिराळी पिके काढली जात असल्याने हा भाग चीनमधील सर्वांत दाट लोकसंख्येचा भाग समजला जातो. विशेषतः यांगत्सेकिआंग नदीच्या मुखाजवळील त्रिभुज प्रदेशात तर लोकसंख्या इतकी दाट आहे, की अनेक कुटुंबे जागेच्या अभावी यांगत्से नदीच्या पात्रावरच, लहान लहान होड्यांतून आपला संसार करतात. अशा तऱ्हेने पिढ्यान्‌पिढ्या नदीवरील बोटीतच आयुष्य घालविलेले असंख्य चिनी आपणास आढळून येतात.

यांगत्से नदीचे खोरे अत्यंत सुपीक आहे. हवामान एकंदर चिनी लोकांस अतिशय मानवणारे आहे. शेतीपासून काढण्यात येणारी पिकेही महत्त्वाची व मुचलक आहेत. दळणवळणांच्या साधनातही भरपूर वाढ होत आहे. यांगत्से नदीच्या खोऱ्यात निरनिराळी महत्त्वाची खनिजे सापडतात. या सर्व गोष्टींमुळे ह्या विभागात उद्योगधंद्यांची व कारखान्यांची भराभर वाढ होऊ लागली आहे. कापूस व रेशीम यांपासून सूत व कापड तयार करणाऱ्या गिरण्या, लोखंड व पोलादाचे कारखाने, यंत्रे तयार करण्याचे कारखाने, वगैरे हरतऱ्हेचा पक्का माल तयार करणारे कारखाने ह्या विभागांत अलीकडे उभारले गेले असल्याने, ह्याच विभागात मोठमोठी शहरे उदयास आली आहेत. शहरांच्या वाढीबरोबर लोकसंख्याही जास्त जास्तच दाट होणार, हेही तितकेच खरे आहे. एकंदरीत हा विभाग म्हणजे चीनमधील अतिशय महत्त्वाचा व उलाढालीचा एक भाग होय.

हवामानाचे दृष्टीने चीनचा पाडता येण्यासारखा तिसरा विभाग म्हणजे दक्षिण चीन हा होय. हा भाग साधारणपणे उष्ण कटिबंधात मोडत असून, येथील हवामानही मान्सून प्रकारचे, म्हणजे दक्षिण भारताच्या हवामानासारखेच आहे. पूर्वेकडे समुद्रकिनारा असल्याने दक्षिण चीनच्या पूर्वेकडील भागांत बाराही महिने उष्णता भरपूर असते. पाऊस जवळजवळ वर्षभर व पुरेसा पडतो. ह्यामुळे ह्या भागात तांदूळ व ऊस ह्यांचे पीक वारेमाप येते. कंतान व त्याच्या आसपासच्या प्रदेशात – हा भाग म्हणजे दक्षिण चीनचा मध्य भाग होय – पाऊस भरपूर पडतो व यामुळे ह्या भागांत उष्ण कटिबंधातील शेतीपासून मिळणारी पिके आपणास आढळून येतात. अननस, मसाल्यांचे पदार्थ, कापूस, तेलबिया, वगैरेंची भरपूर पैदास होते. दक्षिण

चीनचा अगदी पश्चिमेकडील भाग हा डोंगराळ असल्याने तेथील लोक बरेच मागासलेले आहेत. दाट जंगले विपुल असल्याने जंगलसंपत्ती मोठ्या प्रमाणावर मिळते. ह्या भागांत जमिनींची मशागत करण्यापेक्षा जनावरांचे कळप राखणे हा जास्त किफायतशीर उद्योग समजला जातो.

चीनमध्ये शेतीपासून उत्पादिल्या जाणाऱ्या मालात अन्नधान्यास विशेष प्राधान्य असणे साहजिकच आहे. चीनमधील एकंदर लागवडीखाली असलेल्या क्षेत्रफळाच्या सुमारे ५०–६० टक्के क्षेत्रफळात फक्त तांदूळ, गहू व ज्वारी-बाजरी वगैरेंसारखी द्विदल धान्ये ह्यांचेच पीक जास्त प्राधान्येकरून आहे. एकंदर शेतजमिनींपैकी जवळजवळ ३० टके जमीन ही भातशेतीची आहे. सर्वसाधारण चिनी लोकांचे अन्न जरी तांदूळ असले, तरी हवामानपरत्वे तांदळाचे महत्त्व, जसजसे उत्तरेकडे जावे तसतसे ते कमी कमी होत जाते. यांगत्से नदीच्या उत्तरेकडील सर्व भागांत तांदळाऐवजी गव्हाचाच मुख्य अन्न म्हणून वापर केला जातो. एकंदर लागवडीखाली असलेल्या जमिनींच्या १५ टक्के जमीन द्विदल धान्ये व सोरघम ह्या जातीच्या एका भुईमुगाच्या पिकाने व्यापली आहे. तांदूळ व गहू ह्यांच्या खालोखाल चहाचा क्रम लागतो. पश्चिमेकडील डोंगरांच्या पूर्व उतारावर व पूर्व किनाऱ्याजवळील निरनिराळ्या उंचवट्यांवर चहाची पैदास होते.

चीनच्या समशीतोष्ण हवामान असलेल्या भागांत तुतीची लागवड व त्यावर जोपासण्यात येणाऱ्या रेशमी किड्यांपासून मिळणारे रेशीम, ही चिनी उत्पादनाच्या वस्तूंपैकी आणखी एक महत्त्वाची वस्तू होय. रेशमाचे किडे हे पश्चिमेकडील डोंगरउतारांवर व मध्य व पूर्व चीनमधील इतर उंचवट्यांवर जोपासले जातात. कच्चे रेशमाची पैदास हा चीनमधील एक किफायतशीर उद्योग आहे. एकंदर निर्यातीपैकी सुमारे ९ टक्के निर्यात फक्त रेशमाची होते. त्यावरून चीनमधील रेशमाच्या उत्पादनाचे महत्त्व लक्षात येईल.

चीनमध्ये पैदा होणारा कापूस हा जरी निकृष्ट प्रतीचा असला तरी आंतरराष्ट्रीय बाजारात ह्या कापसाला महत्त्व आहे. ह्या कच्च्या मालाच्या पैदाशीमुळेच चीनमध्ये प्रथम कापसापासून सूत तयार करणाऱ्या गिरण्या निघून नंतर ह्या सुतापासून कापड तयार करणाऱ्याही गिरण्या सुरू झाल्या. अलीकडे लांब धाग्याच्या कापसाच्या उत्पादनावर चीनमध्ये पुष्कळच भर

दिला जात आहे. कृषिविद्यालये, व्यापारी संस्था, कापड गिरण्या व कापसाचे व्यापारी यांच्या सहकार्याने चीनमध्ये एक नव्या प्रकारच्या लांब धाग्याचा कापूस पैदा करण्याकडे प्रवृत्ती वाढत चालल्याचे दिसते. गेल्या ३०–४० वर्षांत चीनमध्ये कापडगिरण्यांची पुष्कळच वाढ झालेली दिसत असून, ह्या बहुतेक कापडगिरण्या यांगत्से नदीच्या परिसरातच आपआपला पसारा पसरून उभ्या आहेत.

भारताप्रमाणेच चीन हा मुख्यतः शेतीप्रधान देश आहे. चीनमधील एकंदर लोकसंख्येच्या ७०–७५ टक्के लोक शेतीवर आपला उदरनिर्वाह चालवितात. ह्यावरून वरील म्हणण्याची सत्यता पटेलच. भारतातील सर्व-साधारण शेतकऱ्यांप्रमाणेच दारिद्र्य, अज्ञान, परंपरागतित्व वगैरेंमुळे आर्थिक-दृष्ट्या त्यांची परिस्थिती बरीच हलाखीची आहे. चीनमध्ये साम्यवादी सरकार येण्यापूर्वी तर चिनी शेतकऱ्यांची परिस्थिती फारच वाईट होती. इ. स. १९४६ मध्ये करण्यात आलेल्या पाहणीवरून जमिनीचे स्वतः मालक असलेले शेतकरी सरासरी ४० टक्के इतकेच होते. आणखी २५ टक्के शेतकरी पूर्णपणे जरी नसले तरी काही अंशांनी का होईना, पण मालक होते. उरलेले ३५ टक्के शेतकरी हे जमीनदारांची कुळे, खंडकरी किंवा मजुरी करून राबणारे असे हीन लोक होते.

देशाची आर्थिक परिस्थिती बदलून चीनमध्ये आर्थिक सुस्थिती आणावी, ह्या हेतूने इ. स. १९४९ मध्ये साम्यवादी सरकारने जमीनविषयक अनेक कायदे केले. आपल्या भारतातही ह्या दृष्टीने 'कसेल त्याची जमीन' वगैरे, सारखे कायदे पास करण्यात आले. चीनमधील सर्वांत महत्त्वाचा व क्रांतिकारक कायदा म्हणजे ३० जून १९५० रोजी साम्यवादी सरकारने पास करवून घेतलेला जमीनधारणेबद्दलचा कायदा होय. ह्या कायद्यान्वये चीनमधील एकंदर जमीन सरकारी मालकीची करण्यात आली. ह्यामुळे मध्ययुगीन जमीनदार, धार्मिक देवळे व संस्था यांच्या मालकीची जमीन, शिक्षणसंस्था, रुग्णालये व इतर धर्मादाय संस्था यांच्याकडे मालकीहक्काने असलेली सर्व जमीन सरकारजमा करण्यात आली. अगोदरच चीनमध्ये दरडोई जमीनधारणेचे प्रमाण फार अल्प होते व त्यात भर म्हणूनच किंवा काय, जमिनीचे मालक आपल्या कुळाकडून भरमसाट कबुलायती लिहून घेऊन आपल्या मालकीची जमीन

शेतकऱ्यास कसण्यास देत असत. ह्यामुळे जिवापाड श्रम करूनही जमीन कसणाऱ्या शेतकऱ्यांचे हातात फारसा पैसा राहात नसे. साम्यवादी चिनी सरकारने ह्या सर्व गोष्टींचा फार बारकाईने अभ्यास करून, एकदा सर्वच जमिनीचे राष्ट्रीयीकरण करून एक फार मोठे पाऊल टाकले.


चीनमध्ये नांगरटीखाली असलेल्या एकंदर जमिनीचे क्षेत्रफळ १,९२,००० चौरस मैल असल्याचे दिसून आले. नेहमीच्या अन्नधान्याचे उत्पादनाबरोबर फळफळांचेही उत्पादन चीनमध्ये महत्त्वाचे आहे. इ. स. १९५६ मध्ये शेतीकरिता खास अशी एक दशवार्षिक योजना आखण्यात आली. इ. स. १९५८ चे अखेर चीनमधील एकंदर शेतजमिनीची २६,५७८ पीपल्स कम्यून्समध्ये विभागणी करण्यात आली. हा प्रत्येक कम्यून्स म्हणजे चीनमध्ये ज्याला पूर्वी 'सीआंग' किंवा आपल्याकडील जिल्हा संबोधण्यात येतो, तितकाच आहे. ह्या प्रत्येक कम्यूनचे क्षेत्रफळ ६४,००० माऊ अथवा ४,३०० हेक्टर्स इतके आहे. ( १ हेक्टर म्हणजे आपल्या भारतातील साधारणपणे २॥ एकर होतो. ) ह्या प्रत्येक कम्यूनमध्ये ४,६३७ कुटुंबे असतात; व ह्या कुटुंबांतून शेतीचे कामाकरिता साधारणपणे १०,००० काम करणाऱ्या व्यक्ती असतात. साम्यवादी सरकारची स्थापना झाल्याबरोबर चीनमध्ये लष्करी शिक्षण सक्तीचे करण्यात आले. ह्या कम्यून्समार्फत हे सक्तीचे लष्करी शिक्षण देण्याची व्यवस्था करण्यात आली. त्यामुळे आपल्या महाराष्ट्रात ज्याप्रमाणे प्रत्येक तालुक्यात सरकारने शेती-संशोधन केंद्रे सुरू केली आहेत, त्याप्रमाणेच ह्या कम्यून्समार्फत सामुदायिक शेती सरकारच्या खास देखरेखीखाली सुरू करण्यात आली.

ह्या सामुदायिक शेतीच्या प्रयत्नांमुळे शेतीपासून होणाऱ्या उत्पादनात पुष्कळच वाढ झाल्याचे दिसून येते. उदाहरणार्थ, सामुदायिक शेती सुरू होण्यापूर्वी म्हणजे इ. स. १९५५ मध्ये एकंदर अन्नधान्याचे उत्पादन १८ कोटी ४० लक्ष टन होते. इ. स. १९५७, १९५८ व १९५९ मध्ये ते अनुक्रमे १८·५ कोटी टन, २५·४ कोटी टन व २७·१ कोटी टनांपर्यंत गेले. कापसाचे उत्पादन १९५८ मध्ये सुमारे २२ लाख टन होते, ते १९५९ मध्ये २४ लाख टन व १९६१ मध्ये २७ लाख टनांवर गेले. इ. स. १९५२ मध्ये ८२,५०० टन वजनाचा चहा चीनमध्ये पैदा केला गेला. दहा वर्षांनंतर

चीनमधील चहाचे उत्पादन १ लाख टनांहूनही जास्त झाले. इ. स. १९४९ मध्ये ७३,००० पिकूल, ( १ पिकूल = १३३$\frac{1}{2}$ पौंड ) इतके कच्चे रेशीम तयार झाले, पण १९६१ मध्ये कच्च्या रेशमाच्या उत्पादनाचे लक्ष्य २३ लक्ष पिकूल इतके ठरविण्यात आले. ताग व अंबाडी ह्यांचे १९५२ मधील उत्पादन ३ लक्ष टन होते, परंतु १९६१ मध्ये हे उत्पादन ४ लक्ष टनांवर जाईल, असा अंदाज केला गेला. १९५२ मध्ये तंबाखूचे उत्पादन जवळजवळ २ लक्ष टन होते, परंतु १९६१ मध्ये एकंदर ४ लाख टनांपेक्षाही जास्त तंबाखू पैदा होईल, अशी साधार अपेक्षा करण्यात आली. १९५२ मधील उसाचे उत्पादन ७१ लक्ष टन होते, तर १९६१ मधील उसाचे उत्पादन १५५ लक्ष टन होईल, असा अंदाज करण्यात आला. १९५७ मध्ये साखरेचे उत्पादन ८$\frac{1}{2}$ लाख टन होते व १९६१ चा साखरेच्या उत्पादनाचा अंदाज १२ लाख टनांचा होता. चीनमध्ये साम्यवादी सरकार स्थापन झाल्यापासून शेतीविषयक ज्या काही सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न चालू आहे, त्याची केवळ तोंडओळख वरील माहितीवरून आपल्याला होईल. निर-निराळे कायदे करून, त्याची अंमलबजावणी करून, त्यापासून झालेले फायदेतोटे व ह्या फायद्यातोट्यांवरून चालू अस्तित्वात असलेल्या कायद्यां-मध्ये करावी लागणारी सुधारणा, या गोष्टी अर्थात चुटकीसरशी होणाऱ्या नसून, तो थोडाफार कालावधीचा प्रश्न आहे. आपल्या भारतातही स्वातंत्र्य-प्राप्तीनंतर ज्या काही जमीनविषयक सुधारणा सुरू आहेत, त्यांची इष्टानिष्टता व फलप्राप्ती ह्यांची शहानिशा येथे करण्याचे प्रयोजन नाही परंतु त्याबरोबरच भारताप्रमाणे नव्यानेच स्वतंत्र झालेल्या देशांत काय काय सुधारणा चालू आहेत व त्यापासून श्रेयनिष्पत्ती किती झाली, वगैरे गोष्टींचे ज्ञान झाल्यास आपल्यास आपल्याकडील परिस्थितीची कल्पना येण्यास खचितच मदत होईल.

आता ह्या पुढील प्रकरणात चीनमधील उद्योगधंद्यांविषयी थोडासा ऊहापोह करू.

• • •



# उद्योगधंदे

कोणत्याही देशाची औद्योगिक वाढ ही त्या देशात उपलब्ध असलेल्या खनिजांवर अवलंबून असते. त्यातल्यात्यात कोळसा, लोखंड, मँगनीज, सैंधव, तांबे, पितळ, पत्रा, शिसे वगैरे धातू तर विशेष महत्त्वाची खनिजे मानली जातात. त्या दृष्टीने प्रथम चीनमधील खनिजांची परिस्थिती लक्षात घेणे अगत्याचे आहे.

## कोळसा

चीनमध्ये उपलब्ध असलेल्या सर्व खनिजांमध्ये कोळशाचा क्रमाक पहिला आहे. इ. स. १९४५ च्या सुधारलेल्या भूस्तर पाहणीनुसार चीनमध्ये एकंदर २६,५३३ कोटी १० लक्ष टन कोळशाचा साठा असावा, असा अंदाज आहे. ह्या एकंदर चीनमधील कोळशाच्या साठ्यांपैकी जवळ-जवळ ५० टक्के कोळसा हा उत्तरेकडील शानसी प्रांतात आहे. इ. स. १९५७ मध्ये प्रत्येकी १० लक्ष टनांहून अधिक कोळसा काढणाऱ्या सुमारे ३१ खाणी होत्या. यांपैकी कैलवान खाणीतून ९६·८ लक्ष टन, फुशून खाणीतून ९३ लक्ष टन, फूशिन खाणीतून ८५ लक्ष टन, हुईनान खाणीतून ६९ लक्ष टन

व टाटुंग खाणीतून ६५ लक्ष टन कोळशाचे उत्पादन झाले. चीनमधील बहुतेक कोळसा उत्तर चीन व दक्षिण मांचूरियामध्ये आढळतो. याच भागात लोहमार्ग जसजसे वाढत गेले, तसतसा कोळशाच्या पुरवठ्याचा प्रश्न उत्पन्न होऊन, ह्या भागातील कोळशाच्या खाणींना ऊर्जितावस्था आली.

दक्षिण चीनमधील भागात सर्वांत महत्त्वाची कोळशाची खाण हुनान व किआंगसी ह्या प्रांतांच्या सरहद्दीवर पिंग सिआंग ह्या ठिकाणी आहे. ह्या खाणीला सुरवातही ह्या भागातील वाढत्या लोहमार्गांमुळेच झाली. यावरून चीनमधील कोळशाच्या खाणींचे उत्पादन मुख्यत्वे चीनमधील लोहमार्गावर अवलंबून होते, ह्या म्हणण्याची प्रचीती येते.

## लोखंड

चीनमध्ये जितका कोळसा विपुल आहे, तितकेच लोखंड दुर्मिळ आहे. इ. स १९४७ च्या भूगर्भशास्त्रज्ञांच्या सुधारलेल्या अंदाजाप्रमाणे चीनमधील लोखंडाचा एकंदर साठा २५५ कोटी ५० लक्षांचे आसपास आहे. होपाय प्रांतातील अँथ्रसाईट जातीच्या कोळशाच्या खाणीचे भागातील स्यानसी येथील लोखंडाची खाण ही सर्वांत महत्त्वाची समजली जाते. याशिवाय शांटुंग, दक्षिण मांचूरिया व इतर प्रांतांतही लोखंडाच्या खाणी आहेत. परंतु चीनच्या गरजा लक्षात घेता, चीनमधील लोखंडाचे उत्पादन फारच अल्प आहे.

हँकौ ह्या औद्योगिक केंद्राजवळील तायेह येथील लोखंडाच्या खाणीचा मुद्दाम उल्लेख करणे आवश्यक आहे. तायेह येथील खाणीतून मिळणाऱ्या लोखंडाचे प्रमाण (खाणीतून उत्पादिण्यात येणारे लोखंड अशुद्ध असते, म्हणून ते शुद्ध करून घ्यावे लागते. हे जगातील उत्तमोत्तम लोखंडाच्या तोडीचे असल्याचे समजते.

चीनमध्ये इ. स. १९५८ मध्ये लोखंडाचे एकंदर उत्पादन ३ कोटी टनांचे आसपास होते. यापासून जवळजवळ दीड कोटी टन पिग आयर्नचे उत्पादन झाले. इन गॉटस व कास्टिंग्जचे उत्पादन जवळजवळ सव्वा कोटी टन झाले. चीनमधील सर्वांत मोठे पोलादाचे कारखाने मांचूरियातील आनशान येथे, हुपाय प्रांताची राजधानी वूहान येथे व आंतर मोंगोलियातील पा ओ तौ येथे आहेत. दुसऱ्या महायुद्धापर्यंत चीनमधील बहुतेक सर्व लोखंडाच्या

खाणींतून मिळणारे लोखंड जपानला पाठविण्यात येत असे. चीनमधील पोलादाचे उत्पादनातही जपानी भांडवलाचा भाग फार महत्त्वाचा होता. चीनमध्ये साम्यवादी सरकार प्रस्थापित झाल्याबरोबर पोलादाचे उत्पादन पूर्णपणे सरकारी मालकीचे झाले. इतकेच नव्हे, तर चीनमध्ये खाणींतून मिळणारे लोखंड जपानला निर्यात करण्यावरही निरनिराळ्या प्रकारची बंधने घालण्यात आली.

## खनिज तेल

इ. स. १९४७ च्या भूगर्भ शास्त्रीय पाहणीनुसार चीनमधील एकंदर खनिज तेलाचा साठा ८० कोटी टनांचे आसपास असावा, असा अंदाज आहे. इ. स. १९५४ मध्ये चीनमध्ये खनिज तेलाचे उत्पादन ४ लाख टनांचे आसपास होते. १९५९ मध्ये उत्पादनाचा जोर वाढून एकंदर ३७ लक्ष टन तेल विहिरीतून काढण्यात आले.

## पत्रा

युनान प्रांत जस्त किंवा पत्र्याचे उत्पादनाकरिता प्रसिद्ध आहे. चीनमधील जस्ताचे एकंदर उत्पादन ५,००० टनांचे आसपास आहे.

## टंगस्टन-वोल्फरॅम

चीनमधील टंगस्टनचे एकंदर उत्पादन २० हजार टनांचे आसपास असून, टंगस्टनच्या उत्पादनात चीनचा सर्व जगात पहिला क्रमांक लागतो. टंगस्टन ही धातू हूनान, यूनान व क्वांगटुंग ह्या प्रांतात विशेषतः सापडते.

## पारा

चीनमध्ये इ. स. १९४८ मध्ये सुमारे ३०० टन पारा उत्पादिला गेला.

## इतर खनिजे

इ. स. १९५० मध्ये तांब्याचे उत्पादन ७७,००० टन झाले. शिसे ७७,००० टन निघाले. ॲल्युमिनियमचे उत्पादन ८८,००० टन होते. मँगनीजचे उत्पादन १३,८०,००० टन होते. चांदी ५,१०,००० औंस निघाली. मिठाचे उत्पादनाने १३/४ कोटी टनाचे लक्ष्य गाठले.

इ. स. १९५० च्या चीन–रशिया यांचेमधील करारास अनुसरून २ चिनी–रशियन सहकार्यांच्या जॉईंट स्टॉक कंपन्या स्थापन करण्यात आल्या व ह्या कंपन्यांमार्फत सिनकिआंग प्रांतातील खनिज तेल व नॉन फेरस धातूंच्या उत्पादनाचा एक कार्यक्रम आखण्यात आला. इ. स. १९५५ नंतर ह्या कंपन्यांतील रशियाचा संबंध काढून टाकण्यात आला. इ. स. १९५५ साली जी दशवर्षीय योजना आखण्यात आली, त्यानुसार इ. स. १९६२ मधील निरनिराळ्या खनिजांचे उत्पादन पुढीलप्रमाणे होते.

कोळसा ३३ $\frac{1}{2}$ कोटी टन; पिग आयर्न २ कोटी टन; कच्चे पोलाद १$\frac{3}{4}$ कोटी टन; सिमेंट १$\frac{1}{2}$ कोटी टन; कागद १६ लक्ष टन; लाकूड ३$\frac{1}{2}$ कोटी क्यूबिक मीटर्स; कापसाच्या सुताच्या ७० लक्ष गासड्या; कापसाचे कापड ६४ कोटी मीटर्स; लोकरीचे कापड २$\frac{1}{2}$ कोटी मीटर्स; रेशमी कापड २० कोटी मीटर्स.

चीनमधील खनिजांची स्थूल माहिती घेतल्यानंतर आता चीनमधील उद्योगधंद्यांविषयी थोडक्यात विचार करू. चीनमध्ये इ. स. १९४९ मध्ये साम्यवादी सरकारची स्थापना झाल्यापासूनच खऱ्या अर्थाने औद्योगिक क्रांतीला सुरवात झाली, असे म्हणण्यास हरकत नाही. हा वेळपावेतो चीनमध्ये पाश्चिमात्य देशांप्रमाणे मोठमोठे कारखाने किंवा उद्योगधंदे जवळ-जवळ नव्हतेच, असे म्हटले तरी चालेल. सर्वांत महत्त्वाचे खनिज जे कोळसा, त्याचे उत्पादन मुख्यतः चीनमधील लोहमार्गाशी निगडित होते. कोळशावर चालणारे मोठमोठे उद्योगधंदे अथवा कारखाने अभावानेच तळपत असल्याने खाणींतून निघालेला बहुतेक कोळसा एक तर लोहमार्गावरील वाहतुकीचे कामी उपयोगात आणला जाई किंवा तो परदेशी निर्यात केला जाई. चीन-मधील कोळशाच्या उत्पादनापैकी फार मोठा वाटा जपानी लोकांचे हाती होता. जपानमध्ये लोखंड व कोळसा ह्या दोन्ही अतिशय महत्त्वाच्या खनिजांचा संपूर्ण अभाव असल्याने व जपानमध्ये मोठमोठे उद्योग व कारखाने झपाट्याने वाढत चालल्याने २० व्या शतकाच्या सुरवातीपासूनच जपानी लोकांनी आपल्या लोखंड व कोळशाच्या गरजा भागविण्याकरिता आजू-

बाजूच्या कोरिया, मांचूरिया, चीन, टैवान वगैरे देशांत आपले राजकीय व आर्थिक पाय पसरण्यास सुरवात केली होती. चीनमध्ये लोखंड व कोळशाच्या खाणी कोठे कोठे असू शकतील, याबद्दल भूगर्भ शास्त्रीय पाहणीमध्येही जपानने चिनी सरकारला हवे ते साहाय्य देऊ केले. साहजिकच अशा पाहणी-नंतर त्या त्या ठिकाणी खोदण्यात येणाऱ्या खाणी व ह्या खाणींतून काढण्यात येणारे खनिज ह्या बाबतींतही जपानी उद्योगपतींनी निरनिराळ्या प्रकारांनी आपले वर्चस्व प्रस्थापित केले. चीनमध्ये पुष्कळ ठिकाणी लोखंड व कोळसा व प्रसंगविशेषी मॅंगनीज, टंगस्टनसारखी खनिजेही विपुल असल्याने, कच्चे लोखंड, कोळसा व इतर धातू चीनमधून जपानमध्ये नेऊन तेथे पोलाद तयार करण्यापेक्षा ते चीनमध्येच तयार केल्यास जास्त किफायत-शीर होईल, ह्या हिशेबाने जपानी लोकांनी खनिजांच्या मालकीमागोमाग ह्या खनिजांचे शुद्धीकरणाचे कारखानेही चीनमध्ये सुरू केले. विशेषतः यांगत्से-किआंग नदीचे खोरे हे निरनिराळ्या प्रकारच्या खनिजांचे माहेरघरच होय. म्हणून ह्या यांगत्सेकिआंग नदीच्या दोन्ही बाजूस ठिकठिकाणी जपानी लोकांच्या प्रेरणेने व भांडवलाच्या सढळ मदतीमुळे मोठमोठे पोलादाचे कारखाने सुरू झाले. या कारखान्यांच्या मागोमाग इतर निरनिराळ्या प्रकारच्या कारखान्यांची उभारणी सुरू झाली व अशा प्रकारे जपानी लोकांच्या प्रत्यक्ष सहकार्याने चीनमध्ये मोठ्या प्रमाणावर औद्योगीकरणास सुरवात झाली.

यांगत्सेकिआंग नदीचे खोरे चीनमधील कारखाने व उद्योगधंदे ह्यांच्या वाढीचे केंद्र होण्याची काही मुख्य कारणे पुढीलप्रमाणे आहेत :—

( १ ) यांगत्से नदीच्या दोहोबाजूस कोळसा व लोखंड ह्यांच्या मुबलक खाणी आहेत. ह्या खाणींतून मिळणारे लोखंड व कोळसा शांघाय व इतर यांगत्से नदीकाठच्या बंदरांत आणण्यास यांगत्से नदीसारखी वाहतुकीची उत्तम सोय आहे.

( २ ) यांगत्से नदीच्या मुखावर शांघाय हे सर्व जगातील एक मोठे बंदर वसले आहे. शांघायमध्ये निरनिराळ्या परकीय राष्ट्रांच्या व्यापारी पेढ्या आपआपला पसारा मांडून बसल्या आहेत. चीनच्या एकंदर आयात-निर्यातीच्या सुमारे ७० टक्के व्यापार एकट्या शांघाय बंदरातून होत असल्या-

मुळे शांघाय हे चीनच्या औद्योगिक प्रगतीचे मोजमाप करण्याचे एकमापकच ( measurement ) होय, असे म्हणावयास हरकत नाही. त्यामुळे यांगत्से नदीच्या खोऱ्यात कोठलाही नवीन उद्योग किंवा मोठा कारखाना सुरू करावयाचा झाल्यास, त्याच्या यशापयशाबद्दल शांघायमधील मोठमोठ्या पेढ्या, बँका व उद्योगपती यांना बरोबर कल्पना असते. उद्योगाला लागणारे भांडवल मिळविणे ह्यामुळे सोपे जाते.

( ३ ) यांगत्से नदीचे खोरे म्हणजे चीनमधील अत्यंत दाट लोकवस्तीचा भाग होय. साहजिकच एखाद्या उद्योगाकरिता मोठ्या प्रमाणावर कामकऱ्यांची जरूर लागली, तर ह्या दाट लोकवस्तीच्या प्रदेशातून वाटेल तेवढे व स्वस्त दरात कामकरी मिळू शकतात.

( ४ ) फार पूर्वीपासून यांगत्से नदीच्या खोऱ्यात लहान लहान प्रमाणावर हातमागाचा उद्योग चालू आहे. त्यामुळे कापडाच्या गिरण्यांस लागणारा कसबी कारागीरवर्गही ह्या भागात मुबलक मिळू शकतो. ह्या भागात दळणवळणातही कल्पनेच्या बाहेर वाढ झाली असल्याने व हरघडी होत असल्याने, लोहमार्ग, मोटारी, लहान-मोठ्या आगबोटी, होड्या, गलबते वगैरेंमुळे, अनेक लहान-मोठे तंत्रज्ञही मिळू शकतात.

( ५ ) एकदा एखादा कारखाना निघाला, की त्याच्या अनुषंगाने इतरही अनेक प्रकारचे उद्योगधंदे सुरू करणे शक्य होते. साहजिकच औद्योगिक वाढीला सुरवात होते.

( ६ ) कारखान्यांना लागणारी शक्ती कोळशापासून मिळते व कोळसा ह्या भागात मुबलक मिळत असल्याने व हा कोळसा खाणींपासून औद्योगिक केंद्रापर्यंत आणणेही जलवाहतुकीमुळे स्वस्त पडत असल्याने, कारखान्यांचे उभारणीतील एक मोठी अडचण अनायासे दूर होते.

( ७ ) जलवाहतूक व जमिनीवरील लोहमार्ग व रस्ते ह्यांच्या समृद्धीमुळे ह्या भागात दळणवळणाची फारच चांगली सोय आहे. पूर्व-पश्चिम ही यांगत्सेच्या अनुषंगाने सुरू असलेली जलवाहतूक व ह्याखेरीज दक्षिणोत्तर लोहमार्ग, रस्ते व कालवे वगैरेंच्या सहाय्याने सुरू झालेली जलवाहतूक यांमुळे कच्च्या मालाचा पुरवठा व कारखान्यांतून उत्पादन झालेल्या मालाच्या वितरणाचा प्रश्न सुटण्यास फार मोठी मदत होते.

चीनच्या औद्योगिक विकासास पोषक असे चीनचे खालील औद्योगिक विभाग पडतात. त्यांचा थोडासा सविस्तर विचार केला पाहिजे.

( १ ) मुकडेन–डायरेन विभाग : ह्या भागात कोळसा, लोखंड व सैंधव ही खनिजे विपुल आढळतात. साहजिकच ही खनिजे व ह्या भागातील सोयाबीनचे पीक ह्यांचा उपयोग करून लोखंड व पोलादाचे कारखाने, खते व निरनिराळ्या रासायनिक द्रव्यांचे उद्योग, सोयाबीनपासून तयार होणाऱ्या निरनिराळ्या वस्तू, सिमेंटचे कारखाने व लोहमार्गास आवश्यक असलेल्या हरतऱ्हेच्या वस्तूंच्या उत्पादनाचे कारखाने काढता येण्यासारखे आहेत व ह्यांपैकी काही निघाले आहेत. या औद्योगिक विभागातील मुकडेन व डायरेन ह्या दोन शहरांची थोडी पूर्व माहिती घेतली तर ह्या सबंध औद्योगिक टापूचीच कल्पना येईल.

## मुकडेन

हे मांचूरियातील लाया ओनिंग प्रांताची राजधानी असून, हल्ली त्याचे शेंगयांग असे नवीन नाव ठेवण्यात आले आहे. पूर्वीचे काळी त्याचे चिनी नाव 'फेंग टी एन्' असे होते.

शेंगयांग हे शहर लायाहो नदीची एक उपनदी हूनहो हिच्या काठावर वसले आहे. पूर्व मांचूरियन डोंगराळ भागातून पश्चिमेकडील चीनमध्ये येण्याच्या मार्गावरील हे लष्करीदृष्ट्या मोक्याचे ठिकाण आहे. पूर्वेकडील उंचवट्याचे प्रदेश व दक्षिण मांचूरियाचे मैदान ह्यांच्या सीमेवरच जणू मुकडेन हे शहर वसले आहे. सोयाबीन्स, केओलिंग, बीट ही मुख्य पिके असून आजूबाजूच्या डोंगराळ भागांतील लाकूड पण महत्त्वाची व्यापारी वस्तू आहे. डोंगराच्या उतरणीवर पाळण्यात येणाऱ्या मोठमोठ्या गुरांच्या कळपांपासून फर, लोकर व चामडी भरपूर प्रमाणात उपलब्ध होतात. मुकडेन शहरानजीक फूशान व येनटाई ह्या कोळशाच्या खाणींतील कोळसाही मुबलक प्रमाणात मिळू शकतो. कोळशाच्या उपयोगापासून यांत्रिक शक्ती उत्पन्न करून, त्यांवर मोठमोठे कारखाने अलीकडे चालू करण्यात आले आहेत. पिठांच्या गिरण्या, तेल गाळण्याच्या गिरण्या, कातडे कमविण्याचे कारखाने, कागद तयार करणाऱ्या गिरण्या, साबणाचे कारखाने, पोलादाचे

# चीन
## औद्योगिक केंद्रे


१ लोखंड व पोलाद कारखाना.
२ वीज निर्मिती केंद्र.
३ अणुशक्ती केंद्र.
४ कोळशाची खाण.
५ धातूंची खाण.
६ खनिज तेलाची विहिर.
७ वीज-यंत्राचा-कारखाना.
८ मोटारीचा कारखाना.
९ रेल्वे एंजिनांचा-कारखाना.
१० यंत्रांच्या भागांचा कारखाना.
११ रासायनिक कारखाना.
१२ सिमेंटचा कारखाना.
१३ लाकूड निर्मिती केंद्र.

80043
362
28/11/64

# चीन
## राजकीय विभाग व लोहमार्ग



कारखाने, यंत्रे तयार करण्याचे कारखाने वगैरे निरनिराळ्या उद्योगधंद्यांची ह्या विभागात अलीकडे वाढ होऊ लागली आहे.

मुकडेनची लोकसंख्या जवळजवळ ३० लाख आहे.

### डायरेन

पूर्वीच्या चिनी 'टालीएन' ह्या शहराचे जपानी लोकांनी ठेवलेले हे अलीकडील नाव आहे. डायरेन हे शहर व बंदर लाया ओटुंग द्वीपकल्पाच्या दक्षिणेला, क्वांगटुंग प्रांतात आहे. जपानी लोकांच्या कारकोर्दीत डायरेन बंदराचा खूप मोठा विस्तार होऊन, धक्के, कोरडया गोदी, मोठमोठी कोठारे व कोळसा व तेल आगबोटींमध्ये भरण्याची खास व्यवस्था ह्या बंदरात करण्यात आली.

क्वॉंगटुंग प्रांतातील सर्व कच्चा माल ह्याच बंदरातून परदेशी रवाना होत असल्याने ह्या बंदराची झपाट्याने वाढ झाली. ह्या वाढीच्या बरोबर लहानमोठे उद्योगधंदेही येथे सुरू करण्यात आले.

ह्या शहराची लोकसंख्या सुमारे १२ लाख आहे.

( २ ) चीनमधील दुसरा औद्योगिक विभाग म्हणजे टीएंटसिन—चिनवँगटौ हा होय.

टीएंटसिन–चिनवँगटौ हा विभाग म्हणजे चीनच्या ईशान्य बाजूचा पण पोहाई किंवा पेहचीलींच्या आखाताच्या पश्चिमेला लागून असलेला प्रदेश होय. हा प्रदेश कोळसा, सैंधव व कापूस ह्या वस्तूंच्या उत्पादनाकरिता प्रसिद्ध असून, अलीकडे ह्या भागात रासायने, सिमेंट, काचसामान, कापसाचे, रेशमाचे व लोकरीच्या कापडांचेही कारखाने सुरू करण्यात आले आहेत. यांतील टीएंटसिन व चिनवँगटौ ह्या शहरांच्या थोडयाशा खाली दिलेल्या माहितीवरून ह्या औद्योगिक विभागाचे महत्त्व समजून येईल.

### चिन वँगटौ

ईशान्य चीनमधील लाया ओटुंग आखतावर वसलेले हे एक बंदर होय. हे पूर्वी परकीय लोकांस व्यापाराकरिता खुले करण्यात आलेल्या बंदरांपैकी एक बंदर होते. या बंदराची उभारणी व वाढ ही मुख्यतः कैलान

मायनिंग कॉर्पोरेशनकडून करण्यात आली. ही कंपनी चिनवँगटौपासून सुमारे १०० मैल लांब असलेल्या कायपिंग येथील कोळशाच्या खाणीची व्यवस्था पाहाते. येथून जवळच असलेल्या टायशान येथे विटा व सिमेंट तयार करण्यात येते व सुरवातीला चिनवँगटौ ह्या बंदरातून कोळशाबरोबर विटा व सिमेंट यांचीही निर्यात होत असे. चिनवँगटौ येथे सर्व चीनमधील सर्वात मोठा काचकारखाना आहे.

लाया ओटुंगच्या आखातातील बर्फापासून मुक्त असे हे एकमेव बंदर असल्याने हिवाळ्यात टीएंटसिन बंदराऐवजी याच बंदराचा उपयोग केला जातो.

चिनवँगटौची लोकसंख्या अदमासे ५० हजार आहे.

## टीएंटसीन

पायहो व हूनहो ह्या दोन नद्यांच्या संगमावर वसलेले हे शहर चीनमधील होपाय प्रांताची राजधानी असून, ते एक मोठे व्यापाराचे केंद्र आहे. पायहो व हूनहो ह्या नद्या दक्षिणेकडील यांगत्से नदीला सुप्रसिद्ध ग्रँड कॅनॉलने जोडल्यामुळे तर टीएंटसीनला दळणवळणाचे एक महत्त्वाचे केंद्र म्हणून आणखीच महत्त्व आले आहे. चीनच्या पूर्व किनाऱ्यावरील पोहाई किंवा पेह्चीलीच्या आखातापासून जलमार्गाने टीएंटसीन ७० मैल पश्चिमेकडे आहे, पण हेच अंतर जमिनीवरून फक्त ३० मैलच आहे.

टीएंटसीन हे शहर उत्तर चीनमधील सुपीक प्रदेशांत मोडत असल्यामुळे येथे व्यापार मोठ्या प्रमाणावर चालतो. ईशान्य व वायव्य भागात कोळसा विपुल असल्यामुळे, येथे कारखान्यास लागणारी शक्ती कोळशापासून तयार करता येते. साम्यवादी चिनी सरकारच्या नवीन नवीन औद्योगिक योजनांमुळे टीएंटसीन हे अलीकडे एक महत्त्वाचे औद्योगिक केंद्र होऊ पाहात आहे. ह्या शहराची लोकसंख्या सुमारे १५ लाख आहे.

( ३ ) चीनमधील तिसरा औद्योगिक विभाग म्हणजे त्सिंगटौ–त्सिनान टापू हा होय. हा त्सिंगटौ–त्सिनान टापू टीएंटसीन–चिनवँगटौ टापूच्या दक्षिणेस, शांटुंग द्वीपकल्पाचा मध्यभाग होय.

शांटुंग द्वीपकल्पाचा भाग हा कोळशाच्या खाणीकरिता प्रसिद्ध आहे.

कारखान्यांना लागणारी शक्ती उत्पन्न करण्याकरिता कोळशाची जरूर असल्यामुळे, ह्या भागातच उपलब्ध असलेला कोळसा म्हणजे ह्या भागात निरनिराळे कारखाने काढण्याला मोठीच मदत होय. ह्याखेरीज त्या भागातून होऽहँगहो व तिच्या उपनद्या वाहात असल्यामुळे हा एक सुपीक प्रदेश बनला आहे. कापसाचे पीक फार मोठे आहे. ह्या कापसापासून निरनिराळ्या तऱ्हेचे कापड तयार करणाऱ्या कापड गिरण्या ह्या औद्योगिक विभागात सुरू करण्यात आलेल्या आहेत. ह्या विभागाची आणखी जास्त कल्पना, ह्या विभागातील दोन शहरांच्या माहितीवरून स्पष्ट होईल.

## त्सिनान

ह्यालाच 'चिनान' असेही म्हणतात. ही शांटुंग प्रांताची राजधानी असून, ह्याच्या आजूबाजूचा प्रदेश म्हणजे एक सपाट व अत्यंत सुपीक असा प्रदेश आहे. इ. स. १८५४ मध्ये होऽहँगहो नदीने आपले पात्र बदलले, त्या वेळी त्सिनान हे शहर होऽहँगहो नदीच्या अगदी जवळ, फक्त पाच मैल अंतरावर होते. ह्या शहराजवळ टीएंटसीन-पुकॉव रेल्वेवरील होऽहँगहो नदीचा मोठा पूल बांधला आहे. त्सिनानपासून पूर्व-पश्चिम लोहमार्गही शांटुंग द्वीपकल्पात तयार करण्यात आले असून, त्सिंगटौ ते पोशान कोळशाच्या खाणीपर्यंतच्या लोहमार्गाचे नियंत्रण त्सिनानहूनच करण्यात येते त्सिनान येथे गहू दळण्याच्या व कापडाच्या मोठमोठ्या गिरण्या आहेत. ह्य. शहराची लोकसंख्या ७॥ लक्ष आहे.

## त्सिंगटौ

शांटुंग द्वीपकल्पाच्या दक्षिणेकडील किओचौ सामुद्रधुनीवरील हे महत्त्वाचे बंदर आहे. इ. स. १८९७ मध्ये हे बंदर व ह्याच्या आजूबाजूच्या ३० चौरस मैलांचा मुलूख जर्मन सरकारने चीन सरकारकडून ९९ वर्षांच्या कराराने भाड्याने घेतला व तेव्हापासून ह्या बंदराची भराभर सुधारणा व्हावयास लागली.

त्सिंगटौ बंदरापासून शांटुंग प्रांताची राजधानी त्सिनानपर्यंत पूर्व-पश्चिम एक महत्त्वाचा लोहमार्ग आहे. जर्मन लोकांच्या प्रोत्साहनाने ह्या ठिकाणी मोठमोठ्या कापडाच्या गिरण्या सुरू करण्यात आल्या, पण इ. स. १९३५ च्या

जपानी स्वारीमध्ये ह्या गिरण्यांची फारच मोठी वाताहत झाली. अलीकडे पुन्हा ह्या गिरण्या सुरू झाल्या आहेत. ह्या शहराची लोकसंख्या ११ लाख आहे.

(४) चीनमधील चौथा औद्योगिक विभाग म्हणजे शांघाय–हँगचौ–नानकिंग ह्या शहरांनी बनलेला एक त्रिकोण होय. हा भाग म्हणजे चीनच्या औद्योगिक विकासाचा जणू काय आत्माच होय, असे म्हटल्यास त्यात अतिशयोक्ती होणार नाही. अगोदर चीनमधील मध्य भाग, त्यातूनही चीनच्या पूर्वेकडील हा समुद्रकिनाऱ्यालगतचा भाग व ह्यात भर म्हणूनच की काय, चीनमधील सर्वांत महत्त्वाच्या अशा यांगत्सेकिआंग नदीच्या मुखाजवळील असलेला हा प्रदेश, म्हणजे चीनच्या औद्योगिक विकासाचा त्रिवेणी संगमच जणू आहे.

आजूबाजूचा अत्यंत सुपीक असा प्रदेश, यांगत्से खोऱ्यात मिळणारे लोखंड, कोळसा वगैरे महत्त्वाची खनिजे, पूर्व-पश्चिम व दक्षिणोत्तर जाणारे खुष्कीचे व जलमार्ग, या सर्वांमुळे, हा एकंदर भाग एक अतिशय दाट लोकसंख्येचा भाग होय. ह्या प्रदेशाची जास्त माहिती खाली दिलेल्या ह्या भागातील काही महत्त्वाच्या शहरांचे वर्णनावरून जास्त चांगली होईल.

## शांघाय

औद्योगिक चीनची जणू काय राजधानीच असे हे बंदर व शहर चीनच्या पूर्व किनाऱ्यावर यांगत्सेकिआंग नदीच्या मुखावर वसले आहे. जगातील काही अगदी थोड्या अत्यंत महत्त्वाच्या बंदरांमध्ये ह्या शांघाय बंदराचा समावेश होतो. चीनचा जवळजवळ शेकडा ७० टक्के आयात-निर्यात व्यापार एकट्या शांघाय बंदरातून होतो. ह्यावरून ह्या बंदराच्या महत्त्वाची कल्पना येईल.

शांघाय, नानकिंग व हँगचौ ह्या शहरांचा मिळून एक त्रिकोण होतो. शांघाय व नानकिंग ह्यांमधील लोहमार्गाने अंतर १९४ मैल असून, शांघाय ते हँगचौ हे अंतर लोहमार्गाने १७८ मैल आहे.

दुसऱ्या महायुद्धाच्या सुरवातीस, १९३९ मध्ये शांघाय बंदरात एकंदर ४,२४४ लहानमोठ्या आगबोटींनी नांगर टाकला व त्यांनी ने-आण

केलेल्या मालाचे एकूण वजन दीड कोटी टन होते. शांघाय बंदरामुळे चिनी सरकारच्या एकंदर जकात-उत्पन्नापैकी ५० टक्क्यांहून जास्त उत्पन्न मिळाले.

शांघाय, नानकिंग, हँगचौ ह्या टापूला इतके औद्योगिक महत्त्व येण्याची खालील महत्त्वाची कारणे दाखविता येतील :—

( १ ) हा प्रदेश अत्यंत सुपीक असल्याने निरनिराळ्या प्रकारचा कच्चा माल विपुल प्रमाणात मिळू शकतो.

( २ ) ह्या भागातील लोकसंख्या अतिशय दाट असल्यामुळे येथे कारखान्यांत काम करण्याकरिता भरपूर कामकरी मिळतात.

( ३ ) ह्या भागात निरनिराळ्या प्रकारची विपुल दळणवळणाची साधने असल्याने मालाच्या ने-आणीचा प्रश्न फारच चांगल्या, सोप्या व अल्प खर्चात सुटतो.

( ४ ) ह्या भागात फार पूर्वीपासून हातमागाचा धंदा जोरात चालू असल्याने विणकर व त्यांच्या अनुषंगाने इतरही प्रकारचे तंत्रज्ञ भरपूर मिळू शकतात.

( ५ ) यागत्से नदीच्या खोऱ्यातील विशेषतः पश्चिमेकडील भागात मुबलक कोळसा मिळत असल्याने, मोठमोठ्या कारखान्यांस लागणारी शक्ती सुलभ रीतीने मिळू शकते. शिवाय हा कोळसा दूर अंतरावरूनही आणणे जलवाहतुकीमुळे परवडणारे असते.

( ६ ) ह्या भागातील अतिशय दाट लोकसंख्येमुळे पक्कया मालाला गिऱ्हाईकही हमखास व भरपूर मिळते. वाहतुकीच्या निरनिराळ्या प्रकारांमुळे पक्कया मालाची परदेशी निर्यात करणेही सुलभ होते.

शांघाय या औद्योगिक केंद्रात हरतऱ्हेचे मोठमोठे कारखाने आहेत, पण त्यांतल्या त्यात गरम, रेशमी व सुती कापडाचे कारखाने किंवा गिरण्या तर फारच आहेत. चीनमधील एकंदर कापडाच्या गिरण्यांपैकी ५० टक्क्यांहून जास्त गिरण्या एकट्या शांघाय शहरात आहेत. रेशमी कापडाचे जवळजवळ ४०० लहानमोठे कारखाने आहेत.

इ. स. १९३६ च्या जपानने चीनवर केलेल्या स्वारीत शांघायच्या औद्योगिक केंद्राचे नुकसान किती झाले, त्याची खालील तपशिलावरून कल्पना येईल.

| उद्योगाचे नाव | कापड गिरण्या | कापड रंगविणे | कापड विणणे | रेशमी सूत व कापड | रसायने |
|---|---|---|---|---|---|
| नुकसानी ( कोट रुपयांत ) | ४० | ५ | ४० | ६० | ५ |

| साबण व कातडी | रबर | कागद | तंबाखू | गव्हाचे पीठ | यंत्रे करणे | इतर |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | २ | ३ | ३ | ३ | ७ | २५ |

गेल्या दहा वर्षांत शांघाय येथील औद्योगिक वसाहतींची पुनर्रचना व पुनर्वसाहत करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

शांघायची लोकसंख्या सुमारे ८० लक्ष आहे.

## नानकिंग

किआंगसू प्रांताची व आंतरराष्ट्रवादी चिनी सरकारची राजधानी असलेले हे शहर. ह्याचे जुने नाव 'किआंग-निंग' असे होते. पीकिंगपासून कँटन ह्या दक्षिणोत्तर लोहमार्गावरील हे अगदी नाक्यावरील केंद्र. यांगत्सेकिआंग नदीच्या काठी हे शहर वसले असून, पूर्व चिनी समुद्रापासून जवळजवळ २५० मैल पश्चिमेकडे आहे. मोठमोठ्या आगबोटी सहजरीतीने नानकिंग बंदरापर्यंत येत असल्याने नानकिंग ही एक मोठी बाजारपेठ झाली आहे. नानकिंग हे फार पूर्वीपासून चीनमधील एक महत्त्वाचे सांस्कृतिक केंद्र समजण्यात येते. येथील विश्वविद्यालय सुप्रसिद्ध आहे. टीएंटसीन ते पुकाव ह्या लोहमार्गाचे नानकिंग हे दक्षिणेकडील टोक आहे.

येथे हरतऱ्हेचे लहानमोठे कारखाने आहेत. ह्या शहराची लोकसंख्या १५ लाख आहे.

## हँगचौ

मध्य चीनमधील यांगत्सेकिआंग नदीच्या मुखाजवळील त्रिभुज प्रदेशातील औद्योगिक विभागाच्या त्रिकोणाचा हे शहर म्हणजे तिसरा बिंदू होय. हँगचौ ही चेकिआंग प्रांताची राजधानी आहे.

हँगचौ हे बंदर तिसआनटांग नदीच्या मुखाजवळ, हँगचौच्या उपसागरावर म्हणजेच चीनच्या पूर्व किनाऱ्यावर वसले आहे. पूर्वी ह्याचे नाव किंगत्से किंवा राजधानी असे होते.

हँगचौ रेशमी कापडाच्या गिरण्या व गव्हाच्या पिठाच्याकरिता प्रसिद्ध आहे. ह्या शहराची लोकसंख्या ८ लाख आहे.

## हँकौ ( वुहान )

चीनमधील पाचवा औद्योगिक विभाग म्हणजे हँकौ व त्याच्या आसमंतातील प्रदेश हा होय. हँकौचेच दुसरे नाव म्हणजे 'वूहान' होय. ह्या औद्योगिक प्रदेशाची माहिती हँकौ शहराच्या वर्णनावरून मिळू शकते.

हँकौ हे शहर हानकियांग व यांगत्सेकिआंग ह्या दोन नद्यांच्या संगमावर वसले आहे. मध्य चीनमधून वाहणाऱ्या यांगत्सेकिआंग नदीच्या काठी वसले असल्याने व हे शहर मध्य कल्पून एक मोठे वर्तुळ काढल्यास ह्या वर्तुळाच्या परिघावर पीकिंग, सीआनफू, चेंगटू, युआनफू, कंतान व शांघाय ही शहरे सारख्या अंतरावर येतात.

चीनच्या पूर्व किनाऱ्यापासून यांगत्से जलमार्गाने हे बंदर व शहर जवळजवळ ५०० मैल पश्चिमेकडे असूनही मोठमोठ्या आगबोटी थेट हँकौपर्यंत सुलभ रीतीने येऊ शकत असल्यामुळे ह्या बंदराचे महत्त्व विशेष वाढले आहे. हँकौच्या आसमंतातील हानयांग व वूचांग हे सर्व भाग मिळून जो एक मोठा औद्योगिक विभाग बनला आहे, त्यालाच 'वूहान' असे नाव देण्यात येते. हँकौच्या पश्चिमेकडे यांगत्से नदीतून मोठमोठ्या आगबोटी जाऊ शकत नसल्यामुळे हँकौ हे बंदर मोठमोठ्या आगबोटीतून लहान लहान पश्चिमेकडे जाणाऱ्या बोटींवर मालाची चढउतार करण्याचे एक मोठे केंद्र बनले आहे. हँकौपासून पश्चिमेकडे सुमारे १००० मैलांवर यांगत्से नदीवरील ईशांग ह्या बंदरापर्यंत लहान लहान आगबोटी जाऊ शकतात.

हँकौ हे पीकिंगपासून कंतानपर्यंत जाणाऱ्या दक्षिणोत्तर लोहमार्गावरील एक फार महत्त्वाचे केंद्र आहे.

हँकौच्या आसमंतातील अतिशय सुपीक प्रदेशात शेतीपासून निरनिराळ्या प्रकारचा कच्चा माल मिळत असल्याने, ह्या कच्च्या मालाचे पक्क्या मालात रूपांतर करण्याचे तऱ्हेतऱ्हेचे कारखाने ह्या हँकौ विभागात आपणास आढळून येतात. ह्याशिवाय हँकौचे आसपास विपुल खनिजे पण मिळतात. लोखंड व कोळसा ही दोन खनिजे तर एकमेकांना लागूनच असल्यामुळे

ह्या भागातील हानयान यांग येथील पोलादाचा कारखाना जगातील मोठमोठ्या कारखान्यांपैकी एक समजण्यात येतो.

ह्या भागात चहा, कापूस, रेशीम, लाकूड, चामडी मोठ्या प्रमाणावर पैदा होत असल्यामुळे हँकौ हे ह्या वस्तूंच्या देवघेवीकरता एक व्यापारी केंद्र म्हणून समजण्यात येते.

हँकौ व त्याच्या आसमंतातील भागात पोलादाचे कारखाने, रेशमी, लोकरीच्या व कापसाच्या कापडाच्या गिरण्या, कापड रंगविण्याचे कारखाने, तांदूळ सडण्याच्या गिरण्या, तेल गाळण्याच्या गिरण्या, सिमेंटचे कारखाने, साबण तयार करण्याचे कारखाने, तंबाखूपासून सिगरेटस्, चिरूट वगैरे बनविण्याचे कारखाने, जहाजे बांधण्याच्या गोद्या, वगैरे हरतऱ्हेच्या पक्क्या मालाचे उत्पादन करणारे उद्योगधंदे आहेत व म्हणून ह्या औद्योगिक विभागास एक विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

हँकौ ह्या ठिकाणी यांगत्सेवरील पूर्व-पश्चिम जलवाहतूक व पीकिंगपासून कंतानपर्यंतची दक्षिणोत्तर जलवाहतूक मिळत असल्याने व हे लोहमार्गाचेही एक महत्त्वाचे केंद्र असल्याने, ह्या शहराचे महत्त्व आणखीच वाढले आहे.

वूहानची लोकसंख्या सुमारे २५ लाख आहे.

## हाँगकाँग-कंतान

हा विभाग म्हणजे चीनच्या अती दक्षिणेकडील विभाग असून, ह्याला सीकिआंग नदीच्या मुखाजवळील त्रिभुज प्रदेश असेही म्हणता येईल. सुपीक जमीन, सपाट प्रदेश, मुबलक दळणवळणाची साधने, निरनिराळ्या प्रकारच्या कच्च्या मालाची पैदास, ह्या विभागाच्या जवळच नैर्ऋत्येच्या कोपऱ्यात सापडणारी खनिजे, वगैरे गोष्टी लक्षात घेता हा विभाग औद्योगिक विकासाचा पुष्कळच भरभराटीचा विभाग म्हणावयास हरकत नाही. ह्या विभागातील मुख्य औद्योगिक केंद्र कंतान होय.

## कंतान किंवा कँटन

दक्षिण चीनची व्यापारी राजधानी व सीकिआंग प्रांताचे मुख्य ठिकाण म्हणून कंतानला विशेष महत्त्व आहे. ह्याला पूर्वी क्वांगटुंग प्रांतावरून

क्कांगचौ असेही नाव देण्यात येत असे. सीकिआंग नदीवर असलेले हे एक महत्त्वाचे बंदर असून, परकीयांचा चीनमधील प्रवेश प्रथम याच बंदरातून झाला.

इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीने इ. स. १६८४ मध्ये कंतान येथे आपले पाय रोवले. त्यांचे मागोमाग फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनीही इ. स. १७२५ मध्ये आली. डच ईस्ट इंडिया कंपनीने फ्रेंचांनंतर सुमारे ५० वर्षे वाट पाहून इ. स. १७६२ मध्ये आपला पाय कंतानमध्ये टाकला. ह्या सर्व परकीय कंपन्या कंतानला गर्दी करण्याचे कारण म्हणजे त्या काळी अत्यंत तेजीत असलेला अफूचा व्यापार हे होय.

कंतान हे महत्त्वाचे लोहमार्गांचे केंद्र आहे. कंतान-हँकौ लोहमार्गाचे हे दक्षिणेकडील टोक आहे. कंतान ते कौलून ह्या लोहमार्गापैकी अजूनही सुमारे ९० मैल लोहमार्ग चिनी सरकारच्या मालकीचा असून, उरलेला २२ मैल लोहमार्ग अजून ब्रिटिशांचे ताब्यात आहे. ह्याशिवाय कंतान ते पूर्वेकडे फूचौपर्यंतही लोहमार्ग आहेच.

नैर्ऋत्य व पश्चिम भागातील कोळसा उपलब्ध झाल्यामुळे कंतानला जहाजे बांधण्याचे कारखाने आहेत. शिवाय ह्या भागात रेशमाच्या किड्यांची पैदास चांगली होत असल्याने रेशमाचे सूत व रेशमी कापड तयार करण्याचेही मोठमोठे कारखाने कंतान–हाँगकाँग ह्या औद्योगिक विभागात सुरू झाले आहेत. इतरही अनेक प्रकारचा पक्का माल येथे तयार होतो.

राजकीयदृष्ट्याही कंतानचे महत्त्व विशेष आहे. इ. स. १९११ च्या चिनी क्रांतीचा उगम कंतानमधूनच झाला. किंबहुना चीनमधील अलीकडच्या काळातील सर्व नवीन नवीन गोष्टींचा उगम कंतानपासून होतो. म्हणूनच की काय चिनी भाषेत एक म्हण आहे, "प्रत्येक गोष्टीची सुरवात कंतान-पासूनच होते."

कंतानची लोकसंख्या सुमारे १५ लाख आहे.

## हाँगकाँग

हे ब्रिटिशांच्या ताब्यातील बेट व त्याच्या आजूबाजूचा भाग साधारणपण कंतानहून ९० मैल दक्षिणेला आहे. हाँगकाँग व त्याच्या आसमंतातील

भागाची औद्योगिक भरभराट गेल्या १०–१५ वर्षांत तर फारच झपाट्याने झाली. इ. स. १९४५ मध्ये जपानी लोकांकडून ब्रिटिशांनी हाँगकाँगचा ताबा मिळविला, तेव्हा तेथील लोकसंख्या जेमतेम ६ लाख होती, पण गेल्या १५–२० वर्षांतील औद्योगिक भरभराटीमुळे आज त्याची लोकसंख्या २५ लाखांचे घरात आहे.

हाँगकाँगचे आजूबाजूला लोखंड, शिसे, वोल्फरॅम, ग्राफाईट व केओलिन ही एक प्रकारची माती विपुल मिळत असल्याने ह्या भागात १९४० मध्ये ४०० लहान–मोठे कारखाने होते, त्यांची संख्या आज ४,००० चे आसपास झाली आहे. ह्या कारखान्यांपैकी काही मोठमोठे आहेत. लोखंड व पोलाद, जहाजे बांधणे, लोखंडाचे पत्रे, नळ्या, खांब वगैरे करणे, ह्यांसारखे मोठमोठे कारखाने आहेत. त्याशिवाय रेशमी, सुती कापड, जोडे व बूट तयार करणे, तांब्या-पितळेची भांडी, प्लॅस्टिकच्या वस्तू, लहान–मोठे दोर तयार करणे, सिमेंट, सिगार व सिगारेटस्, काड्याच्या पेट्या वगैरेंचेही लहान व मध्यम कारखाने आहेत.

(७) चीनच्या औद्योगिक विकासाचा आणखी एक विभाग म्हणजे चुंगकिंगच्या आसमंताचा प्रदेश हा होय. हा भाग चीनच्या पश्चिमेकडील त्सेश्वान ह्या प्रांतातील मैदानाचा भाग होय.

## चुंगकिंग

चीनमधील त्सेश्वान प्रांताची राजधानी म्हणजेच चुंगकिंग होय. हे शहर यांगत्सेकिआंग नदीवर वसले असून, येथेच किआलिंग ही यांगत्सेची एक उपनदी यांगत्सेकिआंगला येऊन मिळते.

यांगत्सेकिआंग नदीतून ईशांगपासून पश्चिमेकडे चुंगकिंगपर्यंत मध्यम आकाराच्या आगबोटींची ये–जा शक्य असल्यामुळे चुगकिंग हे जलमार्गाचे दृष्टीनेही एक चीनचे महत्त्वाचे केंद्र आहे. शांघायपासून सुमारे १५०० मैलांवर चुंगकिंग असल्यामुळे इ. स. १९३५ च्या जपानी स्वारीमध्ये त्यावेळच्या क्यूओमिंटांग सरकारने आपले मुख्य ठाणे नॅनकिंगहून हलवून पश्चिमेकडे चुगकिंगला ठेवले.

चुंगकिंगचे सांस्कृतिक महत्त्वही पुष्कळच आहे. ह्या शहराचे पश्चिमेकडील

भागात कोळसा व लोखंड विपुल आढळत असल्याने, चुंगकिंगचे महत्त्व वाढू लागले. ह्याखेरीज तिबेट व चीन यांमधील खुष्कीचा व्यापारही चुंगकिंग येथूनच चालतो. ह्यामुळे चुंगकिंगचा औद्योगिक प्रदेश हा नवीन नवीन लहान–मोठ्या उद्योगधंद्यास प्रेरणा देणारा असा ठरू पाहात आहे.

चुंगकिंगची लोकसंख्या १२ लाख आहे.

( ८ ) चीनमधील शेवटचा औद्योगिक विभाग म्हणजे चीनच्या नैर्ऋत्ये-कडील कुनमिंग ह्या शहराभोवतालचा भाग हा होय.

## कुनमिंग

युनान (चिनी भाषेत ह्याचा अर्थ 'ढगांच्या दक्षिणेकडील देश' असा होतो.) प्रांताची राजधानी म्हणून कुनमिंग प्रसिद्ध आहे. कुनमिंगला आणखी दोन नावे आहेत व ती म्हणजे 'युनान–फू' व 'युन–नान–फू.'


कुनमिंग हे शहर चुंगकिंगच्या नैर्ऋत्येला सुमारे ५०० मैल असून, याच्या जवळच ब्रह्मदेश व इंडोचीन यांच्या सरहद्दी लागून येतात. गेल्या सुमारे १०–१५ वर्षांमध्ये चीनमधून पश्चिमेकडील तिबेट प्रांतापर्यंत पक्की सडक बांधण्याचे साम्यवादी सरकारने ठरविल्यापासून तर कुनमिंग ह्या शहराला विशेष महत्त्व प्राप्त झाले. ह्या पक्क्या सडकेला 'बर्मा रोड' असेही म्हणतात, कारण दुसऱ्या महायुद्धानंतर जपानी सैन्याच्या ब्रह्मदेश, इंडोचीन व भारत ह्या देशांवरील चढाईला मदत म्हणून जपानी सैन्याने अतिशय जलद गतीने हा मार्ग प्रथम तयार केला. त्याचाच विस्तार साम्यवादी चिनी सरकारने करून कुनमिंग ते ब्रह्मदेशातील भामो ह्या शहरापर्यंत गेलेल्या मार्गाला आणखी एक जोड देऊन कुनमिंग ते थेट तिबेटची राजधानी ल्हासा-पर्यंत पोचविला. या रस्त्याचाच आणखी एक भाग म्हणजे कुनमिंगपासून नैर्ऋत्येला उत्तर व्हिएटनामचे सुप्रसिद्ध बंदर हायफॉंग, हा ५०० मैलांचाही रस्ता पक्का बांधून काढण्यात आला.

कुनमिंगच्या आजूबाजूच्या डोंगराळ भागात जस्त, कोळसा, लोखंड, टंगस्टन, अँटिमनी, तांबे, सोने वगैरे धातू मुबलक सापडतात. या धातू शुद्ध करण्याचे, लहान-मोठी यंत्रे तयार करण्याचे, विजेची उपकरणे तयार करण्याचे,


रबर, सिमेंट व कापड वगैरेंचे अनेक लहान-मोठे कारखाने ह्या भागात सुरू करण्यात आले आहेत.

कुनमिंगची लोकसंख्या अदमासे ३ लाख आहे.

वर दिल्याप्रमाणे चीनच्या औद्योगिक प्रगतीची थोडक्यात माहिती दिली आहे. निरनिराळ्या वस्तूंच्या उत्पादनाचे तुलनात्मक आकडे ह्यानंतरच्या 'चीनचा परदेशी व्यापार' ह्या प्रकरणात देण्यात आले आहेत. त्यावरून चीनच्या औद्योगीकरणाची कल्पना येईल.



ठाणे. स्थळप्रत.
८००५३



# दळणवळण

चीनमधील दळणवळणाची साधने विपुल असली तरी सर्वसाधारणपणे त्याचे खालीलप्रमाणे भाग पाडता येतात.

## खुष्कीच्या मार्गाचे दळणवळण

चीनच्या एकंदर क्षेत्रफळापैकी सुमारे ७०–८० टक्के भाग हा डोंगराळ आहे. साहजिकच डोंगराळ भागातून आधुनिक प्रकारच्या दळणवळणाच्या सोयी उपलब्ध असणे फारसे शक्य होत नाही. कोणत्याही देशातील दळणवळणाची साधने म्हणजे त्या देशाच्या औद्योगिक व आर्थिक विकासाचे एक हमखास गमकच होय. त्या दृष्टीने चीनचा उत्तर, वायव्य, पश्चिम व नैर्ऋत्य भाग हा अतिशय मागासलेला आहे. ह्या ठिकाणी काही काही डोंगर तर इतके उंच आहेत, की त्या भागात वर्षातील बहुतेक काळ बर्फ असते. फार पुरातन काळापासून तिबेट व चीन, सीनकिआंग व चीन, मोंगोलिया व चीन, मांचूरिया व चीन आणि ब्रह्मदेश, इंडोचीन व चीन ह्यांमधील दळणवळण खुष्कीच्या मार्गाने, निरनिराळ्या नद्यांच्या खोऱ्यांचे सहाय्याने कसे तरी चालू असे. घोडे, उंट, बैल वगैरे जनावरांच्या पाठीवर ओझी लादून

पश्चिमेकडील माल चीनमध्ये व चीनमधील माल पश्चिमेकडे नेण्याचे काम केले जात असे. हे खुष्कीचे मार्ग अत्यंत कष्टदायक व कठीण अशा दऱ्याखोऱ्यांतून असल्याने अशा मार्गांवर वाटमारी नेहमी चालत असे. साहजिकच अशा खडकाळ पायरस्त्यावरून व्यापारी तांडे करून, एकमेकांच्या सोबतीने प्रवास करीत. अजूनही चीनमधील हे सरहद्दीवरील मार्ग पूर्वापार पद्धतीनुसारच चालू आहेत. त्यांमध्ये अजूनपर्यंत तरी म्हणावी तशी सुधारणा झाली नाही. याला एक अपवाद म्हणजे अगदी अलीकडेच तयार करण्यात आलेला युनान प्रातातून ब्रह्मदेश, इंडोचीन व तिबेट ह्यांस जोडणारा एक अद्ययावत मोटाररस्ता हा होय.

तिबेटवरील आपला सार्वभौमत्वाचा हक्क बजावण्याकरिता साम्यवादी चिनी सरकारने संबंधित परदेशी राष्ट्रांशी करारनामे करून चीनचे तिबेटवरील सार्वभौमत्व कबूल करून घेतले. त्यानंतर तिबेट व चीन ह्यांमधील दळणवळणाला लष्करी महत्त्व आले. इ. स. १९४१ च्या दुसऱ्या महायुद्धाच्या काळात जपानने आपली सैन्ये खुष्कीच्या मार्गाने इंडोचीन व ब्रह्मदेश ह्या देशांत पाठविण्याचे ठरवून, सैन्यांच्या सोयीकरता म्हणून मुद्दाम एक उत्तम मोटारींच्या जाण्या-येण्याकरता सोईस्कर असा 'बर्मा रोड' ह्या नावाचा रस्ता तयार केला. हा रस्ता युनानची राजधानी कुनमिंग येथून सुरू होऊन, त्याचा एक भाग ब्रह्मदेशमधील भामोपर्यंत, दुसरा फाटा इंडोचीनच्या उत्तर सरहद्दीवर टॉंगकिंग या शहरापर्यंत व तिसरा एक भाग तिबेटची राजधानी ल्हासापर्यंत तयार करण्यात आला. दुसरे महायुद्ध संपल्यावर ह्या बर्मा रोडची व्यवस्था साम्यवादी चिनी सरकारने आपल्या हाती घेतली व कुनमिंग ते ल्हासा हा मोटार-वाहतुकीला अगदी योग्य व फायदेशीर असा एक उत्तम रस्ता त्या सरकारने बांधून काढून तो वाहतुकीलाही खुला केला. भारताच्या ईशान्य सरहद्दीवर चिनी सैन्याची जमवाजमव करणे ह्या उत्तम रस्त्यामुळेच चिनी सरकारला शक्य झाले. एकदा तिबेटवरील चीनचे सार्वभौमत्व कबूल केल्यानंतर मग साम्यवादी सरकारने तिबेटमध्ये ल्हासापासून काश्मीर, नेपाळ, भूतान व भारतीय सरहद्दीपर्यंत जर रस्ते बांधणीचा कार्यक्रम हाती घेऊन तो तडीस नेला, तर कोणालाच काय पण आम्हा भारतीयांसही त्याबद्दल काही तक्रार करता येणार नाही. आपल्या व आपल्या मित्रराष्ट्रांच्या

सरहद्दीपर्यंत असे पक्के रस्ते होऊ नयेत, अशी आपली इच्छा असल्यास ह्या भागात चीनचे सार्वभौमत्व कबूल करण्याचे कारण नव्हते. आपल्या पुढाऱ्यांतील मुत्सद्दीपणाचा अभाव हेच एकमेव कारण याला देता देईल.

## जमिनीवरील वाहतूक

ही निरानिराळ्या प्रकारची असते. अगदी सुरवातीस लोक आपल्या हातातून, डोक्यावरून किंवा पाठीवर ओझी घेऊन, एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जात असत. अजूनही चीनच्या पुष्कळ मागासलेल्या भागांत दळणवळणाचे एकमेव साधन म्हणजे पायरस्ते हे होय.

यानंतर लहान लहान हातगाडया, जनावरांकडून ओढल्या जाणाऱ्या गाड्यांच्या – मग त्या दुचाकी असोत, किंवा चारचाकी असोत – सहाय्याने वाहतूक होऊ लागली. अशा प्रकारच्या वाहतुकीला अद्ययावत सडकांची जरूरी असतेच असे नाही. अडीअडचणीच्या मार्गांतूनही अशी गाडयांची वाहतूक होऊ शकते.

आर्थिक विकासाबरोबर दळणवळणांच्या साधनांचीही जरूर भासू लागते. पूर्वीच्या जुन्या वाहतुकीच्या साधनांमुळे वेळेचा अपव्यय होई. हा वेळेचा अपव्यय टाळण्याकरिता सडकांची जरूर भासू लागली. माणसांनी ओढल्या जाणाऱ्या किंवा बैलांनी ओढल्या जाणाऱ्या गाड्यांचेऐवजी जास्त जलद धावणाऱ्या साधनांची जरूर व सोयही उपलब्ध होणे अगत्याचे होऊन बसले. त्यानंतर मोटार-वाहतुकीला सुरवात झाली. मोटारींची वाहतूक जलद होण्याकरिता पक्क्या सडकांची आवश्यकता भासू लागली. मागणी व पुरवठा ह्या अर्थशास्त्राच्या तत्त्वानुसार पक्क्या सडकांची जसजशी मागणी वाढू लागली, तसतसे उत्तम उत्तम रस्तेही बांधण्यात येऊ लागले. इ. स. १९२१ मध्ये चीनमधील उत्तम सडकांची एकंदर लांबी फक्त १,१८५ किलोमीटर किंवा जवळजवळ ८०० मैल होती, पण १९३६ मध्ये अशा सडकांची लांबी १,१५,७०० किलोमीटर्स किंवा जवळजवळ ७०,००० मैल होऊन, १९५० मध्ये एकंदर २ लाख किलोमीटर्स किंवा १। लाख मैल लांबीच्या सडका तयार करण्यात आल्या. १९५० नंतरच्या साम्यवादी सरकारच्या कारकीर्दीत ह्या सडकांची लांबी खचितच काही पटीने तरी वाढली असेल.

## जलवाहतूक

दळणवळणाचे आणखी एक साधन म्हणजे जलवाहतूक हे होय. चीनमध्ये वाहणाऱ्या नद्या बहुतेक रुंद व संथ प्रवाहाच्या असल्याने ह्या नद्यांमधून लहानमोठ्या आगबोटींची सुलभरीतीने ये-जा होऊ शकते. ह्याच्या जोडीला होड्या, गलबते हीही असल्याने व जलवाहतूक ही नेहमी दुसऱ्या कोणत्याही वाहतुकीच्या प्रकाराचे तुलनेने अतिशय स्वस्त असल्याने फार पूर्वीपासून चीनमध्ये जलवाहतुकीला प्राधान्य दिले गेले. उत्तरेकडील होॅंहॅंगहो, मध्य चीनमधील यांगत्सेकिआंग व दक्षिणेकडील सीकिआंग ह्या प्रमुख नद्या व त्यांच्या असंख्य उपनद्या ह्यांचा वाहतुकीकडे फार मोठ्या प्रमाणात उपयोग केला गेला व अजूनही केला जातो. ह्यापैकी बहुसंख्य नद्या पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहात असल्याने चीनमधील पूर्व-पश्चिम वाहतूक ही एक नैसर्गिक देणगीच झाली. ह्याला भर म्हणूनच की काय पूर्वीच्या काळापासून त्या त्या वेळचे राज्यकर्ते नद्यांस जोडणारे जोडकालवे काढून दक्षिणोत्तर जलवाहतुकीची सोय करण्याचा प्रयत्न करीत. ह्यांपैकी सर्वांत मोठा प्रयत्न म्हणजे चीनची पीकिंग ह्या उत्तरेकडील राजधानीपासून तो थेट दक्षिणेकडील कॅंतान शहरापर्यंत एक थेट जलमार्ग तयार करण्याचा प्रयत्न हा होय. ह्या उत्तर-दक्षिण जलवाहतुकीच्या प्रकल्पाला खर्च अवाढव्य येणार असल्याने आजपर्यंत हा प्रकल्प पूर्ण केला गेला नाही. प्रथम पीकिंग ते यांगत्से नदीवरील हॅंकौपर्यंत एक मोठा कालवा खोदण्यात आला व त्याला ‘ ग्रेट इंपीरियल कॅनॉल ’ असे नाव देण्यात आले. अगदी अलीकडे साम्यवादी सरकारने ह्या पीकिंग ते कॅंतानपर्यंतच्या कालव्याच्या प्रकल्पाचा उरलेला भाग म्हणजे हॅंकौ ते कॅंतानपर्यंतचा कालवा खोदण्याचे काम हाती घेऊन, यथावकाश हा प्रकल्पही पुरा करण्यात येईल. ह्यामुळे चीनमधील दक्षिणोत्तर जलमार्गांमध्ये एक प्रकारची क्रांतीच होईल.

## लोहमार्ग

जमिनीवरील वाहतुकीत सर्वांत जलद वाहतूक म्हणजे लोहमार्गांचीच होय. चीनमध्ये लोहमार्ग बांधण्यास सुरवात सुमारे शंभर वर्षांपूर्वी झाली. परंतु मध्यंतरीचे बंड, जपानी स्वारी व इतर अशांततेमुळे चीनमधील लोहमार्गांची

म्हणावी तशी वाढ झाली नाही. अलीकडे चीनमध्ये साम्यवादी सरकार आल्यापासून मात्र चीनमधील लोहमार्गामध्ये झपाट्याने वाढ होत आहे.

आजतागायत चीनमध्ये सुमारे २०,००० मैल लांबीचेच फक्त लोहमार्ग चालू आहेत. चीनचा विस्तार पाहता २०,००० मैल लांबीचे लोहमार्ग म्हणजे अगदीच थोडे म्हणावे लागेल. परंतु लवकरच ह्या लोहमार्गांमध्ये निश्चितच बहुमोल भर पडेल, अशी लक्षणे दिसू लागली आहेत.

चीनमधील आजपर्यंतचे लोहमार्ग उत्तरेकडील, ईशान्येकडील व यांगत्से-किआंग नदीचे खोऱ्यांतील भागातच प्राधान्येकरून दिसून येत. ह्यांपैकी काही मार्गांची माहिती आता आपण पाहू.

( १ ) पीकिंग-कलगन-सुईयुआन पाओटाऊ मार्ग — चीनच्या पीकिंग ह्या राजधानीपासून निघून उत्तरेकडे मोंगोलियन डोंगरातून मोंगोलियन पठारावर व चीनच्या वायव्य कोपऱ्यात जाणारा हा मार्ग, चीनच्या उत्तरेकडील व वायव्य भागातील लोएस मैदानातील मार्ग असून, ह्या मार्गाच्या आजूबाजूला असलेला सुपीक प्रदेश व ह्या भागात आढळून येणारी विपुल खनिजे, ह्यांच्या ने-आणीकरता हा मार्ग फार महत्त्वाचा समजला जातो. हा मार्ग सर्वांत जुना असून, हा बांधण्याकरिता चीनने कोणत्याही परकीय सरकारची कसलीही मदत घेतली नाही, हा या मार्गाचा एक विशेष होय.

( २ ) उत्तर चीनचे मैदानातून दक्षिणोत्तर जाणारा **पीकिंग–हँको** लोहमार्ग — हा लोहमार्ग उत्तरेकडील मैदानाच्या पश्चिम भागातून जातो. पीकिंग ते हँकौ हे अंतर जवळजवळ ८०० मैल आहे अत्यंत सुपीक अशा प्रदेशातून हा लोहमार्ग जात असल्याने दळणवळणाच्या दृष्टीने ह्या लोहमार्गाला फारच महत्त्व आहे.

( ३ ) पीकिंग–हँको लोहमार्गाचाच पुढचा दक्षिणेकडील भाग म्हणजे यांगत्से नदी ओलांडून जाणारा **हँकौ ते कँतान**पर्यंतचा ७०० मैलांचा लोहमार्ग होय. ह्याला टीएंटसीन पुकोव लोहमार्ग असेही म्हणतात. हा मार्ग यांगत्सेकिआंग नदीच्या मुखाजवळील सुपीक मैदानातून उत्तर-दक्षिण जातो

व त्यामुळे ह्या शेतीप्रधान, पण हळूहळू उद्योगधंदे वाढत असलेल्या प्रदेशातील दळणवळणाला मदत होते.

(४) पीकिंग–टीएंटसीन–मुकडेन लोहमार्ग — पूर्व मोंगोलियाच्या पठारी प्रदेशातून चिनी राजधानी व मांचूरियातील निरनिराळ्या लोहमार्गांचे केंद्र जे मुकडेन शहर, त्यांस जोडणारा हा लोहमार्ग आहे. मांचूरिया जपानी अमलाखाली आल्यापासून, मांचूरियातील लोहमार्गांची खूपच वाढ झाली आहे. मांचूरियामधील एकंदर लोहमार्ग जवळजवळ ८,००० मैल लांबीचे आहेत. पूर्वी दक्षिण मांचूरिया लोहमार्ग व पूर्व चिनी लोहमार्ग हे रशियन सरकारच्या ताब्यातील लोहमार्ग दुसऱ्या महायुद्धानंतर चिनी सरकारकडे सुपूर्द करण्यात आले. याखेरीज चिनी चांगचून लोहमार्गही, जो पूर्वी चिनी व रशियन सरकारांच्या सामुदायिक देखरेखीखाली होता, तोही चीन व रशिया यांचेमधील तहाप्रमाणे पूर्णपणे चिनी सरकारचे ताब्यात देण्यात आला. ह्याप्रमाणे हे तीन निरनिराळे लोहमार्ग एकत्र करून त्यांस मांचूरियातील लोहमार्ग असे नाव देण्यात आले व तो चिनी लोहमार्गांचे विभागापैकी एक नवीन विभाग पाडण्यात आला.

(५) चीनमधून पूर्व-पश्चिम जाणारा व दक्षिणोत्तर जाणाऱ्या लोहमार्गास छेदणारा एक महत्त्वाचा लोहमार्ग, चीनच्या पूर्व किनाऱ्यावरील (व्हँग हाय किंवा पीत समुद्र) ली एन यांग बंदरापासून निघून थेट पश्चिमेकडील कान्सू प्रांतातील लॅनचौफू ह्या शहरापर्यंत जातो. ह्या लोहमार्गाला 'लुंघाई लोहमार्ग' असेही नाव आहे. हा लोहमार्ग एकंदर सुमारे ८०० मैल लांब असून, ह्याचे मार्गावर सूचौ व कामेंग येथे दक्षिणोत्तर जाणारा चीनमधील लोहमार्ग मिळतो. कामेंगनंतर पश्चिमेकडे हा मार्ग लोयांग, सीआन आणि पकोई ह्या शहरांमधून जातो. लुंघाई लोहमार्ग प्रथम पूर्व किनाऱ्यावरील ली एन यांगपासून कानसू प्रांताच्या दक्षिणेकडील पकोई शहरापर्यंतच होता, पण अलीकडील पकोईपासून पश्चिमेकडे लॅनचाऊ फू व नैर्ऋत्येकडील त्सेश्वान प्रांतातील चेंगटूपर्यंत ह्या लोहमार्गाची वाढ करण्यात आली आहे.

(६) कोळशाच्या खाणींच्या प्रदेशात अनेक लहान-लहान लोहमार्ग आहेत, पण त्यांचा हेतू फक्त खाणीतील कोळसा मुख्य केंद्रापर्यंत किंवा

लोहमार्गाच्या एखाद्या स्थानकापर्यंत आणण्याचा असल्याने, लहान लहान लोहमार्गांची जास्त माहिती दिली नाही तरी चालण्यासारखे आहे.

( ७ ) आणखी एक लोहमार्ग म्हणजे शांटुंग लोहमार्ग विभाग हा होय. ह्या लोहमार्गाने पूर्व किनाऱ्यावरील त्सिंगटौ बंदर व टिएंटसीन ते पुकाव लोहमार्गावरील चिबान हे शहर जोडण्यात आले आहे.

( ८ ) शानसी लोहमार्ग शानसी प्रांताची राजधानी ताययुआन व पीकिंग त हँकौ लोहमार्ग यास जोडणारा लोहमार्ग आहे. उत्तर चीन मैदानातील प्रदेशातील हा एक महत्त्वाचा पूर्व-पश्चिम लोहमार्ग होय.

( ९ ) शांघाय लोहमार्ग हा एक स्वतंत्रच विभाग आहे. शांघाय व त्याच्या परिसरातील हँगचौ व नॅनकिंग हा एक महत्त्वाचा औद्योगिक विभाग असल्याने, ह्या भागातील लोहमार्गांचे केंद्रीकरण शांघाय येथे करण्यात आले आहे. ह्याचाच हा एक भाग म्हणजे शांघाय ते नॅनकिंग लोहमार्ग. दुसरा एक भाग म्हणजे शांघाय व वु सुंग ह्यांस जोडणारा लोहमार्ग. चीनमधील लोहमार्गांपैकी हा सर्वांत जुना लोहमार्ग असून, हा सुमारे १०० वर्षांपूर्वी बांधण्यात आला. तिसरा भाग म्हणजे शांघाय, मिंगपो व हँगचौ ह्यास जोडणारा मार्ग.

शांघाय विभागातील वर दिलेले तिन्ही लोहमार्ग अतिशय दाट लोकवस्तीच्या व उद्योगधंद्यांनी व कारखान्यांनी गजबजलेल्या भागांतून जात असल्यामुळे, ह्या लोहमार्गांवरील दळणवळण अतिशय धामधुमीचे झाले आहे.

( १० ) पूर्वेकडील हँगचौ शहरापासून थेट पश्चिमेकडील कुनमिंग शहरापर्यंत एक नवीन लोहमार्ग तयार करण्यात आला आहे. कुनमिंगहून ब्रह्मदेशाची सरहद्द व तिबेटमधील ल्हासा शहरापर्यंत पक्की सडक बांधून तयार झाल्यामुळे कुनमिंगपासून थेट पूर्व किनाऱ्यावरील बंदरांशी दळणवळण जोडणे अत्यंत आवश्यक ठरल्याने हा लोहमार्ग तयार करण्यात आला आहे. हा लोहमार्ग हँगचौ, नॅनचँग, चँगशा, क्वाययांग ह्या शहरांवरून अखेर कुनमिंगला मिळतो.

( ११ ) यांगत्सेकिआंग नदीवरील किउकिआंग व नॅनचँग ह्यांना जोडणारा लोहमार्ग.

( १२ ) हँकौ ते कंतान लोहमार्गावरील हुनान प्रांतातील हेंगयांगपासून क्वांगसी प्रांतातील क्वायलीनपर्यंत जाणारा लोहमार्ग.

वरील बहुतेक सर्व लोहमार्ग अगदी अलीकडील काळातील तयार करण्यात आलेले लोहमार्ग आहेत.

( १३ ) कुनामिंगपासून इंडोचीनमधील हायफाँगपर्यंत फ्रेंच लोकांनी बांधलेला लोहमार्ग हाही एक महत्त्वाचा लोहमार्ग आहे.

चीनमधील लोहमार्गांची वाढ फारच झपाट्याने होत आहे. उदाहरणार्थ, चुंगकिंग ते चेंगटूपर्यंतचा जवळजवळ ६०० मैल लांबीचा लोहमार्ग अगदी अलीकडेच पूर्ण करण्यात येऊन वाहतुकीस खुला करण्यात आला. चीनच्या जलवाहतुकीपैकी राहता राहिला दळणवळणाचा एक प्रकार म्हणजे सागरी वाहतूक होय. चीनच्या समुद्रकिनाऱ्याची एकंदर लांबी सुमारे ३,००० मैल असून, ह्या किनाऱ्यावर असंख्य बंदरे आहेत. ह्या बंदरातून लहान लहान गलबते, शिडांची जहाजे व क्वचित आगबोटींची ये-जा एकसारखी चालू असते. यांपैकी बऱ्याचशा बंदरांचे संबंध चीनमधील लोहमार्ग, रस्ते व जलमार्ग यांच्याशी जोडण्यात आल्यामुळे चीनची किनाऱ्याची सागरी वाहतूक पुष्कळच महत्त्वाची झाली आहे. चीनने अगदी अलीकडे परदेशी वाहतुकीतही आपला वाटा उचलण्यास सुरवात केली आहे.





# परदेशी व्यापार व आर्थिक माहिती

मागील एका प्रकरणात १९ व्या शतकात परकीयांनी चीनमध्ये व्यापारा-निमित्त काय काय गोष्टी केल्या, त्याची माहिती आपण पाहिलीच आहे. त्या-वेळी चीनशी परकीयांचा व्यापार हा मुख्यतः अफूचाच होता. ह्या अफूला चीनमध्ये वाढती मागणी होती व चीनमध्ये तयार होणारी अफू ह्या मागणीचे मानाने फारच अल्प असल्यामुळे बाहेरच्या देशांत तयार होणाऱ्या अफूला चीनमध्ये चांगली किंमत येऊ लागली. भारतात इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनी जसजशी आपले राज्य वाढवू लागली, तसतशी त्या कंपनीच्या व्यापारी सवलती—ज्याबद्दल त्या कंपनीला मक्ता मिळाला होता— हलके हलके काढून घेण्यात येऊन इ. स. १८२०चे सुमारास इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीही भारतापुरती तरी व्यापारी कंपनीच राहिली नाही. साहजिकच भारताशी कोणीही व्यापार करावा व तसा तो करण्यास ब्रिटिश पार्लमेंटची पूर्ण संमती होती. ह्याचा परिणाम भारतात तयार होणारी अफू चीनमध्ये नेऊन विकण्याचा किफायतशीर धंदा अनेक इंग्रज व्यापारी करू लागले.

अफूनंतर इतरही कित्येक वस्तूंची चीनमध्ये आयात होऊ लागली व त्यामुळे परकीयांचा चीनशी व्यापार वाढू लागला. १९ व्या शतकातलि

चीनच्या व्यापारासंबंधी विशेष माहिती फारशी उपलब्ध नाही. परंतु इ. स. १९३० पर्यंत तरी, म्हणजे सुमारे १०० वर्षे, चीनमधील अंतस्थ यादवी, बंडे व परकीयांनी जबरदस्तीने, चिनी राज्यकर्त्यांकडून हिसकावून घेतलेले व्यापारी संबंध, ह्यामुळे चीनचा परदेशी व्यापार हे एक मोठेच कोडे होऊन बसले होते.

इ. स. १९२१ पासून व विशेषतः परदेशी लोकांना ( व्यापाऱ्यांना ) चीनमध्ये ज्या विशेष सवलती होत्या, त्या रद्द होऊ लागल्यापासून चीनमध्ये एक प्रकारची स्थिरता येऊ लागली. म्हणूनच अलीकडील चीनच्या परदेशी व्यापाराबद्दल निश्चितपणे काहीसे लिहिणे शक्य झाले आहे. खाली दिलेल्या कोष्टकांवरून चीनच्या परदेशी व्यापराची थोडीशी का होईना, पण निश्चित अशी रूपरेखा आपणास समजून येईल. पहिल्या कोष्टकात चीन व इतर देशांच्या आयाती-निर्यातीसंबंधी, प्रत्येक राष्ट्राचा एकंदर व्यापारात किती भाग होता, ते तुलनात्मकदृष्ट्या १९३३ व १९४७ ह्या दोन सालांकरिता, हे दाखविले आहे.

| देशाचे नाव | १९३३ मधील एकंदर आयातीच्या टक्के | १९३३ मधील चीनमधून एकंदर निर्यातीच्या टक्के |
|---|---|---|
| अमेरिका | २२·०१ | १८·४८ |
| इंग्लंड | ११·४१ | ७·९६ |
| जपान | ९·७२ | १५·६६ |
| जर्मनी | ८·०० | ३·४० |
| हॉंगकॉंग | ३·२८ | १९·७५ |
| इतर | ४५·५८ | ३४·७७ |

१९४७ मधील चीनमधून निर्यात व आयातीच्या टक्के

| देश | निर्यात टक्के | आयात टक्के |
|---|---|---|
| अमेरिका | ५०·१५ | २३·३० |
| भारत | ९·०३ | ३·१७ |
| इंग्लंड | ६·८६ | ६·५६ |
| कॅनडा | ३·८० | ०·३६ |
| हॉंगकॉंग | १·८४ | ३४·१८ |
| इतर | २८·३२ | ३२·४३ |

अनुक्रम ७००५३ दि. २८।५।५७



वरील कोष्टकात दिलेल्या आकड्यांवरून काही ठळक गोष्टी नजरेत भरल्या त्या अशा :—

( १ ) इ. स. १९३३ मध्ये चीनचा जपान व जर्मनीबरोबर असलेला एकंदर व्यापार इ. स. १९४७ मध्ये अजीबात नष्ट झाला. कदाचित ते देश चिनी माल प्रत्यक्ष चीनकडून न घेता अप्रत्यक्षपणे इतर देशांकडून घेत असावेत.

( २ ) चीन व अमेरिका यांचेमधील व्यापाराचे प्रमाण पुष्कळच बदलले. ह्या दोन राष्ट्रांतील देवघेव वाढली व ही वाढ विशेषतः चीनमधून अमेरिकेत निर्यात करण्यात येणाऱ्या मालांचे बाबतीत तर प्रामुख्याने दिसून येऊ लागली.

( ३ ) इ स. १९४७ पासून चीनचा जर्मनी व जपानबरोबरचा व्यापार जरी नाहीसा झाला, तरी त्या दोन देशांऐवजी चीनचे भारत व कानडा या दोन देशांशी व्यापारी संबंध पुष्कळच वाढले.

( ४ ) चीन व इंग्लंड यांचेमधील व्यापारी देवघेव इ. स. १९३३ नंतर पुष्कळच कमी होत गेली.

( ५ ) चीन व हाँगकाँग येथील इंग्रज वसाहतींबरोबर जो व्यापार चालू आहे, त्यामध्ये १९३३ पेक्षा १९४७ मध्ये हाँगकाँगमधून चीनला येणाऱ्या मालांत जवळजवळ ३०० टक्के वाढ झाली.

याखेरीज चीन व रशिया यांचेमधील व्यापारी संबंधाचाही उल्लेख करणे अगत्याचे आहे. ह्या दोन देशांचा एकमेकांशी व्यापार इ. स. १९३६ चे सुमारास फक्त ०.४ टक्के होता, तो इ. स. १९४७ मध्ये वाढून ८ टक्क्यांवर गेला. यानंतर चीन व रशिया यांमधील व्यापार वाढू लागला व त्याचे कारण म्हणजे त्या दोन देशामधील झालेले करारमदार व मैत्रीचे संबंध हे होय. विशेषतः १९५० मध्ये रशिया व पूर्व युरोपातील पोलंड, झेकोस्लोव्हाकिया, हंगेरी व पूर्व जर्मनी ह्या देशांबरोबर चीनने व्यापारीकरार केल्यावर तर चीन व हे देश यांमधील ही देवघेव भराभर वाढू लागली. इ. स. १९५० पासून चीनमधील साम्यवादी चिनी सरकारने चीनच्या औद्योगिक वाढीकडे विशेष लक्ष दिले व त्यामुळे रशिया व पूर्व युरोपियन देशांकडून चीनमध्ये आयात

होणाऱ्या मालांत, चिनी कारखान्यांकरिता लागणारा कच्चा माल, यंत्रसामुग्री, यंत्रांचे सुटे भाग, लोहमार्ग व जहाजे, आगबोटी यांचेकरिता लागणारे निरनिराळ्या प्रकारचे सामान यांचा भरणा अधिक असून, ह्याचे मोबदल्यात चीनमधून या देशांस निर्यात होणारा माल म्हणजे कच्चे रेशीम, सोयाबिन, चहा, लोकर व इतर शेतीपासून पैदा होणारे जिन्नस, हा असे.

खाली दिलेल्या कोष्टकामध्ये इ. स. १९३३ व १९४७ ह्या दोन सालांत चीनमध्ये आयात होणाऱ्या मालाची तुलनात्मक कल्पना देण्याचा प्रयत्न केला आहे.

| मालाचे नाव | १९३३ मधील एकंदर आयातीच्या टक्के | १९४७ मधील एकंदर आयातीच्या टक्के |
|---|---|---|
| तांदूळ | ११·२ | १·७ |
| खनिज तेले | ८·६ | ९·३ |
| कापूस | ७·३ | १८·६ |
| धातू | ७·२ | ७·४ |
| गहू व गव्हाचे पीठ | ८·८ | २·९ |
| सुती व इतर कापड | ७·५ | ३·९ |
| रसायने | ३·८ | ६·१ |
| कागद | ३·५ | ६·१ |
| साखर | ३·१ | ०·३ |
| रंग | ३·० | ४·० |
| यंत्रे | २·९ | ८·३ |
| लाकूड | २·८ | ३·३ |
| तंबाखू, सिगारेटस् | २·२ | २·८ |
| इतर | २८·३ | २६·३ |

वर दिलेल्या कोष्टकावरून खालील गोष्टी स्पष्ट होतात.

( १ ) तांदळाची आयात, जी १९३७ मध्ये एकंदर आयातीच्या ११·२ टक्के होती, ती १९४७ मध्ये फक्त १·७ टक्के इतकीच राहिली. याचा अर्थ चिनी सरकारने अन्नधान्याचे बाबतीत तरी व विशेषतः तांदळाकरिता चीनला बाहेरच्या देशांवर अवलंबून ठेविले नाही. चीन तांदळाचे बाबतीत

तरी जवळजवळ स्वयंपूर्ण झाला. भारत सरकारने ह्यावरून खचितच बोध घेण्यासारखा आहे. देशात औद्योगिकवाढीवर भर देऊन अन्नधान्यांच्या उत्पादनाकडे दुर्लक्ष असले तरी उपेक्षा खचितच करणे राष्ट्रीय अर्थ-कारणाच्या दृष्टीने किती घातुक आहे, हे आपल्या सरकारला समजत नाही, असे म्हणणे जरी धाष्टर्याचे असले, तरी वस्तुस्थिती मात्र तशी आहे खरी.

( २ ) कच्च्या कापसाची आयात १९३३ पेक्षा १९४७ मध्ये जवळजवळ २५० टक्कयांनी वाढली व याचे उघड कारण म्हणजे चीनने कापड-उद्योग वाढविण्याकडे दिलेला भर हे सांगता येईल.

( ३ ) गहू व गव्हाचे पिठाचे बाबतीतही १९३३ च्या मानाने १९४७ मध्ये त्या वस्तूंची आयात फक्त २५ टक्केच करून तांदळाप्रमाणेच गहू व गव्हाचे पिठाचे बाबतीत चीनला बहुतेक स्वयंपूर्ण केले.

( ४ ) १९३३ च्या मानाने १९४७ मध्ये साखरेची आयातही अतिशय कमी करून, चीनमध्येच साखरेच्या उत्पादनावर विशेष भर दिला. आपल्या भारतात मात्र परिस्थिती फारच चमत्कारिक दिसते. दरवर्षी साखरेला मागणी वाढत आहे, साखरेचे उत्पादनही वाढत आहे, पण मागणीच्या प्रमाणात जादा साखरउत्पादनाला सरकार परवानगी तर देत नाहीच, पण आत-बट्टयाने, परकीय चलन मिळविण्याकरिता काही साखर परदेशी विकण्यात येते. यामागील अर्थशास्त्र मात्र सामान्य जनांच्या विचारशक्तीच्या पलीकडचे आहे यात शंका नाही !

( ५ ) यंत्रे व यंत्रसामग्रीची आयात १९३३ च्या तुलनेने, १९४७ मध्ये जवळजवळ ४० टक्के वाढली व तेही साहजिकच आहे. जसजशी देशाची औद्योगिक भरभराट होऊ लागते, तसतशी त्या देशाची यंत्रे व यंत्रसामग्री यांची भूक वाढलेली असते. निरनिराळ्या प्रकारच्या कारखान्यांच्या वाढी-बरोबर यंत्रे व यंत्रांचे निरनिराळे सुटे भाग तयार करण्याचे कारखानेही सुरू होतात, परंतु मागणीप्रमाणे सुरवातीस पुरवठा होत नाही.

खाली दिलेल्या कोष्टकात चीनमधून निर्यात होणाऱ्या वस्तूंची, इ. स. १९३३ व १९४७ ह्या दोन वर्षांतील तुलनात्मक टक्केवारी दिली आहे.

| वस्तूचे नाव | एकंदर निर्यातीच्या टक्के १९३३ | १९४७ |
|---|---|---|
| कच्चे रेशीम | ९·४ | ४·७ |
| कापसाचे सूत | ६·५ | ६·६ |
| अंडी व त्याचे पदार्थ | ६·० | २·४ |
| चहा | ५·६ | ३·६ |
| धातू व त्याचे पदार्थ | ५·३ | ५·३ |
| कातडी, चामडी | ५·२ | १·९ |
| लाकडापासून तेल | ५·० | १५·२ |
| कच्चा कापूस | ५·० | १·० |
| वाटाणे, वगैरे दाणे | ४·७ | ४·५ |
| रेशमी कापड | ३·४ | २·१ |
| तेलबिया व त्यांचे पदार्थ | ३·१ | १·७ |
| कोळसा | ०·८ | ०·३ |
| धान्ये | ०·१ | ०·१ |
| इतर | ३९·९ | ५१·६ |

वरील कोष्टकावरून खालील विशेष उल्लेखनीय गोष्टी स्पष्ट दिसतात.

( १ ) सर्वसाधारणपणे ज्या कच्च्या वस्तूंपासून पक्का माल, देशातल्या देशातच होऊ शकेल, अशा वस्तूंची निर्यात बुद्धिपुरस्सर घटविण्यात आली. उदाहरणार्थ, कच्चे रेशीम १९३३ मध्ये एकंदर निर्यातीच्या ९·४ टक्के होते, ते १९४७ मध्ये फक्त ४·७ इतकेच राहिले. तीच गोष्ट कातडी व चामडी याबद्दलही म्हणता येईल. कच्चा कापूसही एकदम १९३३ मधील ५ टक्क्यांवरून, १९४७ मध्ये एकदम १ टक्क्यावर आणला गेला. तेलबिया व त्यांपासून होणाऱ्या पदार्थांची निर्यातही तशीच घटली.

( २ ) पक्क्या मालाची निर्यात वाढली. उदाहरणार्थ, लाकडापासून तेल, याची निर्यात १९३३ च्या ५ टक्क्यांवरून १९४७ मध्ये एकदम १५·२ टक्क्यांपर्यंत वाढली. इतर किरकोळ वस्तूंची निर्यातही १९३३ मधील ३९·९ टक्क्यांवरून १९४७ मध्ये ५१·६ टक्क्यापर्यंत वाढली.

इ. स. १९५० पासून, चीनमधील साम्यवादी सरकारने चीनच्या औद्योगीकरणाकरिता एक दशवर्षीय योजना आखली. या योजनेनुसार चीनचा एकंदर परदेशी व्यापार व्यवस्थित व योजनेनुसार चालण्याकरिता एक ‘ राष्ट्रीय आयात-निर्यात मंडळ ’ स्थापन केले. या मंडळाच्या चहा, रेशीम, खनिज पदार्थ, वगैरे निरनिराळ्या वस्तूंकरिता खास उपसमित्या नेमण्यात आल्या.

इ. स. १९५७ पर्यंत चीनच्या परदेशी व्यापाराचा ५० टक्के भाग एकट्या रशियाचा होता व रशिया व पूर्व युरोपियन देश मिळून चीनच्या परदेशी व्यापाराचा शेकडा ७५ टक्के भाग होता. इ. स. १९५७ मध्ये रशियामधून चीनमध्ये आयात झालेल्या एकंदर मालाची किंमत २१७.६ कोटी रुबल्स किंवा जवळजवळ ३२० कोटी रुपयांची असून, चीनमधून रशियाला निर्यात केलेल्या मालांची एकंदर किंमत २९५.३ कोटी रुबल्स किंवा सुमारे ४५० कोटी रुपयांची होती. इंग्लंड व चीन यांचेमधील व्यापाराविषयी माहिती घेता, इ. स. १९५७ मध्ये इंग्लंडमध्ये चीनहून येणाऱ्या मालाची किंमत १.४२ कोटी पौंड किंवा १५० कोटी रुपये असून, १९६१ मध्ये हाच आकडा ३.१ कोटी पौंड किंवा जवळजवळ ४०० कोटी रुपयांच्या घरात गेला, तर इंग्लंड-मधून चीनमध्ये आयात होणाऱ्या एकंदर मालाची किंमत इ. स. १९५७ मध्ये १.२१ कोटी पौंड ( म्हणजेच सुमारे १५० कोटी रुपये ) असून, १९६१ मध्ये हा आकडा १.३ कोटी पौंड अथवा जवळजवळ १७० कोटी रुपयां-पर्यंत गेला.

चीनमध्ये १९४९ पासून, साम्यवादी सरकार स्थापन झाल्यापासून जे चलनी नाणे प्रचारात आहे, त्याला ‘ तेन विन पियाओ ’ किंवा ‘ पीपल्स बँक डॉलर ’ असे म्हणतात. हे नाणे चीनमधील सरकारच्या मध्यवर्ती अशा पीपल्स बँकेकडून प्रचारात आणले गेले आहे. पूर्वी चीनमधील मुख्य नाण्याला ‘ यू आन ’ असे म्हणत व हल्लीही व्यवहारात ‘ जेन मिन पियाओ ’ ला ‘ यू आन ’ असेही म्हणतात. ह्या यू आनचे १० सारखे भाग करून ह्या प्रत्येकास ‘ चिआओ ’ असे म्हणतात. प्रत्येक चिआओचे १० सारखे भाग केले असून, या एक दशांश चिआओस ‘ फेन ’ असे नाव आहे. याचाच अर्थ

चीनमध्येही व्यवहारात दशमान पद्धतीची चलने आहेत व मुख्य नाणे जे य आन, त्याचे १०० सारखे भाग म्हणजे फेन काल्पले आहेत.

इ. स. १९५५ पासून चीनमधील पीपल्स बँकेने कागदी नोटांचाही प्रचार सुरू केला. १ मार्च, १९५५ पासून चलनी नाण्यांसंबंधी एक कायदा करण्यात येऊन चीनच्या यू आनची परदेशी नाण्यात किंमत नक्की करण्यात आली. या कायद्यानुसार १ पौंडाबरोबर ६·८९३ यू आन ठरविण्यात आले व एक अमेरिकन डॉलरबरोबर २·४ यू आन कायम करण्यात आले. इ. स. १९५४ अखेर चिनी सरकारने एक कायदा पास करून सर्व परदेशी व्यवहारांवर सरकारी नियंत्रण आणून हे व्यवहार चीनमधील पीपल्स बँकेमार्फतच केले पाहिजेत, अशी सक्तीही केली. खासगी किंवा सरकारी उद्योगधंद्यास कर्ज वा इतर कोणत्याही प्रकारची रोख किंवा इतर मदत ही या पीपल्स बँकेच्या संमतीनेच केली पाहिजे, अशीही सक्ती करण्यात आली. यापूर्वी अमेरिकन सरकारचे व अमेरिकन नागरिकांचे नावे असलेली सर्व मिळकत चिनी सरकारने आपल्या ताब्यात घेतलीच होती. जपान, जर्मनी, फ्रान्स वगैरे परकीयांकडे असलेली चिनी स्थावर वा इतर मिळकतसुद्धा चिनी सरकारने आपल्या ताब्यात यापूर्वीच घेतली होती.

चलनी नोटा व नाणे यांसंबंधी चिनी सरकारने ज्या सुधारणा केल्या, त्याचप्रमाणे वजने व मापे यासंबंधीही चिनी सरकारने काही नवीन सुधारणा केल्या. या सुधारणान्वये लांबी मोजण्याचे एक नवीन माप नक्की करण्यात येऊन, त्याला ‘ चीह ’ असे नाव देण्यात आले. ह्या चीहची लांबी १४ १/१० इंच इतकी आहे. ह्याचबरोबर ‘ टाएल ’ ह्या नावाचे १ १/३ औंस वजनाचे, ‘ कॅटी ’ ह्या नावाचे १ १/३ पौंड वजनाचे व ‘ पिकूल ’ हे १३३ १/३ पौंड वजनाचे माप, अशी तीन वजनेही नक्की करण्यात आली.

जमिनीचे क्षेत्र मोजण्याकरिता एक नवीन माप सुरू करण्यात येऊन, त्याचे ‘ मौ ’ असे नामाभिधान करण्यात आले. एक मौ म्हणजे आपल्याकडील १/६ एकर होय.

आता शेवटी हे प्रकरण पुरे करण्यापूर्वी चीनच्या अर्थकारणाचा थोडासा विचार करू.

इ. स. १९५० च्या चीन व रशिया यांचेमध्ये झालेल्या तहान्वये रशियन सरकारने चिनी सरकारला १ टक्का व्याजाने ३० कोटी अमेरिकन डॉलर्सचे कर्ज दिले. हे दहा वर्षांत सारख्या हप्त्यांनी फेडावयाचे होते. त्यानंतर इ. स. १९५४ मध्ये झालेल्या दुसऱ्या एका करारान्वये एकंदर १०० कोटी रुबलसइतके आर्थिक सहाय्य चीनमधील औद्योगिक विकासास मदतरूप म्हणून दिले. हे कर्ज दीर्घ मुदतीचे आहे.

इ. स. १९५६-५७ व ह्या दोन वर्षी दरवर्षी ६० कोटी यू आनएवढे कर्ज चिनी सरकारने देशातच उभारले. इ. स. १९५८ पासून अशा कर्जउभारणी-करता एक नवीन यंत्रणाच उभारण्यात येऊन तिला " नॅशनल इकॉनॉमिक रीकन्स्ट्रक्शन बॉंड " असे नाव देऊन, त्या वर्षी एकंदर ६३ कोटी युआनचे रोखे काढण्यात आले व ते विकलेही गेले. ह्यापूर्वी साम्यवादी चिनी सरकारने एक अभिनव कर्जाची योजना आखून त्याप्रमाणे ३० सप्टेंबर, १९४९ रोजी २० कोटी " व्हिक्टरी बॉंडस् " च्या युनिटसची विक्री केली. ह्या व्हिक्टरी बॉंडसची मूळ किंमत रोख पैशात नसून, ती वस्तूत होती. केटी ह्या नावाचे ५३ तोळे किंवा १⅓ पौंड वजनाचे एक चिनी माप आहे. एका व्हिक्टरी बॉंडची किंमत ६ केटी तांदूळ किंवा १½ केटी गव्हाची कणीक किंवा १६ केटी कोळसा किंवा ४ फूट लांबीचे उत्तम जातीचे कापड, अशी करून ह्या निरनिराळ्या जिनसाची चलनात किंमत करताना शांघाय, टीएंटसीन, हॅंको, सीआन, कंतान व चुंगकिंग ह्या ठिकाणी एका विवक्षित-वेळी प्रचलित असलेल्या घाऊक किंमतीच्या निर्देशांकानुसार ठरविण्यात आली. ही अभिनव कर्जयोजना सर्वसाधारण चिनी जनतेला बरीच आवडली असावी, कारण ह्या योजनेनुसार वर सांगितल्याप्रमाणे २० कोटी बॉंडचे युनिटस् किंवा सुमारे १०० कोटी रुपयांचे कर्ज जमा झाले.

याशिवाय चीनच्या राष्ट्रीय कर्जाची थोडीफार कल्पना करून घेणेही उपयुक्त ठरेल. इ. स. १९६१ नंतर चीनबद्दलचा पाश्चात्त्य राष्ट्रांचा दृष्टिकोन पुष्कळच निवळू लागला. पहिल्या महायुद्धानंतर तर चीनवर जबरदस्तीने लादलेल्या बऱ्याच अटी सैल करण्याचाही पाश्चात्त्य राष्ट्रांनी प्रयत्न केला, यांपैकी एक मुख्य सवलत म्हणजे एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस बॉक्सर बंडाची भरपाई म्हणून चीनवर जी खंडणी लादण्यात आली होती, त्या

खंडणीपैकी वसूल झालेली रक्कम काही शर्तींवर चीनला परत करण्याचे ठरविण्यात आले व वसूल न झालेली खंडणी चीनला माफ करण्यात आली. इंग्लंडने त्यानुसार सुमारे ३५ लाख पौंड म्हणजे ५० कोटी रुपये चीनला परत केले. अमेरिकन, जर्मन वगैरे इतर सरकारांनीही इंग्लंडचे हे उदाहरण गिरवून आपली खंडणीची रक्कम चीनला परत केली.

परकीयांनी चिनी सरकारला वेळोवेळी जी कर्जे दिली होती, त्याला तारण म्हणून चीनमधील जकातवसुली परकीयांनी आपल्या हाती घेतली होती. अशारीतीने चिनी जकातीपासूनच्या उत्पन्नाच्या तारणावर जी कर्जे घेतली होती, ती अशी :— इंग्लंडचे ६ कोटी पौंड किंवा अदमासे ७५ कोटी रुपयाचे कर्ज; अमेरिकेचे ३ कोटी डॉलर्स किंवा सुमारे १५ कोटी रुपयांचे कर्ज; जपानचे ३३ लक्ष येन म्हणजे जवळजवळ ४० लक्ष रुपयांचे कर्ज व चीनमधील अंतर्गत १३ लक्ष चिनी डॉपर्सचे कर्ज.

दुसऱ्या महायुद्धाचे आमदानीत चीन व जपान यांचेमधील लढाईमुळे त्या वेळच्या राष्ट्रीय चिनी सरकारला ८७ कोटी डॉलर्सचे अमेरिकेचे कर्ज व जवळजवळ ६ कोटी पौंडांचे इंग्लंडचेही कर्ज काढावे लागले. ह्याच सुमारास म्हणजे इ. स. १९४७ चे सुमारास चिनी सरकारचे एकंदर अंतर्गत राष्ट्रीय कर्ज जवळजवळ १२७० कोटी चिनी डॉलर्सइतके होते.

आता सरतेशेवटी चिनी सरकारच्या अंदाजपत्रकाविषयी थोडीशी माहिती देऊन हे प्रकरण पुरे करू. चिनी सरकारच्या अंदाजपत्रकातील इ. स. १९५७, १९५८, १९५९ व १९६० ह्या वर्षांचे जमाखर्चाचे आकडे खालीलप्रमाणे होते.

(हे आकडे १० लाख चिनी नॅशनल यूआनमध्ये आहेत.)


| वर्ष | १९५७ | १९५८ | १९५९ | १९६० |
|---|---|---|---|---|
| जमा | ३१,०१० | ४१,८६० | ५४,१६० | ७०,०२० |
| खर्च | ३०,४२० | ४०,९६० | ५२,७७० | ७०,०२० |

जमेच्या बाजूकडे सरकारी उत्पादनापासूनचे उत्पन्न एकंदर जमेच्या ६४·७ टक्के होते, तर करांपासूनचे उत्पन्न ३५·३ टक्के होते.

खर्चाच्या बाजूंपैकी संरक्षणावरील खर्च एकंदर खर्चाच्या फक्त ८ टक्के

होता व सरकारी कारभारावरील खर्च तर जेमतेम ४·५ टक्के होता. भारत सरकारच्या अंदाजपत्रकाशी तुलना करता आपल्यास पुष्कळच उद्बोधक माहिती मिळू शकेल. स्थलाभावी त्याची जास्त चर्चा मात्र येथे करता येत नाही. त्यातल्यात्यात भारत सरकारने, औद्योगीकरणाच्या नावाखाली आपल्या भारतात जी तुटीच्या अर्थकारणाची कास धरली आहे, त्याचा मागमूसही चिनी अर्थकारणात दिसत नाही. तरीही चीनची औद्योगिक भरभराट व विकास मात्र घोडदौडीने आगेकूच करीत चालला असल्याचे दिसते.






इ. स. १९११ मध्ये जी चीनमध्ये राज्यक्रांती झाली, त्यापूर्वी चीन देशातील कायद्याप्रमाणे चीनमध्ये दोन निरनिराळी सैन्ये होती. (१) मांच्यू राज्यकर्त्यांचे सैन्य व (२) चिनी सैन्य. या दोन निरनिराळ्या प्रकारच्या सैन्यांची कल्पना आपल्याला भारतातील दाखल्यावरून चटकन येईल. भारतातील सैन्यासारखेच मांच्यू राजघराण्याचे सैन्य होते, तर चिनी सैन्य ज्याला नाव असे, ते सैन्य व आपल्याकडील सशस्त्र पोलीसदल यांमध्ये फारसा फरक नव्हता.

इ. स. १९१० पासून चिनी सन्याची जपानी पद्धतीवर पुनर्रचना करण्यात आली. परंतु ही नवीन पद्धत फार काळ टिकली नाही. इ.स.१९११ च्या क्रांतीनंतर, चीनमध्ये निरनिराळे लष्करी अधिकारी आपल्या हाताखाली सैन्य ठेवून, या सैन्याच्या बळावर चीनमधील निरानिराळे भाग बळकावून बसत असत. १९११ च्या क्रांतीनंतर चीनमधील मध्यवर्ती सत्ता पूर्वीप्रमाणेच कमकुवत राहिली. राष्ट्रीय चिनी लोकांस शह देण्याकरिता मध्यवर्ती सरकार अशा चीनमधील निरनिराळ्या भागांतील चिनी सरदारांकडे कानाडोळा करीत असे.

पहिल्या महायुद्धानंतर चीनमधील पाश्चिमात्य राष्ट्रांनी आपले व्यापारी व इतर आर्थिक हितसंबंध मर्यादित करून चीनमधील मध्यवर्ती सरकारला आर्थिक व राजकीय सुधारणा घडवून आणण्यास सर्वतोपरी मदत करण्याचे ठरविले. त्यामुळे इ. स. १९२७ पासून चीनमधील राष्ट्रीय चिनी सरकार व त्या सरकारचे सर्वाधिकारी जनरल चिआंग कै शेक यास चीनमधील सैन्याची पुनर्रचना करण्यास संधी मिळाली. पाश्चत्त्यपद्धतीप्रमाणे सैन्याची रचना करण्यात येऊन साध्या शिपायापासून तो सर्वांत मोठ्या लष्करी अधिकाऱ्यांपर्यंत सर्वांस काही ना काही तरी लष्करी व इतर शिक्षण देऊन, चिनी सैन्यातील पूर्वीचा कच्चेपणा काढून टाकण्याचा प्रयत्न सुरू केला. सैन्यातील अधिकाऱ्यांना लष्करी शिक्षणाकरिता परदेशी पाठवून, ते लष्करी शिक्षण घेऊन परत आल्यावर, त्यांच्या मदतीने चिनी सैन्यामध्ये निरनिराळ्या सुधारणा घडवून आणल्या गेल्या. इ. स. १९३७ मध्ये चीन व जपान यांचेमधील युद्धास सुरवात झाली, त्या वेळी चिनी सैन्याची संख्या जवळजवळ २० लाख होती. आधुनिक युद्धशास्त्राचे दृष्टीने मात्र ह्या सैन्यात उत्तम शिक्षण घेतलेले अधिकारी, सैन्याला लागणारी इतर सामग्री व यांत्रिक सुसज्जता यांचा बराच अभाव होता. थोडीशी तुलनाच करावयाची झाली, तर स्वातंत्र्यपूर्वकालात भारतामध्ये भारत सरकारचे सैन्य व भारतातील मोठमोठ्या संस्थानांचे सैन्य यांमध्ये जितका फरक होता, नेमका तितकाच व तोच फरक जपानी व चिनी सैन्यात होता, असे म्हणावयास हरकत नाही.

क्युओमिंटांग फौजांबरोबर जपानशी मुकाबला करताना साम्यवादी लोकांची जी फौज होती, ती क्युओमिंटांग फौजेच्या संख्येचे मानाने पुष्कळच लहान होती. दुसऱ्या महायुद्धाचे समाप्तीचे सुमारास क्युओमिंटांगची फौज जवळजवळ ३० लाखांपर्यंत असून, साम्यवादी पक्षाजवळील फौज सुमारे १५ लक्षांचे आसपास होती. क्युओमिंटांग फौजेतील बऱ्याच लोकांस अमेरिकन लष्करी अधिकाऱ्यांनी शिक्षण दिले होते, तर साम्यवादी फौजेस रशियनांनी सर्वतोपरी सहाय्य दिले. दुसऱ्या महायुद्धानंतर जपानचा पराभव झाल्यावर चीनमध्ये जे यादवी युद्ध क्युओमिंटांग व साम्यवादी फौजात सुरू झाले, त्याचा शेवट क्युओमिंटांग फौजेचा संपूर्ण पराभव होण्यात झाला. क्युओ-

मिंटांग पक्षाने मूळ चीनमधून टैवानमध्ये पलायन केले तरी, त्यांच्या बहुसंख्य सेनेचा भाग हा चीनमध्येच राहिला.

इ. स. १९५३ साली चीनमधील लष्कराची संख्या २० लाखांचेवर असून त्याचे एकंदर ७० विभाग पाडण्यात आले होते. याशिवाय सुमारे दीड कोटी मिलिशियाचे लोक किंवा आपणहून खुषीने लष्करी नोकरी करणारे आपल्याकडील राखीव सैनिक होते.

इ. स. १९४९ च्या यादवी युद्धात साम्यवादी सरकारजवळ स्वतःची अशी काहीच विमाने नव्हती. थोडीफार रशियन विमाने होती तेवढीच, पण त्या युद्धात साम्यवादी सैन्याने क्युओमिंटांगची सुमारे २०० विमाने काबीज केली. त्यानंतर कोरियातील लढाईचे वेळी रशियन सरकारकडून काही विमाने खरेदी करण्यात येऊन, साम्यवादी सरकारने आपले वैमानिकदल ६०० विमानांचे केले. विमाने चालविण्याकरिता पायलटस् तयार व्हावे, म्हणून एक खास महाविद्यालय सुरू करण्यात आले. पुढील ३–४ वर्षांत साम्यवादी चिनी सरकारने विमानदलात पायलटसची जोराने भरती सुरू केली व एकंदर विमानांची संख्या १२०० वर नेली. ह्या एकंदर लष्करी तयारीमागील हेतू, अमेरिकनांच्या प्रोत्साहनाने टैवानमधील राष्ट्रवाद्यांनी साम्यवादी चीनवर हल्ला चढविण्यास धजू नये, हाच असला पाहिजे, हे उघड आहे.

चीनमधील नाविक दलाची उभारणी ही मात्र अगदी अलीकडील काळातीलच असावी, असे वाटते. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापासून चिनी किनाऱ्यावर परकीयांची जी नाविक आक्रमणे झाली व त्यांनी वायुवेगाने भराभर, एका मागोमाग एक चीनच्या पूर्व किनाऱ्यावरील बंदरांचा ताबा घेतला, त्यावरून असे दिसते, की त्या वेळच्या चिनी सरकारजवळ आरमार ह्या नावाची चीजच नसावी ! इ. स. १८९४ साली झालेल्या पहिल्या चीन व जपान ह्यांचे युद्धात चिनी राज्यकर्त्यांस नाविकदलाची जरूर भासावयास लागली असावी. चिनी–जपानी युद्धानंतर त्यावेळच्या चिनी बादशहाने आपल्या एका भावाच्या पुढारीपणाखाली युरोपातील निरनिराळ्या देशांत दौरा काढून चिनी सरकारला एक सुसज्ज आरमार तयार करण्याकरता साह्य

मागितले. त्याप्रमाणे थोड्याबहुत प्रमाणात का होईना, युरोपातील पहिल्या महायुद्धाचे सुमारास चिनी आरमाराची मुहूर्तमेढ रोवली गेली.

चिनी आरमाराची वाढ मात्र अतिशय मंदगतीने होत होती. इ. स. १९५२ मध्ये चिनी आरमार डायरेन, त्सिंगटौ व कंतान ह्या तीन बंदरांत केंद्रे करून होते. ह्या आरमारात एकंदर ३५० आगबोटी असून, ह्या आरमारातील गणसंख्या ३०,००० चेही वर होती. अनटॉंग व त्सिंगटौ ह्या दोन ठिकाणी आरमारी महाविद्यालये सुरू करण्यात येऊन, सैन्याप्रमाणे आरमारातही राखीव दलांची स्थापना करण्यात आली.

इ. स. १९५५ नंतर साम्यवादी सरकारने चीनमध्ये सक्तीच्या लष्करी व संरक्षक शिक्षणाचा कायदा जारी केल्यामुळे तर चीनची सैन्य, आरमार व विमानदल यांपैकी प्रत्येक भागात पुष्कळच वाढ व सुसज्जता आली. आपल्या भारतात व त्यातल्यात्यात महाराष्ट्रात तरी आपला नेहमीचा अनुभव असा आहे, की आपले तरुण तालीम करून कुस्ती करू लागले, म्हणजे त्यांना एक प्रकारचे स्फुरण चढते व आपली शक्ती व ताकद अजमाविण्या-करिता ते कुस्त्यांच्या फडात उतरतात. इ. स. १९४७–४८ च्या यादवीयुद्धा-नंतर साम्यवादी चिनी सरकारने आपल्या तिन्ही दलांची पुनर्रचना करून त्यांच्यामध्ये पुष्कळच अद्ययावतपणा आणला आहे. आपली लष्करी ताकद अजमाविण्याच्या हेतूनेही असेल कदाचित, त्यांनी तिबेटमधून भारतावर आक्रमण सुरू केले आहे. आतापर्यंत तरी चिनी सैन्याची सरशीच झालेली दिसते; पण भविष्यात काय काय घडणार आहे, ते अद्याप निश्चित सांगणे कठीण आहे.

अगदी अलीकडील चिनी संरक्षणक्षमता खाली दिल्याप्रमाणे आहे– एकंदर चिनी सैन्य ३०–३५ विभागांत विभागण्यात आले असून, प्रत्येक सैन्याच्या विभागांत ३ पायदळ पलटणी, प्रत्येकी १२,००० ते १७,००० शिपायांच्या अशा आहेत. चिनी लष्कराची गणसंख्या २० लाख आहे. चीनमध्ये सक्तीचे लष्करी शिक्षण सुरू झाल्यास आज जवळजवळ दहा वर्षे झाली असून, आतापावेतो सुमारे १२॥ कोटी पुरुष व ७॥ कोटी स्त्रियांनी कोणत्या ना कोणत्या तरी संरक्षकदलाचे शिक्षण घेतलेले आहे.

चीनच्या नाविकदलात सध्या पुढील प्रकारच्या आगबोटी आहेत ४ डिस्ट्रॉयर्स, २५ पाणबुड्या, १९ फ्रीगेटस्, २४ पहारा करणारी जहाजे, ५५ मोटारयंत्र बोटी, २८ पाणसुरुंग पेरणारी जहाजे, १३६ मोटार टारपेडो बोटी, ५० किनाऱ्यावर उतरण्याची व्यवस्था करणारी जहाजे व ३५० इतर आगबोटी, डायरेन, फूचौ, ताकू, शांघाय व फूकिएन ह्या बंदरांत गोद्यांची चांगली व्यवस्था आहे. परंतु लष्कर जितके आधुनिकदृष्ट्या सुसज्ज आहे, त्या प्रमाणात आरमार नसावे, अशी शंका आहे.

चिनी विमानदलात हल्ली किमान ३,००० विमाने आहेत. ह्या सर्व विमानांची विभागणी निरनिराळ्या विभागांत करण्यात आली आहे. बॉंबफेकी विभाग, शत्रूप्रदेशावर टेहेळणी करणारा विभाग, हेलिकॉप्टर विभाग, दळणवळण चालू ठेवणारा विभाग, यांत्रिक दुरुस्तीचा विभाग वगैरे. चिनी विमानदलातील बहुतेक सर्व विमाने रशियन निर्मितीची आहेत. अगदी अलीकडे यांपैकी काही विमानांची निर्मिती सुरू करण्याकरिता शेनयांग येथे एक मोठा कारखाना उभारण्यात आला आहे.



दा. क्र. 15039




# राज्यव्यवस्था

इ. स. १९११ मध्ये जी चीनमध्ये क्रांती झाली; त्या वेळेपासून चीनमधील राज्यकारभारामध्ये पुष्कळच फेरफार घडून आले आहेत. इ. स. १९११ चे पूर्वी राजसत्ता अस्तित्वात असल्यामुळे चीनमधील राज्यकारभार हा बहुतांशी एकमुखीच कारभार होता, असे म्हणावयास हरकत नाही.

इ. स. १९११ च्या क्रांतीनंतरही सुमारे १५-२० वर्षे चीनमधील एकंदर राजकीय परिस्थिती फारच अस्थिर असल्यामुळे जरी क्रांतिपूर्व राज्यकारभार राहिला नव्हता, तरी त्यामुळे म्हणावी तशी सुधारणा झाली नाही. सुप्रसिद्ध चिनी क्रांतिकारक डॉ. सन यत् सेन यांनी घालून दिलेल्या तीन तत्त्वांप्रमाणे चीनमधील राज्यव्यवस्था व कारभार सुधारण्यास इ. स. १९२८ मध्ये सुरवात झाली. डॉ. सन यत् सेन यांची तीन तत्त्वे म्हणजे, (१) राष्ट्रीयत्व, (२) जनताभिमुख सरकार व (३) जनतेच्या आर्थिक व सामाजिक जीवनामध्ये अवश्य ती सुधारणा. या तीन तत्त्वांवर अधिष्ठित अशी एक घटना प्रथम क्युओमिंटांग पक्षाने तयार करून ती लोकप्रतिनिधींचेकडून संमतही करवून घेतली.

डॉ. सन यत् सेन यांनी प्रतिपादिलेली तीन तत्त्वे तीन पायऱ्यांनी आचरणात आणावयाचेही त्यांनी ठरविले होते. पहिली पायरी म्हणजे लष्करशाही ही होय. इ. स. १९२८ पर्यंत चीनमध्ये अशी लष्करशाहीच असल्यामुळे डॉ. सन यत् सेन यांच्या इच्छेप्रमाणे पहिली तर पायरी चीनकडून ओलांडली गेलीच. डॉ. सन यत् सेन यांच्या विचारप्रणालीवर आधारित अशी एक घटना क्युओमिंटांग सरकारने २५ डिसेंबर, १९४६ साली नॅनकिंग येथे भरलेल्या त्यांच्या अधिवेशनात 'चिनी प्रजासत्ताकाची घटना' ह्या नावाने संमत करून घेतली. ह्या घटनेमध्ये पुढील मुख्य तरतुदी होत्या.

( १ ) राष्ट्राचा मुख्य सर्वाधिकारी म्हणजे अध्यक्ष हा होय. हा अध्यक्ष दर सहा वर्षांनी जनतेने निवडावा. चीनचा अध्यक्ष हा चीनच्या सर्व संरक्षकदलांचा सर्वाधिकारी असेल. कोणाही राष्ट्राबरोबर युद्ध जाहीर करणे किंवा तह करणे, ही त्याच्या संपूर्ण अखत्यारातील बाब समजावी. परराष्ट्रीयबाबतीत चीनचा राष्ट्राध्यक्ष हाच चीनचा एकमेव प्रतिनिधि असला पाहिजे.

( २ ) कार्यकारी मंडळ, कायदेमंडळ, न्यायमंडळ, शिक्षणमंडळ व देखरेखमंडळ अशा एकंदर पाच मंडळांची ( यूआन ) स्थापना. यांपैकी कार्यकारी मंडळ सर्वांत महत्त्वाचे आहे. या मंडळाचे सभासद म्हणजे निरनिराळे मंत्री व इतर मोठमोठे अधिकारी असून, त्यांची नेमणूक राष्ट्राध्यक्षांचेकडून केली जाते. कायदेमंडळाच्या सभासदांची निवड दर तीन वर्षांनी एकदा होते. देखरेखमंडळाचे सभासद दर सहा वर्षांनी एकदा निवडले जातात. शिक्षणमंडळाकडे देशातील सर्व प्रकारच्या शिक्षणसंस्था व परीक्षा यांवरील देखरेख व अधिकार सोपविलेले आहेत.


एक ऑक्टोबर, १९४९ मध्ये 'मध्यवर्ती लोकांचे राज्य' ह्या नावाने साम्यवादी सरकारने चीनमधील एकंदर राज्यकारभार हाती घेतल्याबरोबर त्यांनी डॉ. सन यत् सेन ह्यांच्याऐवजी मार्क्स्–लेनिन–स्टॅलिन ह्या रशियातील साम्यवादी पुढाऱ्यांची विचार व तत्त्वप्रणाली अमलात आणण्याचे ठरविले. याप्रमाणे त्यांनी रशियन राज्यव्यवस्थेनुसार चीनमधील राज्यव्यवस्था सुरू केली.


२७ सप्टेंबर १९४९ रोजी 'चायनीज् पीपल्स पोलिटिकल कन्सल्टेटिव्ह कॉन्फरन्स 'च्या खुल्या व जाहीर अधिवेशनात एक राज्यघटना संमत करवून घेतली, त्यात खालील मुख्य मुद्दे होते.

( १ ) पीपल्स पोलिटिकल कन्सल्टेटिव्ह कॉन्फरन्सने ( P. P. C. C. ) निवडलेले १ अध्यक्ष, ६ उपाध्यक्ष व ५६ सभासद असलेले सरकार, चीनमध्ये अंतर्गतबाबतीत व परराष्ट्रीय प्रांगणात चीनचे प्रतिनिधित्व करील.

( २ ) या कौन्सिल किंवा सरकारच्या दिमतीस ( १ ) राज्यकारभार मंडळ, ( २ ) जनतेचे क्रांतिकारी लष्करी मंडळ, ( ३ ) जनतेचे सर्वाधिकारी न्यायमंडळ व ( ४ ) जनतेचे प्रॉसियूटर–जनरलचे मंडळ, अशी चार मंडळे किंवा समित्या देण्यात आल्या. यांपैकी राज्यकारभार मंडळात एक पंतप्रधान, काही उपपंतप्रधान, राजकीय व कायदेविषयक समिती, राष्ट्रीय अर्थकारण व अर्थशास्त्र समिती, सांस्कृतिक व शैक्षणिक समिती, जनता देखरेख समिती, ३० मंत्र्यांची खाती, वगैरेंचा समावेश होतो.

चीन देशाचा एकंदर राज्यकारभार सुरळीत चालण्याकरिता पीकिंग सरकारने चीनचे एकंदर ६ विभाग पाडले. या सहा विभागांशिवाय तिबेट व आंतर-मोंगोलियाकरिता प्रत्येकी एक, अशी दोन स्वयंशासित मंडळे अस्तित्वात आणली. ६ विभागांत मिळून एकंदर २८ प्रांत समाविष्ट करण्यात आले. १३ नगरपालिका व ८ शासकीय जिल्हे अस्तित्वात आणण्यात आले.





# प्रसिद्ध व्यक्ती

## कनफ्यूशियस

ह्या नावाजलेल्या चिनी तत्त्ववेत्त्याचा जन्म खिस्तजन्मापूर्वी ५५१ व्या वर्षी झाला. एका खानदान पण अत्यंत हलाखीचे दिवस आलेल्या कुंग ह्या नावाच्या कुटुंबात त्याचा जन्म झाला. ह्याच कौटुंबिक नावावरून नंतर त्याला 'कुंग घराण्यातील श्रेष्ठ' कुंग फू त्सू असे चिनी भाषेतील नाव मिळून त्याचा लॅटिनमधील अपभ्रंश 'कनफ्यूशियस' असा झाला. घरच्या अत्यंत हलाखीच्या परिस्थितीमुळे, कनफ्यूशियसला काही दिवस कारकुनी करावी लागली. नोकरी करीत असतानाच त्यांनी शिक्षणास सुरवात केली.

सभोवतालच्या एकंदर परिस्थितीचा कनफ्यूशियस यांचे मनावर फार परिणाम झाला. जनता दारिद्र्यात खितपत होती. सर्व चीनभर जिकडेतिकडे

अंदाधुंदी व बेबनाव माजलेला होता. राजघराण्याची सत्ता नाममात्र असून निरनिराळे सरदार, जमीनदार वगैरे लोक आपल्या हाताखालील प्रजेला नाडून वाटेल तसे कर त्यांचेकडून वसूल करून घेत व राजावरही आपला वरचष्मा गाजवीत. निरनिराळ्या सरदारांमध्ये वारंवार युद्धे होत व आपआपसातील यादवी हा त्यांचा एक नित्याचाच खेळ होऊन बसला होता. "तुमचा होतो खेळ, परी रे अमुचा जातो जीव," ह्या उक्तीप्रमाणे सर्व-साधारण चिनी प्रजा मोठ्या कष्टाने व नाइलाजाने येईल ते जिणे जगत होती.

कनफ्यूशियस यांनी आपले सर्व आयुष्य जनताजनार्दनाच्या सेवेकरिता अर्पण करण्याचे ठरविले. राजाची अमर्याद सत्ता कमी करून सरदार व धनिकांची चैन ही मुख्य बाब न राहता, जनतेचे सुख व समृद्धी हीच राजाची खरी कसोटी, असे आपल्या मनाशी नक्की ठरवून, त्यांनी जनतेमध्ये करभार हलका करणे, लोकांस देण्यात येणाऱ्या जबर शिक्षा कमी करणे व यादवीयुद्धे बंद करणे, ह्या त्रयींवर भर देऊन, प्रचारास सुरवात केली. आपल्या हाती सत्ता आल्यास आपण काय काय करू शकू, ह्याची चित्रे ते मनाशी रंगवीत असत, पण त्यांच्या कमनशिबाने त्याना सत्ता मिळण्याची संधीच मिळाली नाही. लोकांमध्ये सतत प्रचार करीत असता त्यांच्याभोवती त्यांच्या चाहत्यांची संख्या वाढू लागली. स्वतः आपण सांगतो ती तत्त्वे आचरणात आणता येत नाहीत, परंतु त्या तत्त्वांचा प्रचार तरुण पिढीमध्ये जास्त जास्त व्हावा, अशाबद्दल ते आपल्या अनुयायांस वारंवार सांगत असत.

तरुणांस आपल्या सभोवतालच्या परिस्थितीची जाणीव करून देऊन त्यांना समाजोन्नतीचे कार्यास उद्युक्त करण्याच्या प्रयत्नात असताच कनफ्यू-शियस यांनी आपल्या वयाची पन्नाशी उलटल्यावरही सर्व चीनभर प्रवास करून ठिकठिकाणच्या परिस्थितीचे सूक्ष्म अवलोकन केले. कनफ्यूशियस हे नेहमी लोकांपुढे व्याख्यानबाजी करून त्यांना उपदेशाचे घोट पाजण्याच्या नेहमी विरुद्ध असत. व्याख्यानबाजीऐवजी प्रत्येक ठिकाणी जाऊन तेथील निरनिराळ्या थरांतील व्यक्तींबरोबर विचारांची देवाण-घेवाण करून ते आपल्या मनातील आशय लोकांपुढे मांडीत.

कनफ्यूशियस जरी स्वतः धर्माभिमानी होते, तरी त्यांनी कोणताही नवीन धर्म स्थापला नाही. धर्मातील कित्येक समजुती, आचारविचार व व्रतवैकल्ये ही कपोलकल्पित व मूळ धार्मिक तत्त्वांच्या विरुद्ध असल्याने, अशा गोष्टी कटाक्षाने टाळाव्या, असे त्यांचे सांगणे असे. मानवता हा कनफ्यूशियस यांच्या एकंदर तत्त्वज्ञानाचा पाया होय. मानवामधील सर्वोत्तम गुण म्हणजे त्याचे इतर मानवांवरील प्रेम होय व मानवाचे शहाणपण म्हणजे त्याची इतर मानवी प्राण्यांना समजून घेण्याची शक्ती होय. चिनी संस्कृतीचा गाभा म्हणजे कुटुंब होय व सर्व मानवसमाज हे एक कुटुंब आहे, अशी कनफ्यूशियस ह्यांची कल्पना असून, हे मोठे मानवी कुटुंब म्हणजे मानवी संस्कृतीचा गाभा, असे त्यांचे नेहमी म्हणणे असे. प्रत्येक व्यक्तीमध्ये अशा प्रकारचे आचार-विचार घडवून आणणे, हे शिक्षणाचे ध्येय असले पाहिजे, असेही ते नेहमी म्हणत. याचकरिता शिक्षणावर कनफ्यूशियस यांचा नेहमी भर असे.

चिनी जनतेच्या सुखाकरिता व हिताकरिता अहर्निश झटणारा हा तत्त्वज्ञ वयाच्या ५२ व्या वर्षी, ख्रिस्तसनापूर्वी ४७९ व्या वर्षी निधन पावला.

ज्याला कनफ्यूशिॲनिझम किंवा कनफ्यूशियसचे तत्त्वज्ञान म्हणतात, ते खरोखर कनफ्यूशियस ह्या एका व्यक्तीचे नसून, त्याच्या अवतीभोवती त्यांच्याशी समानतेच्या विचारसरणीने जो काही लोकांचा कंपू जमला होता, त्या सर्वांचे मिळून एक तत्त्वज्ञान किंवा विचारसरणी, असे म्हणणेच जास्त योग्य होईल. 'चांगुलपणा', 'प्रेम' आणि 'मानवता' व 'मानवहृदयता' अशा चार मुख्य गोष्टी मिळून ही तत्त्वप्रणाली तयार झाली.

## डॉ. सन यत् सेन

आधुनिक चीनचे पितामह व चीनच्या स्वातंत्र्याच्या चळवळीचे जनक डॉ. सन यत् सेन यांचा जन्म इ. स. १८६६ मध्ये झाला. डॉ. सन यत् सेन ह्याचे कुटुंब ख्रिस्तधर्मी होते. प्राथमिक व माध्यमिक शिक्षण पुरे केल्यानंतर हॉंगकॉंग येथील नव्यानेच सुरू झालेल्या वैद्यक विद्यालयात प्रवेश मिळवून, तेथूनच ते इ. स. १८९४ साली स्नातक ( Graduate ) झाले. त्यावेळच्या

चीनमधील अत्यंत अस्थिर परिस्थितीत व चीनवर होणाऱ्या परकीयांच्या आक्रमणांमुळे चिनी जनतेत असंतोषाची आग भडकत होती. वैद्यकीय विद्यालयात शिकत असतानाच, सन यत् सेन ह्यांना सन वेन ह्या नावानेही ओळखण्यात येत असे. काही बरोबरीच्या सहाध्यायांमुळे त्यांचा चिनी क्रांतिकारी पक्षातील काही नामवंत पुढाऱ्यांशी परिचय झाला. इ. स. १८९८ चे सुमारास चिनी-जपानी युद्ध होऊन, त्या युद्धात चीनचा साफ पराभव झाला व त्यामुळे तर चिनी क्रांतिकारकांस एक प्रकारे विशेष स्फुरण चढले. फ्रेंच राज्य-



डॉ. सन यत् सेन

क्रांतीचा इतिहास डोळ्यांसमोर ठेवून सन यत् सेन ह्यांनी स्वातंत्र्य, बंधुत्व व समाजवाद ह्या त्रयींचा उद्घोष करून भावी राष्ट्रवादी पक्षाच्या (क्यूओमिंटांग) स्थापनेस प्रारंभ केला.

कोणत्याही देशाच्या स्वातंत्र्यसंग्रामात परराष्ट्राची सहानुभूती व मदत ह्यांची नेहमीच जरूर असते. जागतिक राजकारणाचा अभ्यास करून आपल्या देशाच्या स्वातंत्र्यप्राप्तीकरिता जगातील कोणकोणत्या राष्ट्रांचे सहाय्य आपणास मिळू शकेल, हे त्या देशातील क्रांतिकारकांचे पुढारी नेहमी पाहात असतातच. चिनी क्रांतिकारकही ह्या गोष्टीला अपवाद नव्हते. इंग्लंड, अमेरिका वगैरे निरनिराळ्या पाश्चात्त्य देशांत चीनबद्दल माहिती देऊन त्या देशांचा आपल्या स्वातंत्र्यसंपादनार्थ जास्तीतजास्त उपयोग कसा करून घेता येईल, हे पाहण्याकरिता चिनी क्रांतिकारकांनी आपले काही प्रतिनिधी ह्या निरनिराळ्या देशांत पाठविले. इ. स. १९०५ मध्ये युरोप खंडातील निरनिराळ्या देशांत चिनी क्रांतिकारक पक्षाच्या शाखा उघडण्यात आल्या. अशा शाखा उघडण्यात सन यत् सेन ह्यांचा फार मोठा भाग होता. ह्या शाखांमार्फत चिनी स्वातंत्र्यसंग्रामाकरिता द्रव्यसहाय्य जमविण्याचे ठरविण्यात आले. परदेशांत व्यापारधंद्यानिमित्त स्थायिक झालेले चिनी व्यापारी साहजिकच अशा पक्षाकडे आकर्षिले जाऊन त्यांनी चीनमधून मांचू राजसत्ता नाहीशी करण्याकरता मोठमोठ्या रकमा चिनी क्रांतिकारकास देण्याचे अभिवचन दिले. चीनमधील राज्यकर्त्यांस ह्या चिनी क्रांतिवाद्यांचा वास लागून त्यांनी ह्या चिनी क्रांतिवाद्यांचे पुढाऱ्यांचे मागे ससेमिरा लावला. सन यत् सेन यांच्यावर तर ह्या चिनी सरकारचा इतका आकस होता, की त्यांना जिवंत पकडून देणारास एक लाख पौंड किंवा सुमारे १२ लाख रुपयांचे बक्षीस चिनी सरकारने जाहीर केले होते. ह्या मोठ्या बक्षिसाच्या आशेने कित्येकदा त्यांच्या प्राणावरही बेतले होते. एकदा लंडनमध्ये असताना त्यांना पळविण्यात येऊन, त्यांना गुपचूप चीनमध्ये आणून चिनी सरकारच्या हवाली करून गडगंज संपत्ती मिळविण्याचा एक प्रयत्नही झाला. लंडनमधील चिनी वकिलातीचाही ह्या गुंडगिरीचे प्रकारात प्रत्यक्ष हात असल्याने सन यत् सेन ह्यास पळवून प्रथम लंडनमधील चिनी वकिलातीत दडविण्यात आले, पण सुदैवाने सन यत् सेन यांचे एक इंग्रज परममित्र यांच्या अविश्रांत खटपटीमुळे सन यत् सेन यांची शिरसलामत सुटका झाली.

डॉ. सन यत् सेन ह्यांच्या प्रभावी नेतृत्वामुळे चीनमधील मांचू राजवटीचे विरोधक डॉ. सन यत् सेन यांच्या राष्ट्रवाद्यांबरोबर हातमिळवणी करू लागले.

क्युओमिंटांग पक्षाची स्थापना होऊन चिनी क्रांतिकारक त्या पक्षास येऊन मिळताच तो पक्ष बाळसे धरू लागला. इ. स. १९११ मध्ये चिनी क्रांतिवाद्यांनी चीनमध्ये त्या वेळच्या राजसत्तेविरुद्ध ठराव केला, त्या वेळी सन यत् सेन इंग्लंडमध्ये होते. इ. स. १९१२ मध्ये चीनला परत आल्यानंतर सन यत् सेन यांस चिनी प्रजासत्ताकाचे पहिले अध्यक्ष होण्याचा मान मिळाला. त्यांनी नॅनकिंग ह्या ठिकाणी आपले मुख्य ठिकाण स्थापन केले. लवकरच चीनमधील लष्करी गटाचे म्होरके यू आन शिकाई व सन यत् सेन यांचे पटेनासे होऊन यू आन शिकाईचेकरता सन यत् सेन ह्यांनी चिनी प्रजासत्ताकाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. राजीनामा दिल्यानंतर यू आन शिकाई यांचे एकंदर मांचू राजवटीस मदतरूप होऊ पाहाणारे धोरण चीनमधील राष्ट्रवाद्यांस मानवणारे नव्हते. त्यांनी पुन्हा क्रांतीचा उठाव केला, पण त्यात त्यांना अपयश आले व सन यत् सेन यास जपानमध्ये परागंदा व्हावे लागले.

इ. स. १९१७ चे सुमारास यू आन शिकाई मरण पावले. साहजिकच चिनी प्रजासत्ताकाचे अध्यक्षस्थानी सन यत् सेन ह्यांची प्रचंड बहुमताने निवड होऊन त्यांनी चीनमध्ये परत येऊन राज्यकारभाराची सूत्रे आपल्या हाती घेतली. स्वातंत्र्यचळवळीत प्रसंगी दहशतीचे मार्गाचाही अवलंब करण्याचे डॉ. सन यत् सेन यांचे धोरण कित्येकवेळा त्यांचे विरुद्ध लोकमत कलुषित करण्यासही कारणीभूत झाले. मोठमोठे व्यापारी व धनाढ्य चिनी लोक आपखुषीने, स्वातंत्र्यचळवळीला लागेल ती मदत करण्यास राजी होत नसत. वेळप्रसंगी त्यांच्यावर साम, दाम, दंड, भेद वगैरेंसारख्या युक्त्या योजून त्यांचेकडून आर्थिक मदत मिळविणे कष्टसाध्य असले, तरी ते करणे आवश्यकच होते. मात्र अशारीतीने दिलेली मदत ही स्वातंत्र्योत्तरकाळात राज्यकारभार व लोकहित यांचे बाबतीत ढवळाढवळ करणारी ठरणार नाही, याची खबरदारी नेते म्हणविणारांनी घेणे आवश्यक असते. निरनिराळ्या देशांच्या इतिहासात अशारीतीने प्रथम सढळ हाताने मदत करून, नंतर वेळ आल्यावर या मदतीचे मोबदल्यात स्वतःच्या तुमड्या बेसुमार भरून घेण्याचे ज्यावेळी व्यापारी-उद्योगपतींचेकडून प्रयत्न सुरू होतात, त्यावेळी मात्र त्यांचेवर जरूर ते बंधन घालण्याची धमक व इच्छा मदत घेणाऱ्या नेत्यांजवळ असणे अत्यंत आवश्यक आहे. सन यत् सेन यांचे मागून

क्युओमिंटांग पक्षाचे अध्यक्ष म्हणून आलेल्या चिआंग कै शेक यांच्या राजवटीविरुद्ध लाचलुचपत, काळाबाजार, वशिलेबाजी, वगैरेंसारख्या आरोपांचे जे रान उठविण्यात आले, त्यात काही तरी तथ्य असले पाहिजे, असे वाटू लागते. राष्ट्राचे उत्थानात निरनिराळ्या व्यक्ती, गट, संस्था, समूह यांचे सहकार्य लागते, हे जितके खरे, तितकेच ह्या सहकार्याची जबरदस्त किंमत मागण्यात येऊ लागली, तर त्या वेळी व्यक्तीपेक्षा जनहित अधिक प्रभावी ठरणे आवश्यक आहे राष्ट्रीय नेत्यांनी अशा तऱ्हेचा संयम व कणखरपणा दाखविणे अत्यंत जरूरीचे असते. किंबहुना या संयम व कणखरपणावरच त्यांच्या राष्ट्रीयत्वाचा व मोठेपणाचा कस लागतो, असे म्हणावयास हरकत नाही.


इ. स. १९२३ चे सुमारास राष्ट्राचे स्वातंत्र्यलढ्यात रशियनांची मदत घेण्याचे सन यत् सेन यांनी ठरविले व रशियन नेत्यांबरोबर जरूर ती बोलणी करण्याकरिता त्यांनी आपले एक विश्वासू सहकारी क्युओमिंटांग सैन्याचे मोठे अधिकारी जनरल चिआंग कै शेक यास रशियात पाठविले. रशियन नेत्यांशी बोलणी करून परत येताना चिआंग कै शेक यांचे मदतीस म्हणून रशियन सरकारने बोरोडिन व जनरल गालाऊस ह्या दोघांस चीनमध्ये पाठविले. परंतु ह्या लोकांच्या उरफाट्या चळवळीमुळे क्युओमिंटांग पक्षास या दोघांना लवकरच चीनमधून बाहेर घालवून देणे भाग पडले. बोरोडिन व जनरल गालाऊस यांच्या चीनमधील आगमनामुळे क्युओमिंटांग पक्षात दुफळी माजली. निर्भेळ राष्ट्रवादी गटाचे जनरल चिआंग कै शेक हे पुढारी झाले, तर क्युओमिंटांग पक्षातील रशियनधार्जिण्या गटाचे नेतृत्व माओ त्से तुंग यांचेकडे गेले.

सन यत् सेन यांनी आपल्या प्रथम पत्नीस इ. स. १९१५ मध्ये काडीमोड दिली व लगेच त्यांनी चिंग लिंग सूंग ह्यांचेशी दुसरा विवाह केला. ह्याच चिंग लिंग सूंगच्या बहिणीशी नंतर जनरल चिआंग कै शेक ह्यांचा विवाह झाला. डॉ. सन यत् सेन ह्यांचे इ. स. १९२५ मध्ये देहावसान झाले. सन यत् सेन यांचा मुलगा, सन फू हाही आपल्या पित्याप्रमाणेच क्युओमिंटांग पक्षाचा एक आधारस्तंभ मानला जातो. चालू टैवानच्या राजवटीतही सन फू यांचे नाव एक श्रेष्ठ मुत्सद्दी म्हणून उल्लेखण्यात येते.

ठ००५३
क्रमांक ३६२ दि. १५/१/५९ नों. दि. २८/१/५९

## माओ त्से तुंग

चिनी साम्यवादी पक्षाचे अध्यक्ष व सध्याच्या चिनी प्रजासत्ताकाचे अध्यक्ष माओ त्से तुंग यांचा जन्म इ. स. १८९३ मध्ये हुनान प्रांतातील शाओ शान



माओ त्से तुंग

या गावी झाला. त्यांचे सर्व शिक्षण चँगशा येथील विद्यालयात झाले. इ. स. १९२१ मध्ये प्रथम शांघाय येथे त्यांनी साम्यवादी पक्षाची स्थापना करण्यात पुढाकार घेतला. प्रथम प्रथम चीनच्या पुनरुत्थानाचे कामात साम्यवादी व राष्ट्रवादी किंवा क्युओमिंटांग ह्या पक्षांनी एकमेकांस सहकार्य दिले, पण

नंतर त्यांच्यात तीव्र स्वरूपाचे मतभेद निर्माण झाले व इ. स. १९२७ मध्ये साम्यवादी पक्षाने आपले स्वतंत्र लष्करी-दल उभारण्यास सुरवात केली. साहजिकच त्यांनी आपल्या साम्यवादी पक्षाची ही नवीन पुनर्रचना हुनान प्रांतापासूनच सुरू केली व याकरिता त्यांनी साम्यवादी रशियनांचे सर्वतोपरी साह्यही घेतले.

साम्यवादी पक्षाची ही तयारी पाहून क्युओमिंटांग पक्षाचे अध्वर्यु जनरल चिआंग कै शेक यांनी ह्या साम्यवाद्यांविरुद्ध हरतऱ्हेने लष्करी हालचाली सुरू करून त्यांना वठणीवर आणण्याचा प्रयत्न केला. माओ त्से तुंग व त्यांच्या साम्यवादी अनुयायांस काही वर्षे फार कष्टाची गेली. चिआंग कै शेक यांच्या सैन्याकडून त्यांस एका प्रांतातून दुसऱ्या प्रांतात सारखे माघार घेत भटकावे लगले. अखेर चीनच्या वायव्येकडील येनान प्रांतात माओ त्से तुंग व त्यांचे साम्यवादी सहकारी ह्यांनी आपली चौफेर नाकेबंदी करून चिआंग कै शेक ह्यांच्या सैन्यास अडविले. साम्यवादी पक्षाने आपले स्वतंत्र सरकार स्थापन करून शेन्सी, कान्सू व निंगसिया ह्या प्रांतांवर आपले वर्चस्वही स्थापन केले.

इ. स. १९३७ च्या चीनवरील जपानी स्वारीचे वेळी माओ त्से तुंग व चिआंग कै शेक ह्या दोन गटांतील शत्रुत्व तात्पुरते तरी मिटले. दुसरे महायुद्ध संपल्यावर माओ त्से तुंग यांनी चिआंग कै शेक यांच्याबरोबर चीन-मधील आपआपल्या गटांमधील यादवी संपवून देशात स्थिर सरकार स्थापन करण्यासंबंधी बोलणी सुरू केली, परंतु दुसऱ्या महायुद्धाच्या दरम्यान आंतर-राष्ट्रीय राजकारणात चीनचे प्रतिनिधी म्हणून जनरल चिआंग कै शेक ह्यांचा भाव भलताच वाढलेला असल्यामुळे व त्यातूनही अमेरिकेची साम्यवादी-माओ त्से तुंगपेक्षा-राष्ट्रवादी क्युओमिंटांग पक्षाला मदत मिळण्याच्या आश्वासनामुळे, चिआंग कै शेक यास चीनमध्ये क्युओमिंटाग पक्षालाच सर्वाधिकार असावेत, असे वाटू लागल्यामुळे ही बोलणी फिस-कटली. चीनमधील अंतर्गत यादवीयुद्धाला सुरवात होऊन, राष्ट्रवादी क्युओमिंटांग पक्षाविरुद्ध माओ त्से तुंग ह्यांच्या साम्यवादी पक्षाने लोकमत कलुषित केले व शेवटी चिआंग कै शेक ह्यांच्या सैन्याचा पूर्ण पराभव होऊन त्यास चीन सोडून टैवानमध्ये आसरा घ्यावा लागला.


कौटुंबिक न्याहरी
एक-चाकी हातगाडी
मुद्दाम लहान केलेली पाउले
पक्षी विकणारा
डोंबारी

एक ऑक्टोबर, १९४९ रोजी माओ त्से तुंग यांची मध्यवर्ती चिनी सरकारचे अध्यक्ष व चिनी साम्यवादी पक्षाचे अध्यक्ष म्हणून निवडणूक झाली. लवकरच त्यांनी साम्यवादी रशियन सरकारशी दीर्घ मुदतीचा एक तह केला. इ. स. १९५८ मध्ये माओ त्से तुंग यांनी चिनी प्रजासत्ताकाचे अध्यक्ष-पदाचा राजीनामा दिला, पण साम्यवादी चिनी पक्षाचे अध्यक्षपद मात्र सोडले नाही. चिनी प्रजासत्ताकाचे मुख्य प्रधान चौ एन लाय यांचेकडे सर्व सत्ता सोपवून ते प्रजासत्ताक सरकार व चिनी साम्यवादी पक्ष यांचे मार्ग-दर्शनाचे काम करू लागले.

## चँगत्सो लिन

ह्या नामांकित चिनी लष्करी अधिकाऱ्याचा जन्म इ. स. १८७३ मध्ये फेंगटीएन प्रांतात एका अत्यंत गरीब अशा कुटुंबात झाला. लहानपणापासून गरिबीमुळे शिक्षण घेणे त्यास शक्य झाले नाही, म्हणून गुरे चारणे, किरकोळ घरकाम करणे, अशी कामे करून त्यांनी नंतर पीकिंग–मुकडेन लोहमार्गाचे काम सुरू झाले, तेव्हा एक सामान्य कामगार म्हणून नोकरी धरली. इ. स. १९०४ चे सुमारास ‘ हुंगुट्ठ ’ ह्या नावाच्या एका मांचूरियन गनिमीदलाचे ते पुढारी झाले. त्याच सुमारास रशिया व जपानमधील युद्धात त्यांनी जपानी लोकांच्या बाजूने प्रत्यक्ष भागही घेतला. हे युद्ध संपल्यावर जपानी लष्करी अधिकाऱ्यांचे सल्ल्यावरून त्यांनी चिनी लष्करात नोकरी पत्करली. इ. स. १९१३ मध्ये त्यांना फेंगटीएन प्रांताचे लष्करी गव्हर्नर म्हणून नेमण्यात आले. इ. स. १९१६ मध्ये त्यांनी यूआन शिकाई यांच्याविरुद्ध चिनी लोकमत बळकट करण्यास मदत केली व इ. स. १९१७ मध्ये चँग हसीएन यांनी चीनमध्ये पुन्हा मांचू राजघराण्याची सत्ता आणण्याचा जो कट केला, त्यालाही त्यांनी विरोध केला. इ. स १९१८ मध्ये त्यांना मांचूरियाचे इन्स्पेक्टर जनरल म्हणून नेमण्यात आले. इ. स. १९१८ ते १९२८ चे दरम्यान चीनमध्ये स्थिर सरकार असावे, अशाबद्दल त्यांनी मोठे निकराचे प्रयत्न केले. साम्यवादी माओ त्से तुंग व राष्ट्रवादी चिआंग कै शेक यांचे-

मधील बेबनाव मिटविण्याचाही त्यांनी पुष्कळ प्रयत्न केला. परंतु त्यांना त्यांच्या प्रयत्नात म्हणावे तसे यश आले नाही.

मुकडेन येथे आगगाडीने जात असता त्यांची आगगाडी सुरुंग लावून उडविण्यात आली. ह्या अपघातात चँगत्सो लिन यांचे इ. स. १९२८ मध्ये प्राणोत्क्रमण झाले.

## यूआन शिकाई

ह्या नामवंत चिनी मुत्सद्द्याचा जन्म इ. स. १८५९ मध्ये होनान प्रांतातील ह्सीआंग येंग येथे झाला. त्यांचे घराणे होनान प्रांतातील एक प्रसिद्ध जमीनदार घराणे होते.

लहानपणी किरकोळ शिक्षण झाल्यावर त्यांची कोरियाचे गव्हर्नर म्हणून पहिली नेमणूक झाली. आपल्या अंगच्या हुशारीने त्यांनी कोरियावरील चीनच्या सार्वभौमत्वाचा हक्क प्रस्थापित केला. कोरियाचा एकंदर कारभार पाहत असता त्यांच्या अंगी असलेल्या अनेक गुणांना वाव मिळाला.

इ. स. १८९८ त चिनी बादशाह कुएन ह्सीने त्या वेळच्या राजमातेच्या सत्तेविरुद्ध बंड करण्याचे ठरवून यूआन शिकाईची मदत मागितली. एकंदर चिनी राजकारणाचा रागरंग पाहून यूआन शिकाई यांनी आपले सामर्थ्य व शक्ती राजमातेच्या बाजूला उभी केली व बादशाह कुएन ह्सी यास पदच्युत करविले. राजमातेला दिलेल्या सहाय्याबद्दल यूआन शिकाई यास शांटुंग प्रांताचे गव्हर्नर नेमण्यात आले. इ. स. १९०१ मध्ये त्यांना चिहली प्रांताचा व्हाइसरॉय म्हणून रवाना करण्यात आले.

१९११ च्या चीनमधील राज्यक्रांतीत यूआन शिकाई यांनी आपले वजन राष्ट्रवाद्यांच्या बाजूला टाकले व क्रांती यशस्वी झाल्यावर, त्यांच्या मदतीचा मोबदला म्हणून यूआन शिकाई यास लागलीच चिनी प्रजासत्ताकाचे पहिले अध्यक्ष म्हणून निवडण्यात आले. चिनी प्रजासत्ताकाचे अध्यक्ष झाल्यापासून यूआन शिकाई यांनी मांचू राजसत्ता पुन्हा चीनमध्ये प्रस्थापित करण्याचा प्रयत्न सुरू केला. यामुळे डॉ. सन यत् सेन व यूआन शिकाई

यांमध्ये संघर्ष सुरू झाला. इ. स. १९१५ मध्ये यूआन शिकाई यांच्या प्रेरणे-वरून मांचू राजघराण्याची चीनवरील सत्ता पुन्हा प्रस्थापित करण्याचे जोरदार प्रयत्न सुरू झाले. इ. स. १९१६ मध्ये राष्ट्रवाद्यांचा पराभव होऊन मांचू राजसत्ता पुन्हा चीनमध्ये प्रस्थापित केली गेली. यानंतर लवकरच यूआन शिकाई यास ६ जून, १९१६ रोजी मृत्यू आला.

## चौ एन लाय

चिनी प्रजासत्ताकाचे हल्लीचे मुख्य प्रधान श्री. चौ एन लाय ह्यांचा जन्म इ. स. १८९० मध्ये झाला. टीएन्टसीनमधील नानकाय महाविद्यालयात त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केल्यावर ते राष्ट्रीय चळवळीत सामील झाले. यूआन-शिकाई ह्यांच्या राष्ट्राध्यक्षपदाविरुद्ध सुरू झालेल्या चळवळीत ह्यांनी पुढाकार घेतला व नवयुवकांच्या एका संस्थेचे ते अध्यक्ष म्हणून निवडले गेले. इ. स. १९१९ च्या क्रांती काळात ह्या युवक संस्थेमार्फत सुरू करण्यात आलेल्या एका वर्तमानपत्राचे ते मुख्य संपादक झाले ह्याच सुमारास त्या वेळच्या चिनी सरकारने त्याना पकडून ६ महिने कारावासाची शिक्षा ठोठावली.

शिक्षेची मुदत संपून कारावासातून बाहेर येताच चौ एन लाय इ. स. १९२० मध्ये फ्रान्समध्ये गेले. तेथे त्यांनी चिनी समाजसत्ताकवादी युवकांची एक संस्था स्थापन केली. चीनमध्ये परत आल्यावर राष्ट्रवादी चिनी पक्षाने—क्युओमिंटांग—व्हँपू येथे चालू केलेल्या लष्करी महाविद्यालयात शिक्षक व त्यानंतर लवकरच राजकीय शिक्षण शाळेच्या प्राचार्यपदावर त्यांची नेमणूक झाली. इ. स. १९२७ साली चीनमध्ये झालेल्या कामकरी लोकांचे उठावात त्यांनी दुसऱ्या व तिसऱ्या कामगारांच्या पलटणीचे संघटक म्हणून काम केले. त्यानंतर इ. स. १९२७ मध्ये किआंगसी प्रांतात झालेल्या 'नॅनचँग' उठावाचे पुढारीपणही त्यांनी अंगावर घेतले. इ. स. १९२७-२८ च्या क्रांतीचा पराभव झाल्यावर त्यांनी चिनी लाल सैन्य – चिनी साम्यवाद्यांचा लढाऊ विभाग – तयार करण्यास सुरवात केली. इ. स. १९३१ पर्यंत त्यांनी शांघायमधील स्वातंत्र्यवाद्यांच्या गुप्त चळवळीचे मार्गदर्शक होते. सोव्हिएट पंखाखालील किआंगसी प्रांतातील चिनी लाल सैन्याचे राजकीय सूत्रधार

बनले. १९३४-३५ चे सुमारास चीनमधील अंतस्थ यादवी टाळण्याचे उद्देशाने क्युओमिंटांगचे जनरल चिआंग कै शेक व साम्यवादी पक्ष ह्यांचे-मध्ये एकी घडवून आणण्याचा त्यांनी प्रयत्न केला. इ. स. १९४६ मध्ये




चौ एन लाय

अमेरिकेचे जनरल मार्शल ह्यांच्या अध्यक्षतेखाली चीनसंबंधी वाटाघाटी करण्याकरिता नेमल्या गेलेल्या एका समितीवर त्यांची एक सभासद म्हणून नेमणूक झाली.

अगदी प्रथमपासूनच साम्यवादी विचारसरणीकडे त्यांचा कल असल्यामुळे क्युओमिंटांग पक्षापेक्षा चिनी साम्यवादी पक्षाचेच आकर्षण त्यांचेवर जास्त परिणामकारक ठरले. इ. स. १९२६ मध्ये ते साम्यवादी पक्षाचे सभासद झाले. राजकीय सल्लागार समितीचे ते एक आधारस्तंभ समजले गेले. इ. स. १९४९ पासून साम्यवादी चिनी सरकारचे ते परराष्ट्रीय मंत्री म्हणून निवडले गेले. इ. स. १९५८ पासून त्या वेळचे चिनी पंतप्रधान माओ त्से तुंग ह्यांच्या खुशीच्या निवृत्तीनंतर, आपोआप श्री. चौ एन लाय हेच चीनचे महामंत्री म्हणून निवडले गेले असून, आजतागायत ते पद, ते भूषवीत आहेत.

६७ वर्षे वयाच्या ह्या मुत्सद्द्याला त्यांच्या चिनी साम्यवादी पक्षातील कामगिरीबद्दल “ जनरल ” हा बहुमानाचा किताब देण्यात आला आहे.





# टैवान (फोर्मोसा)

मूळ चीनच्या पूर्व किनाऱ्यापासून सुमारे १०० मैल पूर्वेस जे एक लहानसे बेट आहे तेच टैवान होय. ह्या बेटाचा अंतर्भाव चीनच्या आग्नेयीकडील फूकिएन प्रांतात केला असून, चीनचा पूर्व किनारा व टैवान यांमध्ये पूर्व चिनी समुद्राचा एक भाग, म्हणजेच टैवानची सामुद्रधुनी आहे. भारताच्या आग्नेयीस सुमारे २५ मैलांवर ज्याप्रमाणे सिलोन किंवा लंका हे बेट आहे, त्याप्रमाणेच चीन व टैवान यांची परिस्थिती आहे.

टैवानच्या उत्तरेला चिनी समुद्र व जपानी बेटे, पूर्वेला प्रशान्त किंवा पॅसिफिक महासागर, पश्चिमेला टैवानची सामुद्रधुनी व मुख्य चीन व दक्षिणेला हिंदी महासागर व फिलिपीन बेटे आहेत. या बेटाची जास्तीत-जास्त लांची ईशान्य ते नैर्ऋत्य सुमारे २४० मैल असून, पूर्व–पश्चिम रुंदी कमीतकमी ९ मैल व जास्तीतजास्त ९० मैल आहे. या बेटाचे एकंदर क्षेत्रफळ १३,८०५ चौरस मैल असून, या क्षेत्रफळात, टैवानच्या पश्चिमेस असलेल्या पास्काडोर्स व इतर लहान लहान बेटांचे मिळून ४९ चौरस मैलांच्या क्षेत्रफळाचाही समावेश होतो. टैवानची लोकसंख्या ८४ लक्ष असून, त्यात टैवानमधील सुमारे २ लक्ष वन्य जमातींचाही समावेश होतो.

# टैवान ( फोर्मोसा )

पूर्व चिनी समुद्राचा टैवानची समुद्रधुनी हा सागरी भाग फार उथळ असल्याने, अती प्राचीन काळी टैवान चीनचाच एक भाग असण्याचा दाट संशय येतो. याशिवाय येथे राहणारे लोक व आढळून येणारे पशु व वनस्पति-जीवन यांचेही चीनमधील मानवी, पशू व वनस्पतिजीवनाशी पुष्कळच साम्य दिसून येते. ह्यावरूनही फार पुरातन काळात टैवान हा चीनचाच एक भूमिभाग असून, मध्यंतरी पृथ्वीच्या पृष्ठभागावर ज्या कित्येक घडामोडी झाल्या, त्यांपैकीच एक म्हणजे चीन व टैवान यांमधील जमीन दुभंगून जाऊन तेथे आजूबाजूच्या महासागराचे पाणी आले असावे; असा कित्येक भूगर्भ-शास्त्रज्ञांचा तर्क आहे. चीनच्या मुख्य भूमीपासून टैवान केव्हा निराळे झाले, ह्याचा कालनिर्णय निश्चित नसला, तरी गेली हजारो वर्षे टैवान चीनपासून स्वतंत्र आहे, ही गोष्ट स्पष्ट आहे. मूळ चीनपासून निराळा असल्याने, पूर्वीच्या चिनी राज्यकर्त्यांचे टैवानकडे असावे तितके लक्ष नव्हते व परिणामी जरी टैवानवर चीनचा शासनाधिकार अबाधित होता, तरी मुख्य चीनच्या मानाने टैवान पुष्कळच मागासलेला व दुर्लक्षित असा प्रदेश राहिला असल्यास फारसे नवल नाही.

इसवी सनाच्या १६ व्या शतकाच्या अखेरीस डच नावाडी ह्या बेटावर प्रथम उतरले व त्यांनी ह्या बेटावर डचांचे निशाण उभारले. ह्या बेटावरील नयन-रम्य व सुंदर वनस्पती जिकडे तिकडे पसरलेली पाहून डचांनी या बेटास फोर्मोसा – सुंदर वनस्पतींचा प्रदेश – असे नाव दिले. चिनी सरकारी दप्तरा-तील टैवान हे नाव, काही काल अदृश्य झाले. १९ व्या शतकाचे शेवटी चीन व जपान यांमध्ये लढाई होऊन, चीनचा सपशेल पराभव झाला. त्या नंतर झालेल्या तहाअन्वये टैवान बेटाचा ताबा जपानी लोकांकडे आला. जपानी लोकांनी; मग पूर्वीच्या डच लोकांनी फोर्मोसा म्हणून ठरविलेल्या बेटाचे पुनः नामकरण करून त्याचे पूर्वीचे चिनी नाव-टैवान – कायम केले.

## स्वाभाविक वर्णन

टैवान बेट कर्कवृत्ताने बरोबर छेदले गेले आहे. साधारणपणे उत्तर अक्षांश २१½ पासून ते २४ अंशापर्यंत या बेटाचा दक्षिणोत्तर पसारा आहे. ह्या बेटाच्या मध्यभागी डोंगर असून, ह्या डोंगरांची काही शिखरं जवळजवळ

१३,००० फूट उंच आहेत. सिंकाओशान किंवा माऊंट मॉरिसन हे शिखर १२,९५९ फूट उंच आहे, तर दुसरे एक शिखर त्सुकाओशान किंवा माऊंट सिल्विया हे १२,८९७ फूट उंच आहे. कर्कवृत्तावरील ही दोन शिखरे म्हणजे बारमाही बर्फाच्छादित भागच होत. या मध्यभागातील डोंगरराजी चारी बाजूस समुद्राचे रोखाने उतरत्या आहेत. त्यातल्यात्यात पूर्वेकडील पॅसिफिक महासागराचे बाजूस – टैवानच्या पूर्व किनाऱ्यावर – हे डोंगरांचे उतार इतके अवघड आहेत, की ह्या पूर्व किनाऱ्यावर सपाट अशी जमीन तर आढळत नाहीच, पण आपल्याकडील पश्चिमकिनारपट्टीवरील कोकण विभागाप्रमाणे जिकडे तिकडे तुटलेले कडे व उजाड डोंगराळ भाग दिसून येतो. टैवानच्या पूर्वकिनारपट्टीच्या भागात मानवी जीवन फारच तुरळक असल्याने, ह्या भागात पशू व वनस्पतिजीवन मात्र फारच समृद्ध असल्याचे दिसते. मानवी जीवनाचा अभाव असल्याने हा सर्व भाग निर्जन आहे.

टैवानमधील मध्य पर्वतांचे पश्चिमेकडील उतार पुष्कळच सोपे आहेत. पूर्वकिनारपट्टीशी तुलना करता टैवानचा पश्चिमकिनारपट्टीचा भाग हा अजीबात निराळा वाटतो. या भागात मैदाने विपुल असल्याने शेती हाच येथील लोकांचा मुख्य व्यवसाय असून, या शेतीपासूनही निरनिराळी पिके काढली जातात. ह्या भागात लोकवस्तीही दाट आहे. साहजिकच पश्चिम किनारपट्टीमध्ये मोठमोठी शहरे व काही बंदरेही आहेत. टैवानच्या पश्चिमेकडील सागरी भाग उथळ असल्याने व किनारा दंतुर असल्याने बंदरांची वाढही झपाट्याने झाली आहे.

## हवामान

टैवान बेटाच्या बरोबर मध्यभागातून कर्कवृत्त जात असल्याने या बेटावरील हवामान सर्वसाधारणपणे उष्णसमशीतोष्ण कटिबंधातील हवामानाप्रमाणे आहे. आठ महिने उन्हाळा व जेमतेम चार महिने हिवाळा असतो. या बेटाच्या दोन्ही किनाऱ्यांजवळून जपानी कुरोशीवो किंवा उष्ण पाण्याच्या प्रवाहाच्या दोन शाखा वर्षभर वाहात असल्याने या दोन्ही किनारपट्टींचे भागात बारमाही समशीतोष्ण हवामान आढळते. पश्चिम किनारपट्टीवरील मैदानात

उष्णतामान कधीही १०० अंश फॅरनहाईटपेक्षा जास्त नसते व हिवाळ्यात कधीही ६० अंश फॅरनहाईटपेक्षा कमी नसते.

कर्कवृत्ताच्या दोहो बाजूस टैवान पसरल्यामुळे ह्या बेटावर बारमाही पाऊस पडतो. पावसाचे प्रमाण सर्वसाधारणपणे वार्षिक ४०–५० इंच असते. या बेटावर उन्हाळी व हिवाळी अशा दोन्ही मान्सून वाऱ्यांमुळे पाऊस पडतो. उन्हाळी मान्सून वारे मे महिन्यापासून सप्टेंबर महिन्यापर्यंत सर्व पश्चिम किनारपट्टीचे प्रदेशात मुबलक पाऊस देतात. परंतु ह्या मान्सून वाऱ्यांना तेथील बारमाही वाहणाऱ्या व्यापारी वाऱ्यांकडून अडथळे निर्माण होत असल्याने उन्हाळ्यात पाऊस भरपूर पडत नाही. याचे उलट हिवाळी मान्सून वाऱ्यांस तेथील बारमाही व्यापारी वाऱ्यांची मदत होत असल्यामुळे नोव्हेंबर ते फेब्रुवारी ह्या हिवाळी महिन्यांत व त्यातल्यात्यात उत्तरेकडील मैदानी प्रदेशात भरपूर पाऊस पडतो. टैवान बेटाचे मध्यभागी ईशान्य ते नैर्ऋत्य अशा पसरलेल्या निईटाका पर्वतावर तर पाऊस बेसुमार पडतो. आपल्या भारतात ज्याप्रमाणे नैर्ऋत्य मान्सून वाऱ्यापासून पडणारा पाऊस नैर्ऋत्येकडून जसजसे ईशान्येकडे जावे, तसतसा कमी कमी होत जातो, परंतु डोंगरउतारांवर व त्यातल्यात सह्याद्रीच्या शिखरांवर बारेमाप पाऊस पडतो. त्याचप्रमाणे टैवानमध्येही निईटाका पर्वतशिखरांवर भरपूर पाऊस असतो. काशोरिया ह्या निईटाका पर्वतशिखरावर जास्तीतजास्त एका वर्षात २८९ इंच पाऊस पडल्याची नोंद आहे.

## वनस्पतिजीवन


टैवान बेट कर्कवृत्तावर दोन्हीकडे समप्रमाण पसरलेले असून, तेथे बारमाही व भरपूर पाऊस पडतो, हे आपण आताच पाहिले. दोन्ही मान्सून वाऱ्यांपासून मिळणाऱ्या पावसामुळे ह्या बेटावरील वनस्पतिजीवन इतके विपुल व वैचित्र्यपूर्ण आहे, की असे वनस्पतिजीवन इतरत्र क्वचितच आढळात येते. म्हणूनच किंवा काय, डच लोकांनी या बेटाचा ताबा मिळविल्यावर त्याचे नाव विपुल नैसर्गिक सौंदर्याने भरलेला प्रदेश, असा आपल्या भाषेतील ‘‘ फोर्मोसा ’’ ह्या शब्दाने केले. दक्षिण अमेरिकेतील अर्जेंटिना देशात तेथील वनस्पती व नैसर्गिक विपुल सौंदर्यामुळे प्रसिद्ध असलेल्या एका प्रांताचे

नावही फोर्मोसाच आहे. पश्चिमेकडील सपाट मैदानात होणारी भातशेती व इतर शेतीपासून मिळणारी उत्पन्ने, जसजसे पूर्वेकडे डोंगरचढणीवर जावे तसतशा निरनिराळ्या प्रकारच्या वनस्पती, पानझडी वृक्ष, मधूनमधून आढळून येणारे केळी, ऊस, कापूस, चहा वगैरेंचे मळे, त्याहीपेक्षा उंचीवर आढळून येणारी दाट जंगले व सरतेशेवटी डोंगरमाथ्यावरील उजाड व बहुतेक बर्फाच्छादित प्रदेश, त्यानंतर पूर्वेकडील प्रशांत महासागराच्या कडेचे तुटलेले कडे व पश्चिमेकडील दुर्गम उतारांवरील निरनिराळ्या प्रकारच्या वनस्पती, अशी विपुल व विविध प्रकारची वनस्पती आपल्याला या बेटावर आढळून येते. टैवानमधील जंगल-संपत्तीत पाम, बुचाची झाडे व मोठमोठाले पाईन वृक्ष यांचा समावेश होतो व ह्या जंगलांपासून टैवानी सरकारला भरपूर उत्पन्नही मिळते.

## शेती व्यवसाय

टैवान बेटावरील एकंदर क्षेत्रफळाच्या फक्त २४ टक्के भागच नांगरटीखाली येऊ शकतो. नांगरटीखाली येणाऱ्या प्रदेशात, पश्चिमेकडील किनारपट्टीच्या मैदानांचा प्रदेश फार महत्त्वाचा आहे. एकंदर शेतीव्यवसाय करणाऱ्या प्रदेशापैकी जवळजवळ ४५ टक्के भाग मैदानांचा आहे भरपूर पाऊस व त्याच्या जोडीला लहान प्रमाणावर का होईना, पण पाटबंधाऱ्यांची सोय उपलब्ध असल्यामुळे ह्या मैदानी भागात शेती हा टैवानी लोकांचा एक महत्त्वाचा उद्योग झाला आहे. शेतीपासून तयार करण्यात येणाऱ्या मालात भाताचा नंबर पुष्कळच वरचा लागतो कसदार जमीन व भरपूर पाऊस यांमुळे टैवानमध्ये वर्षातून दोनदा भाताचे पीक काढण्यात येते. भाताखेरीज ऊस, चहा, बटाटे, केळी, अननस, ताग, शिसाल, तंबाखू, वाटाणे वगैरेंचे पीकही महत्त्वाचे आहे.

मध्यंतरीच्या काळातील जपानी अमलामुळे टैवानमध्ये उसाची लागवड व ह्या उसापासून साखर बनविणे, या उद्योगास एक विशेष महत्त्व प्राप्त झाले. टैवानमध्ये तयार होणारी साखर फार मोठ्या प्रमाणात जपानला निर्यात करण्यात येऊ लागली. अलीकडे टैवान स्वतंत्र झाल्यावरही टैवानी साखरेला जपानची मागणी अजून आहेच. उसाच्या बरोबरीने शेतीपासूनचे दुसरे


टैवान (फोर्मोसा)
तायतुंग
तायनान
मोरिसन शिखर
चोशुई नदी
चैंगवा
तायचुंग
सिन्चू
तुंगसीआओ
सिल्वीया शिखर
तायपेह
ताओयुआन
कीलुंग

उत्पादन म्हणजे चहा होय. टैवानमध्ये चहाचे मोठमोठे मळे आहेत व हे मळे बहुतेक उत्तरेकडील भागात सिन्हचौ व टायपेह यांचे दरम्यान आहेत. टैवानमध्ये तयार होणाऱ्या चहापैकी पुष्कळसा चहा अमेरिकेतील संयुक्त संस्थाने व ब्रिटनमध्ये आयात केला जातो चहाचे लागवडीस अत्यंत अनुकूल अशी डोंगरावरील उताराची जमीन, भरपूर पाऊस वगैरे गोष्टी निसर्गदत्त असल्यामुळे टैवानमधील चहाची प्रतही बरीच वरच्या दर्जाची आहे.

बटाट्याचे उत्पादनही टैवानमध्ये मुबलक होते. बटाट्याचे पीक वर्षभर काढण्यात येत असल्यामुळे, दैनंदिन खाद्यपदार्थ म्हणूनही त्याचा चांगला उपयोग होतो.

## जंगलसंपत्ती

टैवानच्या एकंदर क्षेत्रफळाच्या जवळजवळ ६४ टक्के जमिनीवर मोठमोठी जंगले व दाट अरण्ये आहेत. भरपूर पाऊस व निरनिराळे उष्णतामान यांमुळे टैवानमध्ये उष्ण व उष्ण-समशीतोष्ण कटिबंधातील अरण्ये मुबलक आढळून येतात. पामची झाडे, बुचाचे वृक्ष, पाईन वृक्षांची जंगले, अशा निरनिराळ्या प्रकारच्या वनस्पती आढळून येतात. जपानी कारकीर्दीत ही जंगले खासगी मालकीची होती, परंतु टैवानमध्ये राष्ट्रीय चिनी सरकार प्रस्थापित झाल्यावर ह्या बहुतेक जंगलांची मालकी टैवानी सरकारने आपल्याकडे घेतली. सध्या एकंदर जंगलांपैकी जवळजवळ ८९ टक्के जंगले सरकारच्या मालकीची झाली आहेत.

## मच्छीमारी

टैवानच्या चारी बाजूंनी समुद्र असल्यामुळे टैवानमधील मच्छीमारीचा उद्योग फार महत्त्वाचा समजला जातो. मच्छी हे रोजच्या अन्नातील एक महत्त्वाचा भाग असल्याने, मच्छीला मागणीही भरपूर असते व ह्या मागणीच्या परिपूर्तीकरता हजारो लोकांना मच्छीमारीच्या उद्योगात कामधाम उपलब्ध होते. भौगोलिकदृष्ट्या समुद्रकिनाऱ्यावर राहणाऱ्या लोकांची मुख्य उपजीविका मत्स्याहारावर अवलंबून असते. शिवाय मच्छीमारीच्या व्यवसायामुळे अशा भागातील लोक दर्यावर्दी बनतात व राष्ट्राचे दृष्टीने हा मच्छीमारी उद्योग फार महत्त्वाचा समजला जातो.

## खनिजसंपत्ती

टैवानच्या उत्तरेकडील भागात कीलुंगजवळ कोळशाच्या खाणी आहेत. ह्या खाणींमधून लिग्नाईट व वंकर अशा दोन्हीं प्रकारच्या कोळशांचे उत्पादन होते. हा कोळसा जहाजांस उपयोगी आहे. हा दोन्ही प्रकारचा कोळसा थोडासा निकृष्ट प्रतीचा असल्याने पोलादनिर्मितीकरता याचा फारसा उपयोग होऊ शकत नाही. शिवाय टैवान बेटात लोखंडाचे दुर्भिक्ष असल्याने पोलादाचे कारखानेही नाहीत.

पूर्वकिनाऱ्यावरील सिनचांगचे आसपास मुबलक सोन्याचे साठे आढळतात, परंतु जे सोने सापडते, तेही फारसे महत्त्वाचे नाही. याच पूर्वभागात तांबे, गंधक, चांदी वगैरे धातूंचेही थोडे थोडे साठे आहेत. परंतु व्यापारीदृष्टीने ह्या खनिजांसही म्हणण्यासारखे महत्त्व नाही. इमारती–दगडही ह्या पूर्वभागात विपुल प्रमाणात आढळतो व त्याचा वापरही इमारती बांधण्याकडेच टैवानमध्ये केला जातो.

टैवानमध्ये तेलाचा साठा नाममात्रच आहे; परंतु टैवानमधील तेलाच्या विहिरीतून उत्पादन होणारे तेल, त्या देशाच्या मागणीच्या प्रमाणात फारच अपुरे आहे.

टैवानला खूप मोठा समुद्रकिनारा व तोही दंतुर असल्याने, समुद्राच्या पाण्यापासून मीठ तयार करण्याचा उद्योगही जोरात आहे. टैवानमधील मिठाचे उत्पादन करणारी सर्व मिठागरे सरकारच्या मालकीची आहेत.

## दळणवळणाची साधने

टैवानमध्ये पूर्वेकडील, म्हणजे प्रशांत महासागराकडील उतार अतिशय कठीण व अडचणीचे असल्याने, या बाजूला पूर्ववाहिनी अशी एकही मोठी नदी नाही. निईटाका डोंगरशिखरापासून पश्चिमेकडे डोंगरउतार पुष्कळच सोपे असल्याने ह्या बाजूला पश्चिम वाहिनी नद्यांचीच शक्यता जास्त आहे. तरीही रुंद पात्र असलेली एकही मोठी नदी नसल्याने देशांतर्गत नदीतील वाहतूक कोठेच दिसत नाही. जी काय थोडीफार वाहतूक आढळून येते, ती फक्त लहान लहान होड्यांमधून चालते.

टैवानमध्ये डोंगराळ भाग फार असल्याने लोहमार्गांचीही फारशी वाढ झालेली नाही. इ. स. १९६१ पर्यंत एकंदर १७,४०० मैल लांबीचे लोहमार्ग अस्तित्वात होते. यांपैकी बहुतेक सर्व लोहमार्ग मोठमोठी शहरे व बंदरे यास जोडणारे असे होते. साखर कारखान्यांच्या क्षेत्रात उसाची ने–आण करण्याकरता निरनिराळ्या शेतीकेंद्रापासून तो साखरेच्या कारखान्यांपर्यंत वापरण्यात येणाऱ्या अत्यंत अरुंद अशा दोन रुळांतील अंतराचे लोहमार्ग ( नॅरोगेज ) यांचाही समावेश ह्या एकंदर १७,४०० मैल लांबीच्या लोहमार्गात केला आहे.

## औद्योगिक माहिती

टैवान हा पहिल्यापासूनच एक मागासलेला प्रदेश असल्याने, ह्या प्रदेशात कारखान्यांची फारशी वाढ झालेली नाही. मध्यंतरी जपानी लोकांनी या बेटाचा ताबा घेतल्यानंतर, ह्या प्रदेशात काही उद्योगधंदे सुरू करण्याचा प्रयत्न केला गेला. त्यातल्यात्यांत जपानला आवश्यक अशा, पण जपानमध्ये तयार होऊ न शकणाऱ्या वस्तूंचे उत्पादनास प्राधान्य देण्यात आले. अशा वस्तूंपैकी सर्वात महत्त्वाची वस्तू म्हणजे साखर होय. दैनंदिन गरजेची ही वस्तू असल्याने व जपानचे हवामान उसाच्या लागवडीस फारसे पोषक ठरणारे नसल्याने, जपानी सरकारच्या प्रोत्साहनाने, प्रथम टैवानमध्ये उसाच्या लागवडीस सुरवात करण्यात आली. त्यानंतर लागलीच या उत्पादन होणाऱ्या उसापासून साखर तयार करण्याचे कारखानेही उभारण्यात आले. साखर तयार करताना उसापासून शिल्लक राहणारी मळी फुकट न घालविता, ह्या मळीपासून अल्कोहोल व इतर मादक पेयेही तयार करण्यात येऊ लागली. अल्कोहोल व मादक पेये यांच्या उत्पादनामुळे साखरउत्पादनाचा खर्च पुष्कळच कमी होऊ लागला व ह्याचा परिणाम साखरेची किंमत पुष्कळच कमी होण्यात झाला. साखर व दारू या दोघांचीही निर्यात टैवानमधून होण्यास सुरवात झाली व अशारीतीने ऊसउत्पादनाकरिता मोठमोठे मळे व साखर व दारू उत्पादनाकरिता मोठमोठे कारखाने यांस ऊर्जितावस्था येऊन, शेतीपासून जादा उत्पादनासही चालना मिळाली. जसजसे साखरेचे उत्पादन वाढू लागले, तसतशी शेतीला उपकारक ठरणाऱ्या पाटबंधाऱ्यांची सोयही

वाढत्या प्रमाणावर करण्यात आली. ह्यामुळे शेतीच्या उत्पादनास व अप्रत्यक्षपणे कारखान्यांचे उत्पादनासही चालना मिळाली. जपानी लोकांकडून राष्ट्रीय चिनीवाद्यांकडे टैवानचे सत्तांतर झाल्यानंतरही, ऊस, साखर व मद्यार्क यांचे उत्पादन चालूच राहिले; इतकेच नव्हे तर दरवर्षी त्यात वाढही होत आहे. सध्या तायचेंग ह्या शहरापासून पश्चिम किनारपट्टीवर दक्षिणेकडे ऊसउत्पादनाचे मोठमोठे मळे असून, याच भागात साखरेचेही कारखाने आहेत. सुमारे १० वर्षांपूर्वी टैवानमधील एकंदर साखरेचे उत्पादन ७½ लाख टनांचे आसपास होते. यांपैकी जवळजवळ निम्मी साखर परदेशी निर्यात करण्यात आली. टैवानमधून निर्यात होणाऱ्या एकंदर मालाच्या सुमारे ५१ टक्के भाग फक्त साखरनिर्यातीने व्यापला आहे. ह्यावरून टैवानमधील साखर-धंद्याचे महत्त्व सहज समजण्यासारखे आहे.

टैवानसारख्या एका लहानशा देशात ( टैवानचे एकंदर क्षेत्रफळ भारताच्या एकंदर क्षेत्रफळाच्या फक्त १/१०० इतके आहे. ) दरवर्षी ७½ लाख टन साखर उत्पादन व्हावी व भारतामध्ये मात्र जेमतेम ३० लक्ष टनच साखरेचे उत्पादनास सरकारी मंजुरी मिळते ! अजूनही भारत सरकारने दारूवरील निर्बंध सैल केल्यास आपल्या भारतातही साखरेचे भरपूर उत्पादन होईल व शिवाय ही साखर पुष्कळच स्वस्तही विकता येण्याची शक्यता आहे. जागतिक बाजारपेठेत भारताच्या साखरेला गिऱ्हाईक भरपूर मिळणे शक्य आहे, पण इतर देशांशी तुलना करता भारतात तयार होणारी साखर फार महाग असल्याने, आपल्या साखरेला परदेशी बाजारपेठ मिळविता येत नाही. असो.

साखरेच्या खालोखाल टैवानमधील दुसरा महत्त्वाचा उत्पादनाचा व्यवसाय म्हणजे निर्वात पॅकबंद अन्नाचे होय. टैवानमध्ये शेतीपासून उत्पादन करण्यात येणारे अननस, केळी, वाटाणे, तांदूळ व तंबाखू हे जिन्नस होत. तंबाखूखेरीजकरून हे सर्व जिन्नस निर्वात ( Air tight ) अशा पॅकबंद डब्यात बंद करून, हे पॅकबंद डबे बाहेरील देशांत निर्यात केले जातात. अशा निर्वात डब्यात पॅकबंद केलेले खाद्यपदार्थ हा महत्त्वाचा उद्योग टैवान-मध्ये समजला जातो. टैवानमधून एकंदर निर्यात मालाच्या किंमतीच्या ४ टक्के

किंमतीचा माल म्हणजे निर्वात डब्यातून पाठविण्यात येणारा फक्त अननस होय. ह्याखेरीज इतर निरनिराळ्या वस्तूंच्या पॅकबंद डब्यांची निर्यात केली जाते ती वेगळीच.

सिमेंट, अल्युमिनियम व रासायनिक खते यांचेही लहानमोठे कारखाने टैवानमध्ये सुरू करण्यात आले आहेत. टैवानच्या समुद्रकिनाऱ्यावर मच्छीमारीचा फार मोठा उद्योग चालू असल्याचे आपण यापूर्वी पाहिलेच. वातरहित डब्यांत हे निरनिराळ्या जातींचे मासे भरून हे परदेशी पाठविण्यात येतात. अशा तऱ्हेच्या डब्यांतील अन्नास जपान व इतर आजूबाजूच्या प्रदेशांतून पुष्कळच मागणी आहे.

## परदेशी व्यापार

चीनच्या अमलाखालील टैवानमध्ये चिनी युआन हे नाणे व्यवहारात होते. त्यानंतर टैवानचा ताबा जपानी लोकांकडे आल्यावर जपानी लोकांनी आपले येन हे नाणे तेथे चालू केले. टैवान हा जपानी जीवनाला पूरक असा प्रदेश असावा, ह्या कल्पनेने जपानी लोकांनी टैवानमध्ये शेती, कारखाने व व्यापार ह्या सर्वांवर जपानी छाप पाडली. जपानमध्ये लागणाऱ्या वस्तूंचे उत्पादन टैवानमध्ये करावे व टैवानमधून त्या वस्तू जपानमध्ये आयात करून त्याच्या मोबदल्यात टैवानमधील लोकांच्या दैनंदिन गरजा जपानी मालाची टैवानला निर्यात करून भागवाव्या, हा जपानी लोकांचा मुख्य हेतू होता. ह्या दृष्टीने टैवानमधील जपानी चलनाचा पुष्कळच उपयोग होत असे. अलीकडे टैवानमध्ये राष्ट्रवादी चिनी लोकांचा अंमल सुरू झाल्यापासून टैवानमधील मुख्य चलन म्हणजे टैवानी युआन व टैवानी डॉलर ही होत. ह्या दोहोंचा अमेरिकन डॉलरशी संबंध जोडण्यात आला आहे. कारण टैवानला हरएक प्रकारची अमेरिकन मदत मिळते. प्रतिवर्षी लक्षावधी डॉलर्सचा, रोख पैशात किंवा अमेरिकन मालांत टैवानकडे सारखा ओघ वाहात असून, टैवानचे एकंदर आर्थिक धोरण हे ह्या अमेरिकेच्या मदतीवरच पुष्कळसे अवलंबून आहे, असे म्हणावयास हरकत नाही. उदाहरण द्यावयाचे तर इ. स. १९५० ते १९५५ पर्यंतच्या पाच वर्षांच्या काळात अमेरिकेकडून टैवानला जवळजवळ ४१ कोटी डॉलर्स किंवा साधारणपणे २०० कोटी रुपयांची मदत मिळाली.


नवदांपत्य
चीनी वेशभूषेचे प्रकार

इ. स. १९५५ नंतर मात्र टैवानी सरकारने आपली औद्योगिक व आर्थिक पुनर्रचना करण्याचे ठरवून, भविष्यकाळात अशा अमेरिकन मदतीची शक्यतो जरूर पडू नये, अशा विचाराने – टैवान अमेरिकेच्या आर्थिक दास्यातून मुक्त व्हावे – पावले टाकावयास सुरवात केली आहे.

टैवानमध्ये पैदा होणाऱ्या १७ लाख टन तांदळापैकी एक मोठा भाग निर्यात केला जातो. एकंदर निर्यातीच्या २५ टक्के निर्यात एकट्या तांदळाची होते. साखरेचे उत्पादनही ८·३ लक्ष टन असून, ह्यांपैकी पुष्कळशी साखर परदेशी रवाना केली जाते. एकंदर निर्यातीच्या जवळजवळ ५१ टक्के निर्यात नुसत्या साखरेची आहे, ह्यावरून टैवानमधील साखर–उद्योगधंद्याचे महत्त्व किती आहे, त्याची कल्पना येईल.

टैवानमधून निर्यात होणाऱ्या मालांत साखर व तांदूळखेरीज चहा व डब्यांतील पदार्थ यांचा अनुक्रम लागतो. हे डब्यांतील खाद्यपदार्थ, एकंदर निर्यातीच्या प्रत्येकी ४ टक्के आहेत. टैवानमधून निर्यात होणाऱ्या एकंदर मालाची किंमत १३½ कोटी डॉलर्सइतकी आहे. आयात मालाची एकंदर किंमत जवळजवळ ९¾ कोटी डॉलर्सइतकी आहे. याशिवाय प्रतिवर्षी अमेरिकेकडून जवळजवळ ९–१० कोटी डॉलर्सची मदत निरनिराळ्या स्वरूपात होते ती वेगळीच. आयातीमध्ये रासायनिक खते, एकंदर आयातीच्या २५ टक्के आहेत. त्याच्या खालोखाल अनुक्रमे असणारा माल म्हणजे निरनिराळ्या धातू व धातूंचे पदार्थ यांचा आहे. अशा पदार्थांची एकंदर टक्केवारी जवळजवळ १५ पर्यंत आहे. यंत्रसामग्रीचा तिसरा अनुक्रम असून, ही एकंदर आयातीच्या सुमारे ९ टक्के आहे. खनिज तेले व त्यापासून होणारे पदार्थ एकंदर आयातीच्या ८ टक्के असून, लोकर, कृत्रिम रेशीम व सूत यांची आयात, एकंदर आयातीच्या सुमारे ६ टक्के आहे.

टैवानच्या आयात–निर्यात व्यापारात अजूनही जपानचे महत्त्व फार आहे. टैवानच्या एकंदर परदेशी व्यापाराच्या ६१ टक्के व्यापार एकट्या जपानशी आहे. त्याच्या खालोखाल टैवानचा अमेरिकेशी व्यापार असून याचे प्रमाण सुमारे १२ टक्के आहे. बाकीचा आयात–निर्यात व्यापार इतर आजूबाजूच्या देशांशी आहे.

## टैवानचा राजकीय पूर्वेतिहास

पूर्वी टैवान हा चीनचाच एक भाग असून, त्याचा समावेश चीनच्या आग्नेयकडील फूकिएन प्रांतात होत असे, हे आपण पाहिलेच. पूर्वचीनच्या किनाऱ्यापासून १००–१२५ मैल पूर्वेकडे असलेले हे बेट जरी तत्त्वतः चीनच्या अधिराज्याखाली होते, तरी त्यावर प्रत्यक्षात चिनी सत्ता फारशी नव्हती, असे म्हणावयास हरकत नाही. आपल्या भारतातही यासारखे एक उदाहरण म्हणजे पूर्वीच्या ब्रिटिश अमदानीत मुंबईपासून पश्चिमेकडे सुमारे १५०० मैल दूर अरबी समुद्राच्या पश्चिमेस असलेला एडनचा टापू हा कैक वर्षे मुंबई इलाख्यातच समाविष्ट करण्यात आला होता. राज्यकारभाराचे दृष्टीने इतक्या दूरवरच्या प्रदेशाचा कारभार हाकणे किती जिकिरीचे काम होते, त्याचा अनुभवही आपणा महाराष्ट्रीयांस आहेच. परंतु त्यावेळी सर्व भारतावरच ब्रिटिश लोकांची सत्ता असल्याने काही विशिष्ट हेतूंनी एडनचा मुलूख मुंबई इलाख्यास जोडण्यात आला असावा, असे अनुमान करण्यास हरकत नाही. एडन मुंबईला जोडलेले राहण्यात फायदे नसून तोटेच अधिक होण्याचा संभव दिसू लागताच, एडन मुंबईपासून विभक्त करून तो इंग्लंडमधील वसाहतींच्या चिटणिसांचे ताब्यात सुपूर्द करण्यात आला. असो.

पूर्व हिंदी महासागरातील टैवानचे महत्त्व ओळखून प्रथम पोर्तुगीजांनी व नंतर डचांनी हे बेट आपल्या ताब्यात घेण्याचा विचार कायम केला व त्याप्रमाणे १७ व्या शतकाच्या मध्याचे सुमारास ह्या बेटावर डचांनी स्वारी करून तेथे आपला अंमलही जारी केला. आशिया खंडाचा आग्नेयीकडील भाग हा निरनिराळ्या लहान मोठ्या बेटांचा बनला आहे. मलायाच्या सामुद्रधुनीपासून थेट पूर्वेकडे म्हणजे हिंदी महासागर व प्रशांत महासागर यांच्या सीमेवर, ऑस्ट्रेलिया-उत्तरेकडील न्यूगिनी बेटापर्यंत ह्या बेटांचा पसारा, पश्चिमेकडून पूर्वेकडे पसरलेला आहे. यांपैकी पुष्कळशी बेटे विषुववृत्तावर असून, त्या बेटांवर मसाल्यांचे निरनिराळे पदार्थ होतात. ह्या मसाल्याच्या पदार्थांस युरोपखंडातून खूप मागणी असल्याने, युरोपखंड व ही अती पूर्वेकडील बेटे – ज्यांना नंतर मसाल्याची बेटे असे सूचक नाव मिळाले–

४०७५३
३५२
नि. अनुवाद...
नों दि: २८/११/६४

यांमधील व्यापार वाढू लागला. प्रथम पोर्तुगीज दर्यावर्दी लोकांनी ह्या निरनिराळ्या बेटांवर आपला पाय रोवला व त्यांनी हा मसाल्याचा व्यापार आपल्या ताब्यात ठेवण्याचा प्रयत्न केला. पोर्तुगीज लोकानी ह्या व्यापाराच्या निमित्ताने मसाल्याच्या बेटांसभोवतालचा भाग व तेथील समुद्रावर आपली सत्ता प्रस्थापित करण्यास सुरवात केली. ह्या दृष्टीने टैवानमधील पूर्व किनाऱ्यावर झेलुंडिया येथे त्यांनी एक सागरी किल्ला किंवा जंजिरा बांधून, ते एक पोर्तुगीज नाविक विभागाचे मुख्य केंद्र बनविले.

पोर्तुगीज लोकांच्या सत्तेचा युरोपखंडात ऱ्हास सुरू झाल्याबरोबर त्यांच्या ताब्यातील अतिपूर्वेकडील देशही इतर देशांच्या कबजाखाली जाऊ लागले. सतराव्या शतकाच्या अखेरीस चीनमध्ये मांच्यू घराण्यातील मिंग राजवटीने टैवानचे महत्त्व ओळखून, टैवानवरील डच लोकांना हाकलून देऊन, तेथे पुन्हा चिनी राजवट प्रस्थापित केली व अशारीतीने टैवान पुन्हा एकदा चिनी राज्याचा एक घटक भाग बनला.

सुमारे २०० वर्षे टैवानचा प्रदेश चिनी राज्यात मोडत असे. परंतु एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस मध्यवर्ती चिनी सत्ता कमकुवत झालेली पाहून जपानी लोकांनी चिनी लोकांविरुद्ध युद्ध पुकारले. ह्या युद्धाचा शेवट चिनी लोकांच्या शरणागतीने होऊन शेवटी चीन व जपान यांमध्ये इ. स. १८८५ मध्ये शिमोनोसेकी तेथे तह झाला. ह्या तहान्वये चीनच्या ताब्यातील टैवान हे सबंध बेट जपानला मिळाले.

जपानी लोकांनी टैवानचा ताबा घेतल्याबरोबर प्रथम तेथे एक सुसज्ज असा नाविकतळ उभारला. जपानच्या वाढत्या लोकसंख्येच्यादृष्टीने व जपानमधील वाढत्या उद्योगधंद्यांमुळे जपानला परदेशी वसाहती व व्यापार ह्या दोहोंचीही अत्यंत निकड भासू लागली. जपानच्या उत्तरेला असलेले कोरिया, मांचूरिया वगैरे चीनचे प्रदेश असून दक्षिणेला टैवान प्रदेश होता. प्रथम टैवानचा प्रदेश जपानने आपल्या ताब्यात घेऊन, नंतर हळूहळू इतरही चिनी प्रदेश त्यांनी बळकावयास सुरवात केली. जपानी उद्योगधंद्यांस लागणारा कच्चा माल टैवानमधून मिळविण्याकरिता जपानी लोकांनी

टैवानमध्ये निरनिराळ्या सुधारणा करावयास सुरवात केली. टैवानमध्ये पिकत असलेला तांदूळ, टैवानी जनतेच्या गरजा भागवूनही मुबलक प्रमाणात जपानला निर्यात करणे शक्य झाले. चहा, साखर, तंबाखू ह्या रोजच्या जरूरीच्या गरजाही बऱ्याच प्रमाणात टैवानमधून निर्यात होऊ लागल्या याचे मोबदल्यात, कापड, यंत्रे, यंत्रसामग्री व इतर निरनिराळ्या प्रकारचा पक्का माल जपानमधून टैवानमध्ये आयात होऊ लागला.

विसाव्या शतकाच्या सुरवातीपासून जसजसा जपानचा परदेशी व्यापार वाढू लागला, तसतशी जपानी लोकांना समुद्रावरील वाहतुकीची जरूर भासू लागली. जलवाहतुकीची वाढ होऊ लागल्यावर साहजिकच संरक्षणाचाही प्रश्न ओघाने आलाच. पहिल्या महायुद्धात इंग्लंड व जपान यांचा मैत्रीचा तह झाला होता. परंतु युद्धाच्या दरम्यान जपानी कारखानदार व उद्योगधंद्यांनी पूर्व आफ्रिका, भारत, इंडोचीन, मलाया, इंडोनेशिया चीन वगैरे देशांत आपला व्यापार इतका वाढविला, की त्या त्या देशांतून ब्रिटिश मालाला मागणीच येईनाशी झाली. व्यापारी चुरशीचे रूपांतर पुढेमागे राजकारणातील मैत्रीचे संबंध दुरावण्यात होतेच, हे एक ऐतिहासिक सत्य आहे. इंग्लंड व जपान यांचेमधील वाढती व्यापारी तेढ लक्षात घेता, पुढे मागे कदाचित जपानकडे दुर्लक्ष केल्यास, जपान आपल्यास डोईजड होईल ह्या भीतिपोटी इंग्रजांनी जपानबरोबर केलेला मैत्रीचा तह इ. स. १९२१ नंतर; मुदत संपताच पुन्हा चालू न ठेवता तो रद्द केला. साहजिकच जपानी लोकांस संशयाने पछाडले. ह्याच सुमारास ब्रिटिश लोकांनी सिंगापूर येथे कोट्यवधी रुपये खर्च करून एक अद्ययावत नाविक तळ उभारला. ही आपल्याविरुद्धच नाकेबंदी आहे, असे जपानी लोकांस वाटून, सिंगापूरच्या तोडीस तोड म्हणून त्यांनी टैवान बेटावर एक भले मोठे नाविक व वैमानिक केंद्र उभारले. ह्या टैवानमधील आरमारी व वैमानिक केंद्राचा उपयोग त्यांना दुसऱ्या महायुद्धात पूर्णपणे घेता आला. या केंद्रामुळेच त्यांना पूर्वेकडील पर्लहार्बरवर व दक्षिणेकडील सिंगापूर, मलाया, इंडोनेशिया, फिलिपीन बेटे, इंडोचीन व ब्रह्मदेश ह्या सर्वांवर धडाडीने हल्ले करून, एका मागोमाग एक देश पादाक्रांत करणे शक्य झाले.

दुसऱ्या महायुद्धात जपान हे शत्रुराष्ट्र असल्यामुळे, जपानचा पराभव

झाल्यावर, जपानने गिळंकृत केलेला चीनचा सर्व भाग पूर्ववत चीनला सुपूर्त करण्याचे कैरो येथे इ. स. १९४४ मध्ये भरलेल्या चार बड्या राष्ट्रांचे नेत्यांचे बैठकीत ठरले. या बड्या चार राष्ट्रांमध्ये त्या वेळचे चीनचे, परंतु आता राष्ट्रीय चीनवाद्यांचे, म्हणजेच हल्लीच्या टैवान येथील सरकारचे अध्यक्ष जनरल चिआंग कै शेक हे एक होते. चीन व जपान यांचेमध्ये इ. स. १९३६ पासून चालू असलेला संघर्ष, शेवटी जपानचा दुसऱ्या महायुद्धात पराभव झाल्याने संपला, पण शेवटी शेवटी जपानबरोबर चीनचे स्वातंत्र्य-युद्ध संपले; तरी चीनमध्ये आपआपसातील यादवीयुद्ध चालूच राहिले. चीनमधील राष्ट्रीय चिनी सरकारच्या लाचलुचपत, वशिलेबाजी व पुंजी-पतींना शक्यतोवर न दुखविण्याच्या धोरणाने चिनी जनता राष्ट्रवादी चिनी सरकारविरुद्ध अत्यंत नाराज झाली. याचाच परिणाम म्हणजे चीनमध्ये साम्यवादी सरकारची स्थापना होऊन, राष्ट्रवादी चिनी लोकांस चीनमधून परागंदा व्हावे लागले. जपानकडून मिळालेल्या टैवान बेटावर राष्ट्रवादी चिनी सरकारची स्थापना करण्यात आली व अशारीतीने चीनची दोन सरकारे अस्तित्वात आली. इ. स. १९५० च्या टैवान व अमेरिकेतील संयुक्त संस्थाने यांमध्ये झालेल्या करारान्वये टैवानवर कोणत्याही राष्ट्राची स्वारी झाली, तर अमेरिका टैवानच्या मदतीस येईल, हा त्या करारातील सर्वप्रमुख मुद्दा होता. इ. स. १९५० नंतर चीनमध्ये साम्यवादी सरकारची यथासांग स्थापना झाल्यावर व त्या सरकारने साम्यवादी रशियाशी दीर्घ मुदतीचा मैत्रीचा करार केल्यामुळे जागतिक राजकारणात समतुला राखणे आवश्यक वाटू लागले. चीनसारख्या राष्ट्रास पायबंद म्हणून राष्ट्रवादी टैवानच्या चिनी सरकारला सर्वतोपरी साह्य करण्याचे अमेरिकेने ठरविले व आजतागायत अमेरिका टैवान सरकारला प्रत्येक बाबतीत भरीव मदत देत आहे; इतकेच नव्हे तर राष्ट्रसंघात अजूनही चीनचे प्रतिनिधी म्हणून बहुसंख्य साम्यवादी चिनी सरकारला संमती न देता, लघुमति राष्ट्रवादी टैवान सरकारच अखिल चीनचे प्रतिनिधित्व करण्यास अमेरिकेची संमती व फूसही आहे. चिनी लोकांमध्ये साम्यवादी व राष्ट्रवादी अशी फूट पाडून टैवानच्या सरकारला राष्ट्रसंघातील महत्त्वाचे स्थान चालू ठेवून, ह्या दोन चिनी सर-कारांची दिलजमाई होऊ न देण्याचा हरप्रयत्न चालू आहे; पण ही गोष्ट

फार काळ चालू राहीलसे वाटत नाही. आज ना उद्या ह्या दोन चिनी भावांची दिलजमाई होऊन ती जर एक झाली, तर त्यात फारसे आश्चर्य वाटण्याचे कारण नाही.

इ. स. १९५४ मध्ये टैवान सरकारने एक पंचवर्षीय योजना आखली. या योजनेचा मुख्य हेतू आर्थिकदृष्ट्या टैवान शक्यतो स्वयंपूर्ण व्हावा व त्याचे अमेरिकेवरील अवलंबित्व शक्य तितके कमी असावे, हा होता. त्या हेतूच्या सिद्ध्यर्थ टैवानी सरकारने प्रयत्न सुरू केले. ह्याचा परिणाम म्हणून उत्पादनात झालेली वाढ पुढील तक्त्यावरून चटकन लक्षात येईल :—

| वस्तूचे नाव | १९५५ उत्पादन | १९६१ |
|---|---|---|
| तांदूळ | १७ लक्ष टन | १९ लक्ष टन |
| साखर | ७·३ लक्ष टन | ९·६ लक्ष टन |
| चहा | १४,००० टन | १६,००० टन |
| बटाटे | २० लक्ष टन | ३० लक्ष टन |
| केळी | ८०,००० टन | १ लाख टन |
| अननस | ९ लक्ष टन | १३ लक्ष टन |
| तंबाखू | १३,००० टन | १६,००० टन |
| कोळसा | २३·६ लक्ष टन | २९ लक्ष टन |
| सोने | ११,००० औंस | १३,४९७ औंस |
| चांदी | ५५,००० औंस | ६०,९७४ औंस |
| तांबे | १९,५० टन | २१,०० टन |
| ॲल्यूमिनियम | ७,००० टन | ८,६१० टन |
| पोलाद | १·५० लक्ष टन | २·२७ लक्ष टन |
| सिमेंट | ७·५० लक्ष टन | १० लक्ष टन |
| वीज | १९.६ लक्ष किलोवॅटस् | २८·८० लक्ष किलोवॅटस् |

परदेशी व्यापाराचे बाबतीतही टैवानी सरकारची अशीच भरीव प्रगती झाल्याचे दिसून येते. इ. स. १९५५ मध्ये एकंदर निर्यात १३·२४ कोटी

डॉलर्सची होती ; तर इ. स. १९६१ मध्ये एकंदर निर्यात १६·८ कोटी डॉलर्सची झाली. आयात मालाची एकंदर किंमत इ. स. १९५५ मध्ये ९·१ कोटी डॉलर्सची होती, ती इ. स. १९६१ मध्ये १२·७ कोटी डॉलर्सइतकी वाढली.

परदेशी व्यापारात अमेरिकेचा हिस्सा मोठा आहेच, परंतु एकंदर व्यापाराशी अमेरिकन व्यापाराचे प्रमाण कमी होत चालले आहे. इंग्लंडशी आयात-निर्यात व्यापार वाढू लागला आहे. परदेशी व्यापार वाढविण्याचे दृष्टीने एक महत्त्वाच्या गोष्टीचा येथे उल्लेख करणे जरूर आहे. इ. स. १९५९ मध्ये प्रथमच टैवानमध्ये पहिली परदेशी बँकेची शाखा उघडली गेली व ती जपानची निप्पोन कागियो बँक ही होय. अजूनपर्यंत तरी टैवानमधलि हीच एकमेव परकीय बँक होय.

कोणत्याही स्वतंत्र देशास आपल्या संरक्षणाचा प्रश्न अत्यंत जिव्हाळ्याचा वाटणे साहजिकच आहे व टैवानही ह्याला अपवाद नाही. एकंदर परिस्थितीचा विचार करून टैवानी सरकारने सक्तीच्या लष्करी शिक्षणाचा अवलंब केला आहे. त्यामुळे प्रत्येक वयात आलेल्या, सुदृढ नागरिकास संरक्षणाचे शिक्षण घ्यावेच लागते. आज टैवानमध्ये एकंदर ४ लाख सैनिक असून, त्यांतील ५० टक्के हे मूळच्या टैवानमधील वन्य जमातींचे तयार करण्यात आले आहेत. टैवानच्या चारी बाजूस समुद्र असल्याने टैवानमध्ये नाविकदलाची स्थापना करणेही क्रमप्राप्तच ठरते. भारतासारख्या, जवळजवळ १०० पट विस्ताराने मोठ्या असलेल्या देशाशी टैवानची तुलना करणे हास्यास्पदच होईल. परंतु टैवानसारख्या एका चिमुकल्या राष्ट्रास जर ४ लाख सैनिकाची जरूर भासते व त्याकरिता तेथे लष्करी शिक्षण सक्तीचे करण्याचा कायदा केला जातो, तर भारतासारख्या खंडासमान देशात साहजिकच काही कोटी तरी सैनिकांची खासच आवश्यकता असावयास हवी. अर्थात संरक्षणाची व्यवस्था ही त्या त्या देशाच्या एकंदर परिस्थितीनुरूपच ठरवावी लागते. त्यात इतर लहानमोठ्या देशांशी तुलना करणे अशक्य व वेडेपणाचेही होईल.

टैवान सरकारचे नाविकदलही चतुरस्र असून, सध्या ह्या टैवानी आर-

मारात ६ डिस्ट्रॉयर्स, ४१ लँडिंग जहाजे, २ एस्कॉर्ट जहाजे, १२ पाणसुरुंग काढणारी व पेरणारी जहाजे, १ गन बोट, २४ फ्रिगेटस्, ५० किनारी जहाजे, ७ तेलवाहू बोटी वगैरेंचा समावेश होतो. विमानदलातही एकंदर ४०० विमाने निरनिराळ्या प्रकारची असून, विमानदलातील आरक्षकांची संख्या सुमारे ७०,००० इतकी आहे.

टैवानचे चलन म्हणजे टैवानी युआन होय. हल्ली ५ टैवानी युआन हे एक अमेरिकन डॉलरबरोबर आहेत. सर्व परदेशी हुंडणावळ व व्यवहार सरकारी नियंत्रणानेच चालतात. टैवानी सरकारच्या इ. स. १९६१-६२ सालच्या अंदाजपत्रकात टैवानी सरकारची महसूलजमा ७९.५२ कोटी युआन व खर्च एकंदर ८०.६८ कोटी युआन म्हणजेच सर्वसाधारणपणे प्रत्येकी ८० कोटी रुपयांचे घरात आहेत.

## टैवानमधील काही महत्त्वाची शहरे व बंदरे

### तायपेह

ही टैवानची राजधानी असून, टैवानच्या वायव्य भागात, मैदानी प्रदेशात आहे. ह्या शहराची लोकसंख्या सुमारे ९$\frac{1}{4}$ लाख असून, तानशुई व कीलुंग ह्या दोन लहान नद्यांच्या संगमावर हे शहर वसलेले आहे. हे शहर टैवानी लोहमार्गाचे केंद्र असून, पश्चिम किनारपट्टीवरील उत्तर-दक्षिण लोहमार्ग येथूनच सुरू होतात. उत्तरेकडून पूर्व किनाऱ्याकडे जाणाऱ्या लोहमार्गाचेही हे केंद्र आहे. ह्या शहराच्या पश्चिमेला थोड्या अंतरावर, हिंदी महासागरावरील टैवानचे सर्वांत महत्त्वाचे बंदर कीलुंग उभारले गेले आहे. तायपेहच्या परिसरात मोठमोठे उद्योगधंदे उभारण्यात आले असून, त्यांनी उत्पादिलेला पक्का माल याच बंदरातून निर्यात केला जातो.

### कीलुंग

पश्चिम किनाऱ्यावरील टैवानचे एक महत्त्वाचे बंदर. लोकसंख्या जवळजवळ १$\frac{1}{2}$ लाख आहे. याच्या पूर्वेस टैवानची राजधानी तायपेह असून, ह्या प्रदेशात मोठमोठे कारखाने आहेत. टैवानचा बहुतेक व्यापार ह्या बंदरातूनच होतो.

## केओशिंग

पश्चिमेकडील किनाऱ्याचे मैदानातील, टैवानमधील दुसऱ्या क्रमांकाचे शहर. ह्या शहराची लोकसंख्या सुमारे ३¼ लाख आहे. ह्या शहराचे आसमंतात मोठमोठे कारखाने व उद्योगधंदे सुरू करण्यात आले आहेत. पश्चिम किनार-पट्टीवरील उत्तर–दक्षिण लोहमार्गावरील एक महत्त्वाचे केंद्र.

## टायतांग

पश्चिमेकडील मदानी प्रदेशातील महत्त्वाचे शहर. या शहराची वस्ती जवळ-जवळ २½ लाख आहे. हे शहर कारखाने व उद्योगधंदे यांचे केंद्र आहे. लोहमार्गावरील एक महत्त्वाचे केंद्र.

## तायचुंग

टैवानच्या नैर्ऋत्य कोपऱ्यात वसलेले एक शहर. या शहराची वस्ती सुमारे २¼ लाख आहे. तायपेहहून सुरू होऊन दक्षिणेकडे पसरलेल्या लोहमार्गाचे हे दक्षिण टोक होय.

वरीलशिवाय पूर्व किनारपट्टीवर सुवाओ, ईलान व सायटुंग ही आणखी, पण कमी महत्त्वाची शहरे आहेत. आयपिंग, मार्कुग, हुआलिएन व ताऊ शिऊई ही पूर्वकिनाऱ्यावरील साधारण प्रतीची बंदरे आहेत. पूर्व किनार-पट्टीला लागून असलेला प्रशांत महासागर हा अतिशय खोल असल्यामुळे, टैवानच्या पूर्व किनारपट्टीवर महत्त्वाच्या बंदरांचा अभाव दिसून येतो.

## भाषा, धर्म, संस्कृती वगैरे

टैवानी लोकांची भाषा चिनीच आहे. परंतु ही चिनी भाषा दक्षिण चीनमध्ये बोलण्यात येणारी व प्रचारात असलेली, म्हणजेच जिला कँटनी चिनी भाषा म्हणतात, ती होय. आपल्याकडे महाराष्ट्रात ज्याप्रमाणे कोकणी, देशावरील, खानदेशी, वऱ्हाडी, नागपुरी वगैरे मराठी भाषेच्या निरनिराळ्या बोली किंवा प्रकार मराठी ह्या मूळ भाषेचे आहेत, त्याचप्रमाणे चीनचा विस्तार मोठा असल्यामुळे निरनिराळ्या भागांत निरनिराळे चिनी भाषेच्या

बोलीचे प्रकार आढळून येतात. यामुळे दक्षिण चीनमध्ये प्रचारात असलेली कँटनी चिनी भाषा होय.

टैवानी लोकांचा मुख्य धर्म म्हणजे चीनमध्ये आढळून येणारा व कन्फ्यूशियसने घालून दिलेल्या तत्त्वांप्रमाणे आचरणात आणला गेलेला धर्म होय. हा धर्म व बुद्ध धर्म हे जवळजवळ एकच आहेत. याशिवाय खिश्चन, मुसलमान, बौद्ध वगैरे धर्मांचेही असंख्य अनुयायी आहेत. टैवानी लोकांची सर्वसाधारण संस्कृतीही मूळ चिनी संस्कृतीशी मिळतीजुळती आहे. खरे पाहू जाता, हल्ली तरी बहुसंख्य टैवानी जनता ही पूर्णपणे चिनीच आहे. फक्त राजकीय मतभेदांमुळे हे चिनी, म्हणजे राष्ट्रवादी चिनी आपली मायभूमी सोडून टैवानमध्ये वसाहतीकरता आले इतकेच. इंग्लंडमधील पुष्कळसे, त्यावेळचे नवमतवादी खिश्चन लोक, यांनाच त्यावेळी प्युरिटन अशी संज्ञा दिलेली होती, धार्मिक छळामुळे आपल्या बायकामुलांसह आपली मायभूमी इंग्लंड सोडून, सुमारे २५० वर्षांपूर्वी अमेरिकेत वसाहत करण्याकरता गेले, त्याचप्रमाणे हे राष्ट्रवादी चिनी, राजकीय मतभेदामुळे आपल्या चिनी लालभाईपासून चार हात दूर, टैवानमध्ये येऊन राहिले आहेत. अमेरिकेतील इंग्रज ज्याप्रमाणे जाज्वल्य देशाभिमानी असल्याने स्वतः न्यू इंग्लंडर्स असे म्हणवून घेत असत व अशारीतीने आपल्या मायभूमीबद्दलचा जाज्वल्य अभिमान दर्शवीत असत, त्याप्रमाणे मूळ चीनबद्दलही ह्या टैवानी राष्ट्रवादी चिनी लोकांत प्रेम व आदर वसत असला, तर त्यात फारसे आश्चर्य करण्याचे कारण नाही.

## चिआंग कै शेक

दुसऱ्या जागतिक महायुद्धाच्या काळात 'बड्या चार' व्यक्तींमध्ये ज्यांचा समावेश केला जात असे, ते भूतपूर्व चीनचे ख्यातनाम पुढारी व हल्लीच्या टैवानमधील राष्ट्रवादी चिनी सरकारचे पंचप्राण जनरॅलिस्सिमो चिआंग कै शेक यांचेविषयी थोडीशी माहिती दिल्यावाचून टैवानचे वर्णन पुरे होणेच शक्य नाही.

जनरल चिआंग कै शेक यांचे पूर्ण नाव 'चीह-शीह- चिआंग चुंग शेंग' असे आहे. त्यांचा जन्म इ. स. १८८७ मध्ये एका मध्यमवर्गीय

शेतकरी कुटुंबात, शांघायजवळील एका लहानशा खेड्यात झाला. साहजिकच चिआंग कै शेक यांना दक्षिण चीनबद्दल विशेष आपुलकी व ममत्व वाटत असल्यास त्यात विशेष आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही. शांघाय व त्या शहराच्या परिसरातील टापू हा चीनमधील सर्वात दाट लोकसंख्येचा भाग समजला जातो. मानवी जीवनार्थ कलह ह्या भागात अत्यंत प्रकर्षाने जाणवतो.

चिआंग कै शेक यांचे बालपण व प्राथमिक शिक्षण त्यांच्या जन्मग्रामी पूर्ण झाल्यावर, त्यांनी काही वर्षे माध्यमिक शिक्षण घेण्यात घालविली. इतक्यात त्यांच्या नशिबाने त्यांना एक उत्कृष्ट अशी संधी मिळाली. त्यावेळी चीनमध्ये मांच्यू राजघराण्याची सत्ता असून, हे मांच्यू लोक स्वतःला उच्च समजून सर्वसाधारण चिनी लोकांस नेहमी कमी लेखीत असत. चिआंग कै शेक ह्यांचे घराणे शेतकरी व मध्यमवर्गीय व्यापारी, म्हणजेच ज्याला पूर्वी भारतात ( परतंत्र भारतात ) बिनलष्करी किंवा 'बाबू' वर्ग म्हणत असत, अशा वर्गात मोडत असल्यामुळे, चिआंग कै शेक यास लष्करी शिक्षण व नोकरी मिळण्याचा संभव फारच थोडा होता. परंतु वर सांगितल्याप्रमाणे त्यांच्या नशिबातच लष्करी शिक्षण व नोकरी दोन्ही असल्यामुळे, त्या वेळच्या मांच्यू राजवटीकडून चिआंग कै शेक ह्यांस लष्करी शिक्षणासाठी पसंत करण्यात आले व त्यांचा चीनमधील 'पॅओटिंग' येथील मिलिटरी ॲकेडमी ( लष्करी विद्यालय ) मध्ये शिरकाव झाला. वयाच्या विसाव्या वर्षी म्हणजे इ. स. १९०७ मध्ये त्यांना पुढील लष्करी शिक्षणासाठी जपानला पाठविण्यात आले. जपानमधील लष्करी विद्यालयात उच्च लष्करी शिक्षण घेत असतानाच चिआंग कै शेक ह्यांची त्यावेळच्या डॉ. सन् यत् सेन आदि चिनी राष्ट्रवादी क्रांतिकारक पक्षातील काही पुढाऱ्यांशी मैत्री जमली व साहजिकच ते चिनी राष्ट्रवादी क्रांतिकारक पक्षाकडे आकर्षिले गेले.

इ. स. १९११ मधील चिनी राज्यक्रांतीची संधी साधून चिआंग कै शेक चीनमध्ये आले. क्रांती सफल झाली, तरी चीनमधील राजकीय सत्ता युआन शिकाई ह्या पुराणमताभिमानी पुढाऱ्याच्या पक्षाचे हाती राहिल्याने सन् यत् सेन व त्यांचे राष्ट्रवादी अनुयायी राज्यकारभारातून बाजूला गेले. चिआंग

कै शेक यांनाही त्यामुळे काही काळ अज्ञातवासच घडला. ह्या अज्ञातवासाच्या काळात चिआंग कै शेक यांच्यावर राष्ट्रवादी चिनी पक्षाच्या म्हणजेच क्युओमिंटांगच्या, लष्करातील एक अधिकारी म्हणून कामगिरी सोपविण्यात आली. इ. स. १९२० च्या सुमारास चिआंग कै शेक ह्यांची संघटनाकुशलता क्युओमिंटांगचे अध्यक्ष डॉ. सन् यत् सेन यांच्या डोळ्यांत भरली व साहजिकच सन् यत् सेन यांची चिआंग कै शेक यांचेवर मर्जी बसून ते त्यांच्या काही विश्वासू सहकाऱ्यांपैकी एक असे मानले जाऊ लागले.

चीनमध्ये राज्यक्रांती होऊनही, जरी राज्यसत्ता संपुष्टात आली, तरी राज्यसत्तेचे पाठीराखे म्हणून समजल्या गेलेल्या युआन शिकाई यांच्या प्रतिगामी व पुराणमताभिमानी पक्षाचे हातीच राज्यकारभाराची सूत्रे राहिल्यामुळे राज्यक्रांतीचा तादृश असा फायदा चिनी जनतेला मिळालाच नाही. नुसती राज्यक्रांती होऊन जनतेला दिलासा मिळत नाही, तर जनतेला काही सुखसोयी मिळावयास एकंदर सरकारच जनताभिमुख असले पाहिजे; ह्या विचाराने सन् यत् सेन ह्यांच्या क्युओमिंटांग पक्षाने परकीय मदत मिळवून पुन्हा राज्यक्रांती घडवून आणण्याचा मनसुबा रचला. परकीय मदत घेऊन चीनमध्ये शक्य तर पुन्हा सशस्त्र उठाव करावा व मांच्यू राजघराण्याला पाठीशी घालणाऱ्या पुराणमताभिमानी युआन शिकाईचे सरकार उलथून पाडावे, ह्या हेतूने क्युओमिंटांग पक्षाने साम्यवादी रशियन सरकारशी संधान बांधण्याचा विचार नक्की केला व त्याप्रमाणे क्युओमिंटांगचे अध्यक्ष डॉ. सन् यत् सेन यांनी आपले एक विश्वासू सहकारी चिआंग कै शेक ह्यांस रशियात पाठविले. रशियामध्ये असताना चिआंग कै शेक यांनी रशियन लष्करी संघटनेचा बारकाईने अभ्यास केला व आपल्या देशात राष्ट्रवादी चिनी लोकांच्या उठावाकरिता काय काय युद्धसामग्रीची व इतर मदतींची गरज आहे, याचाही रशियन लष्करी अधिकाऱ्यांबरोबर विचारविनिमय केला. रशियाहून परत आल्यावर चिआंग कै शेक यांस क्युओमिंटांगच्या कँटन येथील व्हँपू लष्करी विद्यालयाचे प्रमुख म्हणून नेमण्यात आले.

इ. स. १९२५ मध्ये डॉ. सन् यत् सेन हे परलोकवासी झाले व साहजिकच क्युओमिंटांग पक्षाचे सर्वश्रेष्ठ पुढारीपण चिआंग कै शेक यांचेकडे आयतेच

चालून आले. त्याचबरोबर क्युओमिंटांग सेनेचे सरसेनापतिपदावरही त्याची नियुक्ती झाली. क्युओमिंटांग पक्षाचे अध्यक्षपद व क्युओमिंटांग सेनेचे



चिआंग कै शेक

सरसेनापतिपद हाती घेतल्यावर चिआंग कै शेक यांनी त्यावेळच्या चिनी सरकारविरुद्ध बंडाचा झेंडा उभारला व थोड्याच अवधीत बहुतेक सर्व

दाक्षिण चीन त्यांनी आपल्या ताब्यात घेऊन नंतर उत्तरेकडे पीकिंगच्या रोखाने त्यांनी चढाईला सुरवात केली.

इ. स. १९२७ चे सुमारास चिआंग कै शेक उत्तरेच्या रोखाने कूच करीत होते, पण तितक्यात क्युओमिंटांग पक्षात अंतर्गत कलह व भांडणांना ऊत आला. राष्ट्राचे स्वातंत्र्य मिळविण्याकरिता जी परकीय मदत घ्यावयाची, ती कशा प्रकारची असावी, त्याला मर्यादा असावी किंवा नाही, अशा प्रश्नांवर क्युओमिंटांग पक्षात दोन स्पष्ट तट पडले. ज्या पक्षाला साम्यवादी रशियाचे अनिर्बंध सहाय्य घ्यावे असे वाटत होते, त्या पक्षाचे माओ त्से तुंग हे एक प्रमुख पुढारी होते. चिआंग कै शेक ह्यांना अशातऱ्हेची, आपल्या राष्ट्राच्या स्वातंत्र्यसंग्रामात रशियनांची अनिर्बंध मदत व लुडबूड पसंत नव्हती. कारण याच सुमारास रशियन सरकारने चिनी राष्ट्रवादी लोकांस स्वातंत्र्यप्राप्तीच्या लढ्यात सल्लामसलत देण्याकरिता आपले बोरोडीन वगैरे काही पाताळयंत्री हस्तक पाठविले होते. त्यांच्या एकंदर कारवाया ह्या सुकृतदर्शनी चिनी लोकांस मदतरूप वाटल्या, तरी कालांतराने रशियन लोकांचे वर्चस्व राष्ट्रवादी चिनी संघटनेवर राहण्याची भीती चिआंग कै शेक यांस स्पष्टपणे दिसू लागल्याने, साहाजिकच अनिर्बंध रशियन मदतीचा स्वीकार करणे त्यांना धोक्याचे वाटू लागले. ह्याचाच परिणाम म्हणजे क्युओमिंटांग पक्षात दुफळी पडून माओ त्से तुंग यांचा साम्यवादी रशियनांशी संपूर्ण सहकार्य करणारा गट व अनिर्बंध रशियन मदत घेण्याच्या विरुद्ध असलेला कट्टर राष्ट्रवादी गट – चिआंग कै शेक यांच्या पुढारीपणाखालील - अशा दोन गटांत विभागणी झाली. लवकरच ह्या अंतस्थ दुफळीचे स्वरूप जास्त जास्त व्यापक बनून, ह्या दोन गटांतील संघर्ष इतका वाढला, की माओ त्से तुंग यांच्या गटाने आपला सवतासुभा स्थापन करून, आपली स्वतंत्र लष्करी संघटना रशियन सल्लागारांच्या मदतीने उभारली व हे दोन्ही गट परस्परांशी लढण्यास उद्युक्त झाले.

इ. स. १९२७ च्या सुमारास चिआंग कै शेक यांनी क्युओमिंटांगचे भूतपूर्व अध्यक्ष परलोकवासी डॉ. सन् सेन ह्यांच्या मेहुणीशी दुसरा विवाह केला. ह्यापूर्वी तरुणपणी त्यांचा प्रथम विवाह झाला असून, या विवाहापासून त्यांना दोन पुत्रही झाले होते. मध्यंतरीच्या काळात त्यांनी आपल्या प्रथम

मराठी ग्रंथ ... संग्रहालय
अनुक्र ३००५३ दि. ५/५/५९ ...१४३
३७२ २८।५।६५



पत्नीशी घटस्फोट घेतला होता. ह्या दुसऱ्या विवाहाने चिआंग कै शेक यांचे क्युओमिंटांग पक्षातील स्थान आणखीनच बळकट झाले. मॅडम चिआंग कै शेक यांचे नाव मॅडम सून मिंग लिंग असे आहे. यांचेशी झालेल्या विवाहानंतर लवकरच चिआंग कै शेक ह्यांनी आपल्या नूतन पत्नीच्या आग्रहाखातर ख्रिश्चन धर्म स्वीकारला.

चिआंग कै शेक यांचा प्रखर राष्ट्रवादी गट व माओ त्से तुंग यांचा रशियन-धार्जिणा गट यांमधील वितुष्ट उत्तरोत्तर वाढत चालले. इतक्यात क्युओमिंटांग पक्षातील ह्या दुफळीचा फायदा उठवावा, म्हणून इ. स. १९३१ मध्ये जपानी लोकांनी मांचूरियावर हल्ला चढवून तो सर्व प्रांत आपल्या घशात टाकला. लवकरच जपानी लोकांची दृष्टी मुख्य चीनवर जाऊन, इ. स. १९३५ मध्ये त्यांनी चीनच्या पूर्वकिनाऱ्यावर आपल्या सैन्य व आरमारानिशी जोरदार हल्ला चढविला. थोडक्याच वेळात जपानी लोकांनी सबध दक्षिण चीन-वर आपले प्रभुत्व प्रस्थापित केले व मग त्यांनी आपला मोर्चा उत्तरेकडे, यांगत्सेकिआंग नदीच्या उत्तरेच्या बाजूवर वळविला. दक्षिणेत जपानी सैन्याशी मुकाबला करण्याचा चिआंग कै शेक यांच्या सैन्याने शर्थीचा प्रयत्न केला. शांघाय व त्याच्या आसमंतातील टापू जपानी लोकांच्या हाती पडताच चिआंग कै शेक यांनी आपल्या पक्षाचे ठाणे नॅनकिंगहून अगदी पश्चिमेकडे म्हणजे डोंगराळ प्रदेशातील चुंगकिंग ह्या ठिकाणी हलविले. अशारीतीने चिनी लोकांशी प्रतिकार चालू असतानाच दुसरे महायुद्ध सुरू झाले. जपान जर्मनीच्या बाजूने, म्हणजेच शत्रुराष्ट्र म्हणून जाहीर झाल्याबरोबर चिनी राष्ट्रवाद्यांच्या जपानी लोकांशी चाललेल्या लढ्यास बळकटी आली. दोस्तांची पुष्कळच मदत चिआंग कै शेक यांस विनासायासे मिळू लागली. त्याचबरोबर चिआंग कै शेक यांचे वजनही दोस्त राष्ट्रांच्या पुढाऱ्यांत वाढू लागले. लवकरच त्यांची ' बड्या चार ' मुत्सद्द्यांत गणना होऊ लागली.

इ. स. १९४६ मध्ये महायुद्ध संपल्यावर चीन व जपान यांचेमधील लढाही संपुष्टात आला, परंतु स्वातंत्र्यप्राप्तीचा समय नजीक येऊन ठेपला असताना माओ त्से तुंग व चिआंग कै शेक ह्या दोन गटांमधील वितुष्ट आणखीच उग्र बनले. चिआंग कै शेक यांच्या राजवटीविरुद्ध लाचलुचपत; वशिलेबाजी, काळाबाजार, पुंजीपतींस दाखविण्यात येणारे विशेष संरक्षण,

वगैरे नेहमीचेच आरोप साम्यवादी रशियनधार्जिण्या माओ त्से तुंग यांच्या गटाने सुरू केले. चिआंग कै शेक यांच्याविरुद्ध असे रान उठविल्यावर साम्यवादी चिनी गटाने आपल्या सैन्यानिशी चिआंग कै शेक यांच्या सैन्यावर हल्ला चढविला. लवकरच चिआंग कै शेक यांना माओ त्से तुंग यांना शरणचिठ्ठी द्यावी लागली. परंतु आपल्या निर्भेळ राष्ट्रवादी पक्षाने साम्यवादी चिनी राजवटीखाली जीवन कंठण्यापेक्षा आपले चिमुकलेच, परंतु स्वतंत्र अस्तित्व कायम ठेवण्याचे ठरवून अमेरिकेच्या साह्याने त्यांनी टैवानचा ताबा मिळविला व तेथे इ. स. १९४९ मध्ये आपली स्वतंत्र राजवट सुरू केली.

रशियन साम्यवादी नेत्यांचा राष्ट्रवादी चिनी लोकांस स्वातंत्र्यप्राप्तीसाठी मदत देण्यात शुद्ध हेतू नाही, असे चिआंग कै शेक यांस प्रथमपासूनच वाटत होते. अलीकडे साम्यवादी चीन व साम्यवादी रशिया यांमधील बेबनाव पाहता, चिआंग कै शेक यांच्या दूरदृष्टीची कल्पना येते.


टैवानचे चिआंग कै शेक हे तहहयात अध्यक्ष असून, क्युओमिंटांग पक्षाचे अध्यक्षस्थानीही त्यांचीच एकसारखी बिनविरोध निवडणूक होते.



मराठी ग्रंथ संग्रहालय, ... स्थळप्रत.
अनुक्रम ४००५३ दि:
क्रमांक 302 नों. दि.

REFBK-0015039

REFBK-0015039


अमेरिका
(यु.एस्.ए.)
भारत


एशिया